९२८३.

स. ग्रं. सं. ठाणें

विषय निबंध

सं. नं. ९०३

# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

संग्रहालय/वाचनालय शाखा.

अनुक्रम नं. | विभाग निबंध | क्रमांक ८७०

पुस्तकाचें नांव जीवन-संस्कृति

लेखक कालेलकर काका. अनु. आधारकर

सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका पुस्तकाची खराबी करूं नका.

REFBK-0001902

तीर्थस्वरूप

**भाऊंच्या चरणीं**

*सादर समर्पित.*

**श्रीपाद जोशी.**

त्याचें श्रेय माझे मित्र श्री. स. वि. ऊर्फ बापू जोशी यांनाच आहे. कारण मी हा अनुवाद खूप घाईघाईत कसातरी हातावेगळा केला होता. त्यामुळें त्यांत खूपच उणीवा राहून गेल्या होत्या. मुद्रणप्रत तयार करण्याचें किचकट कामहि बापूनींच केलें आहे.

अनुवाद करतेवेळीं माझे तुरुंगांतील बालमित्र श्री. मधु कुलकर्णी व श्री. अण्णा फणशे यांचें मला खूपच साहाय्य झालें आहे. त्याबद्दल त्या दोघांचेहि मी मनापासून आभार मानतों.

प्रकाशकांचे आभार मानणें कदाचित् औपचारिकतेचें होईल.

१८६५
कार्तिकी एकादशी
कृष्णमंदिर, येरवडा.

— श्रीपाद जोशी.

सूचना—

पान ३५ च्या शेवटीं " साम्राज्य यायचेंच." असें वाचावें.

# ★ जीवन संस्कृति ★


| | |
|---|---|
| संस्कृतीचा विस्तार | १ |
| साहचर्य | ६ |
| युरोपपुढील यक्ष प्रश्न ! | ११ |
| आशियाचें ऐक्य | १६ |
| आशियाची साधना | १८ |
| भारताची समस्या | २४ |
| आपलें राष्ट्रीय ध्येय | २८ |
| आशियाचा प्रभातकाल | ३१ |
| लोकसत्ता | ४१ |
| आपला अमर वारसा | ४९ |
| आर्य संगीत | ६० |
| शिल्प आणि स्थापत्य | ६४ |
| सहा चाकांचें जग | ७२ |
| सुताराचीं अवजारें | ७७ |
| नव युग | ८१ |
| जगद्व्यापी परिवर्तन | ८३ |

# निवेदन

★

प्रस्तुत लेखसंग्रह पूज्य काकासाहेब कालेलकरांच्या ' जीवन संस्कृति ' या गुजराथी भाषेंतील ग्रंथाच्या संस्कृति या प्रथम खंडाचा अनुवाद आहे. पू. काकासाहेब स्वतःला एक लोकशिक्षक समजतात आणि तें खरेंहि आहे. राष्ट्राचें जीवन समृद्ध व सर्वव्यापी व्हावें यासाठीं एका विशिष्ट दृष्टिकोणांतून ते शिक्षण देत आले आहेत. ते महाराष्ट्रीय असूनहि त्यांच्या ज्ञानाचा लाभ आपल्या प्रान्ताला फारच थोडा झाला आहे. आतां ते महाराष्ट्रांतच येऊन राहिले आहेत. त्यांच्याकडून आपण पुष्कळच शिकूं शकूं.

गेलीं पंचवीस वर्षें गुजराथची एकनिष्ठ सेवा करीत असतां जीवन आणि संस्कृति याविषयीं वेळोवेळीं त्यांनीं केलेलें लेखन, आजच्या स्थितींतहि आपल्या दृष्टीनें किती मौलिक व मौल्यवान आहे याची वाचकाला सहज कल्पना येईल. गेल्या महायुद्धानंतरची परिस्थिती व त्यावरील उपाय या संबंधींचें काकासाहेबांचें विवेचन आजच्या स्थितींतहि जसेच्या तसें लागूं पडण्यासारखें आहे. पंचवीस वर्षांनंतर पुनः तेच प्रश्न आपल्यापुढें उभे आहेत. इतिहासाच्या पुनरावृत्तीच्या सिद्धांताची सत्यता येथें पुरेपूर पटते.

पुस्तकांतील कांहीं लेखांत काकासाहेबांनीं आपल्या भारतीय संस्कृतीचें काव्यमय वर्णन केलें आहे. कांहीं दोष आढळल्यास ते खास अनुवादकाचे आहेत असें समजण्यास मुळींच हरकत नाहीं. दोषाबद्दल वाचकांनीं एकच गोष्ट लक्षांत घ्यावी कीं, आम्ही दोघेहि—पूज्य काका व मी स्वतः—आज कृष्णमंदिरांत आहोंत.

अनुवादाची भाषा कितपत साधली आहे हें वाचकांनींच ठरवावयाचें आहे. माझ्या भाषेंत जर कांहीं चांगले गूण उतरले असतील तर

त्याचें श्रेय माझे मित्र श्री. स. वि. ऊर्फ बापू जोशी यांनाच आहे. कारण मी हा अनुवाद खूप घाईघाईत कसातरी हातावेगळा केला होता. त्यामुळें त्यांत खूपच उणीवा राहून गेल्या होत्या. मुद्रणप्रत तयार करण्याचें किचकट कामहि बापूनींच केलें आहे.

अनुवाद करतेवेळीं माझे तुरुंगांतील बालमित्र श्री. मधु कुलकर्णी व श्री. अण्णा फणशे यांचें मला खूपच साहाय्य झालें आहे. त्याबद्दल त्या दोघांचेहि मी मनापासून आभार मानतों.

प्रकाशकांचे आभार मानणें कदाचित् औपचारिकतेचें होईल.

१८६५
कार्तिकी एकादशी
कृष्णमंदिर, येरवडा.

— श्रीपाद जोशी.

---

सूचना—

पान ३५ च्या शेवटीं “ साम्राज्य यायचेंच.” असें वाचावें.

# ★ जीवन संस्कृति ★

| | |
|---|---|
| संस्कृतीचा विस्तार | १ |
| साहचर्य | ६ |
| युरोपपुढील यक्ष प्रश्न ! | ११ |
| आशियाचें ऐक्य | १६ |
| आशियाची साधना | १८ |
| भारताची समस्या | २४ |
| आपलें राष्ट्रीय ध्येय | २८ |
| आशियाचा प्रभातकाल | ३१ |
| लोकसत्ता | ४१ |
| आपला अमर वारसा | ४९ |
| आर्य संगीत | ६० |
| शिल्प आणि स्थापत्य | ६४ |
| सहा चाकांचें जग | ७२ |
| सुताराचीं अवजारें | ७७ |
| नव युग | ८१ |
| जगद्व्यापी परिवर्तन | ८३ |

## — आमचें प्रकाशन —

| | | |
|---|---|---|
| १ | उमज पडेल तर | ना. ह. आपटे |
| २ | बाल सुहृद् | गो. रा. चोळकर |
| ३ | जांवई | गं. ल. देवधर |
| ४ | मातृमंदीर | सौ. मालतीबाई दांडेकर |
| ५ | पद्यमीमांसा | वि. ज. सहस्त्रबुद्धे |
| ६ | आघाडीवर | व्यं. रा. खंडाळीकर |
| ७ | धर्मवीर संभाजी | गणपतराव बोडस |
| ८ | पहिलें पाऊल | कामत |
| ९ | प्रतिमा | सौ. मालतीबाई दांडेकर |
| १० | इच्छा | श्री. वर्टीकर |
| ११ | अग्नियान | कुमारी प्रेमा कंटक |
| १२ | माझी जमीन | कै. फाटकशास्त्री |
| १३ | विवाहितांचें नंदनवन | राजरत्न वा. वि. जोशी |
| १४ | राष्ट्रधर्म | साने गुरूजी |
| १५ | संसारांत पडण्यापूर्वी | ना. ह. आपटे |
| १६ | आह्वान | पं. जवाहरलाल नेहरू |
| १७ | विद्यार्थ्यांशीं हितगुज | महात्मा गांधी |
| १८ | महागाई कां ? | श्री. रा. पोतनीस |
| १९ | तेजस्विनी | सौ. मालतीबाई दांडेकर |
| २० | समाजधर्म | साने गुरूजी. |
| २१ | जीवन संस्कृति | काका कालेलकर |

★ महाराष्ट्र ग्रंथ-भांडार कोल्हापूर ★

१००२

# १ : संस्कृतीचा विस्तार

वृक्ष आपापल्या जागींच राहतात. परंतु वायू त्यांची बीजें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं उडवून लावतो. फूल आपल्या जागेवरच राहतें. परंतु पतंगांच्या पायाला फुलाचे पराग जे चिकटून राहतात, त्यांच्यायोगें दूर-दूरच्या फुलांत असलेल्या पूंकेसर आणि स्त्रीकेसरांचा संयोग होतो. आणि अशाप्रकारें पुष्पसृष्टीचा विस्तार होत असतो. मानवी संस्कृतीचेंहि असेंच आहे. मनुष्यामध्यें दोन्ही वृत्ति दिसून येतात—स्थिर आणि अस्थिर. जीं माणसें स्थिर प्रवृत्तीचीं असतात तीं एकाच जागीं राहतात. त्यांच्यामध्यें सरंक्षकवृत्ति विशेष असते. स्थिर लोक पुराणप्रिय असतात. शांतीचे उपासक असतात. अस्थिर प्रवृत्तीच्या लोकांचें याच्या अगदीं उलट असतें! त्यांच्यांत स्थिरता नसते. वाटेल तितका फायदा होत असला तरी जंगम मनुष्य एका जागेला कधींहि चिकटून राहायचा नाहीं. स्थावर मनुष्याचा धंदा शेती आहे, जंगम मनुष्याचा धंदा शिकार अथवा पशुपालन आहे. शिकार ही जंगली स्थिति आहे. पशुपालन ही त्याहून सुधारलेली अवस्था आहे. स्थावर व जगम दोन्ही वृत्ती ईश्वरनिर्मित आहेत. दोहोंच्या द्वारें ईश्वरी-हेतूच सफल होत असतो. हें तत्त्व ध्यानांत ठेवून आपण भिन्न भिन्न संस्कृतींचें अध्ययन करूं.

जगांत मुख्यतः तीन संस्कृती पाहण्यांत येतात. हिंदू, मुसलमानी व खिस्ती. या संस्कृतींना जरी त्या त्या धर्मांचीच नांवें दिलेलीं आहेत, तरी-पण धर्म आणि संस्कृति या दोन्ही वस्तू एकच आहेत असें नाहीं. येवढें ध्यानांत ठेवल्यास येथें मांडलेल्या विचारांत घोटाळा आहे असें वाटणार नाहीं.

मुसलमानी संस्कृति अरबांच्या तंबूमध्यें निर्माण झाली आणि

घोड्याच्या पाठीवरून तिचा विस्तार झाला. जेथें जेथें घोडा पोहोंचूं शकला तेथें तेथें इस्लामी संस्कृति गेली. प्रत्येक जन्म ज्याप्रमाणें दोन व्यक्तींच्या संयोगानें होतो, त्याप्रमाणेंच संस्कृतीचेंहि आहे. मुसलमानी धर्माच्या अरबी वीर्याचा इराणी संस्कृतीशीं संयोग झाला आणि इस्लामी संस्कृति निर्माण झाली.

आतां ख्रिस्ती संस्कृतीकडे वळूं. ख्रिस्ती संस्कृतीचा जन्म भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावर झाला आहे; आणि तिचा प्रसार समुद्राच्या देहावर फिरणाऱ्या नौकांच्याद्वारें झाला आहे. ख्रिस्ती धर्माच्या तत्त्वाला ग्रीक संस्कृतीचें पोषण मिळालें आणि पुढें रोमन संस्कृतीच्या आखाड्यांत शिकून तो तयार झाला. ख्रिस्ती संस्कृतीवर मातापित्यांपेक्षां गुरुच्या शिकवणीचा परिणाप अधिक झालेला दिसून येतो. जेथें जेथें नौका जाऊं शकते तेथें तेथें या संस्कृतीचा विस्तार झालेला आहे.

तिसरी संस्कृति म्हणजे आपली हिंदू संस्कृति ! मुसलमानी संस्कृतीचें चित्र तंबूच्या शेजारीं घोडा बांधून दाखवितां येईल, ख्रिस्ती संस्कृतीचें चित्र समुद्रावर डोलणाऱ्या नौकाद्वारें व्यक्त करतां येईल आणि हिंदु संस्कृतीचें चित्र एकाद्या वटवृक्षाखालील झोपडीजवळ गाय बांधून दर्शवितां येईल. आर्य धर्माचा द्राविडी वगैरे संस्कृतीशीं विवाह झाला आणि त्यामधून हिंदू संस्कृति निर्माण झाली आहे.

ख्रिस्ती संस्कृतीचा प्रसार करण्यासाठीं होडी आहे, मुसलमानी संस्कृतीचा प्रसार करण्यासाठीं घोडा आहे. हिंदू संस्कृतीचा प्रसार करणारे कोण आहे ? जंगलें नाहीशीं करून शेती आणि शहरें स्थापन करणाऱ्या आर्यांनीं हिंदू संस्कृतीचा थोडाफार विस्तार केला खरा, पण हिंदूसंस्कृतीचा विस्तार करणारा खरा प्रचारक म्हणजे झोंपडीवर उगवलेल्या कडू भोपळ्याचेंच भिक्षापात्र बनवून, शरीरावर धारण केलेल्या वस्त्रांना लाल मातीनें ( गेरुनें ) रंगवून ' न धनेन न प्रजया त्यागेनैकेन अमृतत्त्वमानशुः ' म्हणून धर्म आणि अमृतत्त्व यांचा प्याला जगाला पाजविण्यासाठीं बाहेर पडणारा सर्वसंग परित्यागी परिव्राजकच होय. या मार्गाच्या आद्य परिव्राजकानें फक्त उत्तर भारतांतच विहार केला. परंतु त्याच्या शिष्यांनीं ' अक्रोधेन जिने क्रोधम् ' म्हणत म्हणत साऱ्या युरेशियाला व्यापून टाकलें.

विविधता हा सृष्टीचा मूलमंत्र आहे. एकाच संस्कृतीचा प्रसार साऱ्या जगांत व्हावा अशी इतिहास विधात्याची इच्छा नाहीं. विविधतेमध्यें एकता प्रस्थापित करणें यांतच विधात्याचा आनंद आहे. ज्याला एकांगी साक्षात्कार झालेला आहे त्याला हें तत्त्व समजत नाहीं, आणि म्हणून आपल्याच तत्त्वाचें सार्वभौमत्व प्रस्थापित करण्यासाठीं तो बाहेर पडतो. शिवाय हा प्रचारक नेहमीं निस्वार्थीच असतो असें नाहीं.

नूतन तत्त्वप्राप्तीचा पुत्रजन्मोत्सवासारखा आनंद जेव्हां पोटांत सामावूं शकला नाहीं तेव्हां मुसलमानी धर्म साऱ्या विश्वांत पसरविण्यासाठीं इस्लामी धर्मवीर पुढें आले. आसपासच्या जंगली जातींना इस्लामी धर्माची महती सहजा सहजीं पटली आणि ते त्यांत मिसळून गेले. दुसऱ्या बाजूनें मुसलमानांनीं इराणी संस्कृतीचा स्वीकार केला. पण मुसलमानी धर्माला आलमगीर ( सार्वभौम ) बनवावयाचें असेल तर हिंदू आणि ख्रिस्ती या पूर्व आणि पश्चिमेचीं टोकें संभाळून राहिलेल्या दोन्ही संस्कृतीवर सुद्धां विजय मिळवावयास हवा होता. योगयोग असा कीं हिंदुस्थान आणि युरोप या दोन्ही ठिकाणीं संघशक्ति नष्ट झालेली होती. युरोपांत लहान लहान राष्ट्रें एकमेकांशीं लढून मरत होतीं आणि हिंदुस्थानांत अनेक जाती आणि राजे " मी मोठा कीं तूं मोठा ? " म्हणून आपापसांत कलह माजवून कालक्रमणा करीत होते. स्वाभाविकपणेंच साहसी मुसलमानांना तलवार आणि व्यापार यांच्या जोरावर कुराणाचा प्रसार करणें सोपें गेलें. मुसलमानांनीं स्पेनमध्यें अल्हम्ब्रा ( लाल महाल ) आणि आग्र्यास ताजमहाल बांधला. ताजमहाल कितीहि सुंदर असला तरी शेवटीं ती एक कबरच आहे. मुमताज बेगमेलाच नव्हे तर मुसलमानी संस्कृतीच्या विस्ताराला देखील त्याच्या गर्भांत दफन करण्यांत आलें.

युरोपांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार तर खूपच झाला होता, परंतु ख्रिस्ती धर्माचें विनम्रतेचें नीतिशास्त्र युरोपियन लोकांच्या गळीं कधींहि उतरलें नव्हतें. एका गालावर थप्पड बसली कीं दुसरा गाल पुढें करण्याची तयारी युरोपांत कधींच नव्हती. अशा स्थितींत मुसलमानी तलवारींचा मारा सुरु होतांच युरोपांत असलेली क्षात्रवृत्ति उसळून वर आली. आणि झालें-

मेन राजाच्या वेळेपासून आजच्या घटकेपर्यंत मुसलमानी सत्तेला धक्के देत देत युरोपच्या बाहेर हांकून काढण्याचा युरोपियन जनतेचा प्रयत्न चालू आहे. आतां तर मुसलमानी संस्कृतीला युरोपच्या बाहेर हांकून युरोपियन राष्ट्रें संतोष मानून स्वस्थ बसतील असा रंग दिसत नाहीं. आफ्रिका खंडांत खिस्ती आणि मुसलमानी हे दोन्ही धर्म आपापला विस्तार करण्यास झटत आहेत. त्यांत खिस्ती लोकांपेक्षां मुसलमानांना जास्त सफलता मिळत आहे हें पाहून खिस्ती लोकांना फार दुःख होतें. बहुतेक मुसलमानी राष्ट्रांना युरोपच्या जनतेनें आज व्यापून टाकलें आहे. याचा परिणाम म्हणजे केव्हांना केव्हां तरी मुसलमान राष्ट्रें फिरून जिवंत होऊन खिस्ती राष्ट्रावर हल्ला केल्याशिवाय राहणार नाहींत. आघात व प्रत्याघाताच्या निर्दय नियमाच्या कचाटींत सांपडलेल्या या दोन संस्कृती कोठपर्यंत अशाच लढत राहणार हें सांगतां यावयाचें नाहीं. उत्साहाच्या पहिल्या वेगांत साऱ्या जगास जिंकण्यासाठीं बाहेर पडलेल्या मुसलमानी संस्कृतीला युरोपांत जसा शह मिळाला आणि तिचा गर्वज्वर उतरला त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत मुसलमानी सत्तेला शीख आणि मराठे यांच्याकडून जोराचा विरोध केला आणि येथेंहि मुसलमानी संस्कृतीचा अभिमान जिरविला गेला. "तुमचा धर्म तुम्ही पाळा आमचा आम्ही पाळूं." हें हिंदुधर्मातील स्वधर्म–रहस्य मुसलमानांना समजलें आह असें दिसतें. कुराणांतसुद्धां असें एक वचन आहे कीं, "तुम्हाला तुमचा धर्म आणि आम्हाला आमचा धर्म." सद्धर्मि (?) कट्टर मुसलमान याचा अर्थ काय करतात त समजून घेतलें पाहिजे.

खरें पाहिल्यास खिस्तीधर्मांत लढाईला स्थानच नाहीं. पण मुसलमानी धर्मांत धर्मप्रसारासाठीं लढणें हें पुण्यप्रद इतकेंच नव्हे तर कर्तव्य मानलें आहे. हिंदुधर्मानें मधला मार्ग स्वीकारला आहे. हिंदुधर्मांत धर्मानुकूल रक्षण करण्यासाठीं युद्ध विहित मानलें आहे. आत्मरक्षणासाठीं किंवा धर्मरक्षणासाठीं करावयाच्या युद्धास हिंदू धर्म "यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम्" असें समजतो. That thou mayest injure none, dove like bee, and serpent–like that none may injure thee. या बायबलाच्या वचनांत हिंदूतत्त्व यथास्थित वर्णिलेलें आहे. हिंदूलोकांनीं

आपल्या बचावाचा प्रयत्न केला आहे पण सूड उगविण्याची बुद्धि त्यांना कधींहि झालेली नाहीं; म्हणूनच आज हिंदू मुसलमान एकत्र राहण्याची शक्यता आपल्याला वाटूं लागते.

पाश्चात्य संस्कृति अर्थप्रधान आहे. हिंदू आणि मुसलमान संस्कृतींनीं जीवनाच्या आर्थिक बाजूकडे लक्षच दिलें नाहीं. त्याचें प्रायश्चित्त म्हणून दोघांनाहि आज पाश्चात्य सत्तेच्या पाशांत अडकून पडावें लागलें आहे. जीवन परिपूर्ण करावयाचें असेल, पारमार्थिकाबरोबर ऐहिक कल्याण साधावयाचें असेल तर श्रीवेदव्यासांनीं म्हटल्याप्रमाणें " धर्मार्थकामाः सममेव सेव्याः"

आपण यांपैकीं एका अंगाकडे दुर्लक्ष केलें. स्वखुषीनें ज्या अंगाचें अनुशीलन आम्ही केलें नाहीं त्याचें अनुशीलन पराभव आणि पारतंत्र्य यांच्या कठोर शाळेंत ईश्वरानें आपल्याकडून करविलें. पॅनइस्लामिकवाले कांहींहि म्हणोत, पण मुसलमानी संस्कृतींत जहांगीर (विश्वविजयी) बनण्याचा जोर आतां उरलेला नाहीं. हिंदूनीं ज्याप्रमाणें वैराची बुद्धि न ठेवतां बचावापुरताच विरोध केला त्याप्रमाणें आज हिंदू मुसलमानांनीं एक होऊन सात्त्विक वृत्तीनें व आत्मिक बल वापरून या अर्थपरायण पाश्चात्य संस्कृतीस विरोध केला पाहिजे.

या जंगम संस्कृतीचा तिसरा नमुना म्हणजे हिंदूधर्मामधूनच निघालेला बौद्धधर्म होय. या धर्मालाहि पहिल्यापासून विश्वविजयी होण्याची इच्छा होती. पण त्याचीं साधनें सौम्य आणि सात्त्विक होतीं. यामुळें त्याच्या विस्तारांत किंवा संकोचांत रक्तपाताची आवश्यकता भासली नाहीं. या धर्मांत सत्याचा जेवढा अंश आहे त्याचा आपोआप विस्तार होतो आणि भ्रामक कल्पना किंवा अहंकार आपोआप तळाला बसून जातात. ज्याप्रमाणें समुद्रांतील शुद्ध पाण्याची वाफ बनून आकाशांत उडून जाते आणि सारें मीठ खालीं राहतें त्याप्रमाणें बौद्धधर्माचें आजपर्यंत होत आलें आहे.

हिंदुस्थानच सर्व धर्मांचें आजोळ आहे. धर्मांची व्यवस्था करण्याची शक्ति हिंदुस्थानांत आहे. हिंदू संस्कृतींत जंगमापेक्षां स्थावर तत्त्व विशेष आहे. आणि मुख्य गोष्ट ही कीं, हिंदू संस्कृतींत अहंकाराला स्थान नाहीं. सर्व संस्कृतींच्या समन्वयाचा प्रथम प्रयोग परमेश्वर हिंदुस्थानांत करणार नाहीं तर दुसरीकडे कुठें करील ?

ता. २२-८-२०

# २ : साहचर्य

महाप्रजांची साठमारी जवळ येत आहे असें दिसतें; ती टाळणें शक्य आहे काय ?

हा विनाश ज्यांनीं दीर्घ दृष्टीनें कल्पनेमध्यें प्रत्यक्ष पाहिला आहे ते तो टाळण्याचा भगीरथ प्रयत्न करीत आहेत. ते फार थोडे आहेत. त्यांची वाणी आज अरण्यरोदनाप्रमाणें भासत आहे. पण त्यांच्या हृदयांत श्रद्धा पुरेपूर भरलेली आहे. जगन्नियंत्याची लीला अतर्क्य असेल पण ती मंगलमय आहे, कल्याणकारी आहे, ही श्रद्धा त्यांच्या हृदयांत दृढ आहे. या श्रद्धेला ते जें स्वरूप देऊं इच्छितात, तें जेव्हां प्रत्यक्षांत उतरत नाहीं तेव्हां तेहि घोटाळ्यांत पडतात परंतु आस्तिक-श्रद्धा अमर्याद असल्यामुळें नम्रतेनें ते म्हणतात, कसें तें आम्हांला माहीत नाहीं; परंतु विग्रहांतून शांतीचा उदय होईल, स्वार्थामधून देखील स्वात्मार्पण निर्माण होईल, अनंतकाळापासूनचा असंख्य सज्जनांचा त्याग, आणि सेवा हीं त्यांचीं स्वतःची उन्नति करण्यापलीकडे जास्त कांहीं करूं शकत नाहींत, असें मुळींच मानतां येणार नाहीं!"

ही अमर श्रद्धा हीच मोठी तपस्या आहे. तिच्या जोरावर भविष्याला मंगल स्वरूप धारण करणें भागच पडेल.

मनुष्याच्या विकासाचा अभूतपूर्व काळ जवळ येऊं लागला आहे. मानवाचें चरित्रबल, ज्ञानबल आणि कर्मबल तीन संस्थांत एकत्रित झालें आहे; जाति, संस्कृति आणि धर्म या तीन गोष्टी मानव जातीच्या मोठ्यांत मोठ्या आणि अति मौल्यवान संस्था आहेत. मनुष्य समाज कधीं जातीला, कधीं धर्माला आणि कधीं संस्कृतीला प्राधान्य देतो. या तिन्ही गोष्टी वस्तुतः

भिन्न नाहींत. एकाच मानवी जीवनाचे हे तीन पैलू आहेत. प्रत्येक बाजू पाळीपाळीनें पुढें येऊन त्या त्या दिशेनें उन्नत्ति साधण्याचेंच काम करीत असते.

मनुष्य जातीचा आत्मा एक आहे, हृदय एक आहे, बुद्धि एक आहे आणि रुधिरांतसुद्धां एकच घटक आहेत. तरीहि सहज ध्यानांत येतील असे मनुष्य जातीचे अनेक विभाग पडलेले आहेत. ईश्वराच्या कांहीं अतर्क्य योजनेनें हे विभाग कधींकधीं वेगळे होऊन आपली स्वतंत्र उन्नति साधतात आणि कधींकधीं जवळ येऊन एकमेकांवर प्रभाव पाडून एकमेकांत नाविन्य आणतात. दोन्ही क्रिया इष्ट आहेत, हितकर आहेत. त्या त्या काळीं दोहों-पैकीं एकाचा उत्कर्ष होतच असतो.

दोन जाती, धर्म अथवा संस्कृति जेव्हां जवळ जवळ येतात तेव्हां तेथें शांति राहूं शकत नाहीं. एक संस्कृति दुसरीला हाकलून लावूं इच्छिते, नेस्तनाबूद करूं इच्छिते किंवा गिळून टाकूं इच्छिते. तसें न झाल्यास कधीं-कधीं तेलपाण्याप्रमाणें अलग अलग राहूं इच्छितात. आणि कधीं दूध व पाण्याप्रमाणें एकरूप होऊन जातात. परंतु दोन्ही मिळून एक झाल्याचीं उदाहरणें मात्र फार थोडीं आहेत. दोन्ही एके ठिकाणीं आल्या म्हणजे एक-मेकांवर परिणाम करून सुद्धां दोन्ही भिन्न राहतात व नवेंच रूप धारण कर-तात. दोन रसायनांच्या संयोगानें ज्याप्रमाणें त्या दोन्हीहून अगदीं वेगळा असा नवीनच तिसरा पदार्थ तयार होतो, त्याप्रमाणें संस्कृतीचेंहि होत असतें.

संस्कृतींचा संबंध हा विवाह-संबंधासारखा आहे. आपल्या धर्मशा-स्त्रकारांनीं विवाहाचे आठ प्रकार सांगितले आहेत. शिष्ट, संस्कारी आणि धर्मप्रधान असे संबंध चार आणि अशिष्ट, कुसंस्कारी व अधार्मिक म्हणजेच प्रकृतिपरायण असे संबंध चार. संस्कृतींच्या संबंधांच्या बाबतींत मनुष्य जात अजून असंस्कारीच राहिलेली आहे. यामुळें राक्षस किंवा पिशाच्च विवाहाच्या प्रथेशीं संस्कृतींच्या संबंधांचें साधर्म्य दिसून येतें. राक्षसो युद्ध हरणात् पैशाचः कन्यकाछलात् ।

विजेते नेहमीं असें मानतात कीं आम्ही यशस्वी झालों, परंतु युद्ध आणि कपट यांच्यामुळें एकत्र आलेल्या संस्कृतींत परस्परांचे दोष एकमेकींत उतरल्याशिवाय राहात नाहींत. या नियमामधून कोणतेंहि राष्ट्र सुद्धं

शकत नाहीं. परंतु जित लोकांनीं मात्र असें निंद्य समाधान मानून घेण्यांत कांहीं स्वारस्य नाहीं. आमचे विजेते आमच्या दोषाच्या संसर्गानें बिघडून जातील. आणि शेवटीं त्यांचाहि अधःपात होईल. माझ्याबरोबर तुझाहि विनाश होईल असें म्हणून समाधान मिळविणें हा कापुरुषाचा स्वभाव आहे. स्वतःच्या जीवनाचा उत्कर्ष साधणें आणि दुसऱ्याचा उत्कर्षांत नम्रपणें साहाय्यभूत होणें यांतच मोठेपणा आहे.

व्यक्तीच्या बाबतींत असो किंवा समाजाच्या बाबतींत असो जीवनाचे तीन प्रकार आहेत. दुसऱ्याला मारून जगणें हा प्रकार सर्वत्र आहेच. यालाच जीवन म्हणतात. या प्रकारानें जीवन टिकतें किंवा फार तर विस्तार पावतें एवढाच यांत फायदा आहे. परंतु त्यांत जीवनसाफल्य नाहीं. दुसरा प्रकार म्हणजे परस्पर सहकाराचा. प्रत्येक जाति, राष्ट्र किंवा धर्म वैशिष्ट्यामुळेंच एकांगी असतात. एकमेकांच्या सहकारानें हा एकांगीपणा पुष्कळच नाहींसा होतो, आणि त्यामुळें जीवनाचा विकास होतो. यांत जीवनाचा उत्कर्ष आहे पण त्यांत जीवनाचें सर्वोच्च सार्थक्य दिसून येत नाहीं. जीवन हें शेवटीं आत्मसाक्षात्काराचें साधनच आहे. हें सार्थक्य ध्यानांत आणल्यावर आत्मार्पणासाठीं जगणें हा तिसरा प्रकार मनुष्य हृदयाला स्फुरतो. या स्वार्पणाच्या द्वारें जें जीवन प्राप्त होतें तें कांहीं वेगळेंच असतें. त्यांतूनच जीवनाचा परम उद्देश समजतो आणि सफल होतो.

पहिल्या प्रकारांत जेव्हां दुसऱ्याला मारुन जगण्याचा रिवाज असतो तेव्हां भक्ष्य बनलेल्या पक्षांत जगण्याची इच्छा प्रबळ होते. म्हणूनच तो आपल्या दयेस पात्र होतो. जगण्याची इच्छा कोणाला नसते ? जगण्याचा प्रयत्न नेहमीं समभाव आणि आदर उत्पन्न करतो. प्राण वाचविण्यासाठीं लढणाऱ्याचा पक्ष नेहमीं न्यायाचाच असतो. या लढाईत जर त्याला विजय प्राप्त झाला तर त्यामुळें त्याच्यांत असाधारण शक्ति येते. ही शक्ति जर, आपला धर्म समजून घेऊन शुद्ध सहकारासाठीं आणि धर्महितासाठीं वापरण्यांत आली तरच ठीक; पण येथपर्यंत मनुष्यजाति अजून पोहोंचली नाहीं. जे आधीं जगूं इच्छीत होते ते आतां जिंकू इच्छीत आहेत. जिजीगिषेमधून विजिगीषा उत्पन्न होते आणि अधःपाताची बीजें पेरलीं जातात.

विजिगीषु धर्मामध्यें हाच क्रम आपण पाहतो. लौकिक जीवनांत देखील प्रत्येक वर्गांत हाच दोष दिसून येतो. जो समर्थ होतो तो धर्म विसरून जातो. समर्थो धर्ममाचरेत् । ह्या वचनाच्या मुळाशीं कांहींहि अर्थ असो. परंतु आपण या सूत्राचा अर्थ अशाप्रकारें करूंया कीं समर्थ झाल्यानंतर विशेषेंकरून धर्माचें रक्षण केलें पाहिजे. धर्माचा घात करूं गेल्यास स्वतःचाच नाश होतो. धर्मामधून यथाक्रम आणि यथाशक्ति अर्थाची आणि कामाची प्राप्ति होऊं शकते, परंतु आंधळा काम आणि उतावळा अर्थ हे धर्मालाच खाऊन टाकतात आणि शेवटीं स्वतः मारले जातात.

पण शेवटीं म्हणजे केव्हां ?

भोगाबरोबरच रोगाचीं बीजें पेरलीं जातात. परंतु त्याचा परिणाम लगेच दिसून येत नाहीं. यामुळें लोकांना वाटूं लागतें कीं, अधर्मामुळें माणसाचें नुकसान होतेंच असें नाहीं. उलट चांगली चैन चालते, धर्म हा भ्याडासाठीं आहे. या भ्रमाचें कारण म्हणजे आंधळा स्वार्थ आणि अज्ञानजन्य संकुचितता. सुख कशांत आहे, प्रगति कशी ओळखावयाची, सत्तेचें अंतिम फल काय या विषयींच्या माणसाच्या कल्पना अजून जंगली अवस्थेच्याच निदर्शक आहेत आणि म्हणूनच मानवजातींतील कलह प्रवृत्ति अद्याप नष्ट झालेली नाहीं.

आजची संस्कृति कौशल्यप्रधान आहे. ज्ञानाचें क्षेत्र वाढविणें, त्याच्याद्वारें कौशल्य प्राप्त करून घेणें, सत्ता हस्तगत करणें, ती टिकविणें, वाढविणें आणि शेवटीं अमर्याद भोग भोगणें हीच तिची परिणति आहे. जेव्हां ज्ञानाचा पूर्ण विकास होईल आणि त्याच्या अनुषंगानें हृदयाचा विकास होईल, कौशल्य परोपकारी होईल, सत्ता सेवेमध्यें वापरली जाईल आणि सार्वत्रिक उत्कर्षामुळें दैन्याऐवजीं प्रसन्नतेचें वातावरण सर्वत्र फैलावेल तेव्हां नवसंस्कृतीचा उदय होईल. याच दिशेनें कांहीं लोकांचे प्रयत्न चाललेले आहेत. परंतु विजिगीषु लोकांच्या हें लक्षांत येत नाहीं. उलट दुःखाची गोष्ट ही कीं जिजीविषु लोक देखील त्याच्याकडे लक्ष देत नाहींत; या दोहोंची पकड ढिली करण्यासाठीं झटणारे लोक दोघांनाहि अप्रिय वाटूं लागतात.

जीवन रहस्याच्या तीन कल्पनांना अनुसरून तीन मुख्य संस्कृति

जगांत अधिकार भोगीत आहेत. आर्य संस्कृति, ( पारशी, हिंदु, बौद्ध वगैरे सर्वांचा यांत समावेश होतो. ) इस्लामी आणि खिस्ती. या तिन्ही संस्कृतींचें शुद्ध स्वरुप पाहिल्यास त्यांच्यामधील भेद स्पष्टपणें दिसून यतो. तरीपण त्यांच्यांत विरोध कां असावा याचें कारण सांपडत नाहीं. मनुष्य जोंपर्यंत असें म्हणत असतो कीं माझी गोष्ट बरोबर आहे, चांगली आहे तोंपर्यंत तो नीट मार्गावर आहे असें म्हणावयाला हरकत नाहीं. परंतु जेव्हां " माझ्याहून जे वेगळे आहेत त्यांची गोष्ट चुकीची आहे, वाईट आहे " अशी त्याची भावना होऊं लागते तेव्हां तो द्रोह करण्यास प्रवृत्त झाला आहे असें समजण्यास हरकत नाहीं. अज्ञानांत जितका अभिमान दिसून येतो तेवढा इतरत्र कोठें असणार ? संकुचित हृदयांत जेवढें क्रौर्य असतें तितकें दुसरीकडे कुठें असणार ? स्वार्थामध्यें जितका आत्मघातकी खादाडपणा असतो तितका इतरत्र कोठें आढळणार ?

हें सर्व कसें टाळतां येईल ? त्यासाठीं मानवाच्या दृष्टींत परिवर्तन होणें आवश्यक आहे. त्याची जीवनाविषयींची कल्पना शुद्ध झाली पाहिजे. एकमेकांना समजून घेण्याइतका समभाव त्याच्यांत आला पाहिजे. कोणालाहि डरणार नाहीं आणि कोणालाहि भिवविणार नाहीं अशा तऱ्हेचें द्विविध अभय त्याच्यांत आलें पाहिजे. आणि शिक्षणाबरोबर समभाव आणि संतोष यांचा आनंद माणसानें चाखला पाहिजे. संतोष हा शब्द मिळमिळीत वाटत असेल, त्यांत पराक्रम दिसत नसेल, परंतु अखेर त्यांतच पुरुषार्थ आणि श्रेय हीं आहेत.

> यत् पृथिव्यां व्रीहीयवं हिरण्यं पशवः स्त्रियः
> एकस्यापि न पर्याप्तं तस्मात् तृष्णां परित्यजेत् ।

मानव पिता मनूनें म्हटलें आहे.

> अधर्मेणैधते तावत्ततो भद्राणि पश्यति ।
> ततः सपत्नान् जयति समूलस्तु विनश्यति ।

उन्मत्त माणसाला असें वाटतें कीं या सर्व सौम्यप्रकृति साधुपुरुषांच्या सदिच्छा आहेत, आपण त्यांचें सहज उल्लंघन करूं शकूं. भल्या भल्या सम्राटांनीं हा प्रयत्न करून पाहिला आहे आणि अजूनहि मोठमोठीं साम्राज्यें हा प्रयोग करून पाहतील. पण—

नि. ८-१०.

## ३ : युरोपपुढील यक्ष प्रश्न !

हें घातकी युद्ध खेळल्यानंतर पाश्चात्य राष्ट्रांच्यापुढें जे कांहीं महान प्रश्न उभे राहिले आहेत त्यामध्यें पुढील प्रश्न असणें स्वाभाविक आहे. ( १ ) गोऱ्या लोकांच्यामध्यें अशा तऱ्हेची यादवी पुनः पेटणार नाहीं यासाठीं काय करावें ? ( २ ) त्या दृष्टीनें युरोपशिवाय जगांतील इतर प्रदेशांची वांटणी कशाप्रकारें करावयाची ? परंतु युरोपांतील आजच्या समाजाची स्थिति ज्यांना माहीत नाहीं अशांना घोटाळ्यांत पाडणारी एक तिसरीच गोष्ट आहे. आणि ती म्हणजे वरील दोन्ही प्रश्नांना गौण पद देणारा मालक व मजूरांचा प्रश्न होय. सर्वियानें ऑस्ट्रीयन राजपुत्राचा खून केला तो कांहीं या प्रश्नाचा निकाल लावण्याच्या हेतूनें नव्हे. कार्पेथियन पर्वतांच्या आसमंतात् रशियनांनीं आपल्या व शत्रूच्या सैनिकांच्या हाडांचे जे डोंगर रचले त्यामुळें देखील हा प्रश्न सुटूं शकला नाहीं. इटलीयनांनीं जर्मनीची मैत्री सोडून दोस्तांशीं सख्य केलें त्यावेळीं त्यांच्या डोळ्यासमोर हा प्रश्न होता असेंहि नाहीं. मजूरांच्या आठवड्याच्या अठ्ठेचाळीस तासांच्या कामामधून चार तास कमी व्हावेत म्हणून कांहीं फ्रान्सनें आपले विश्वविख्यात विलासी जीवन दूर सारून शिपाईगिरी पत्करली नव्हती. युरोपांतील मजूरांना दुपारची अर्ध्या तासाची सुटी मिळावी म्हणून कांहीं विड्रो विल्सननें अमेरिकेमधून लक्षावधी यांकी धाडून देऊन लढाईचें पारडें फिरवून टाकलें नव्हतें. हें सर्व ठीक, पण स्वतः कैसर तरी कधीं म्हणत होता कीं मजूरांची उपासमार व्हावी ? वॅग्नरनें सुचविलेल्या सुधारणामध्यें संतोष मानणाऱ्या बिस्मार्कला बाजूस सारून कैसरनें मजूरांचाच पक्ष उचलून धरला होता; इतकेंच नव्हे तर जर्मनीनें मजुरांच्या सुखासमाधानासाठीं

जितकी खबरदारी घेतली आहे, तितकी इतर देशांनीं घेतली असेल किंवा नाहीं याविषयीं शंकाच आहे. तर मग या तहपरिषदेंत मजुरांचा प्रश्न इतका अगत्यपूर्वक चर्चिला जात आहे याचें कारण काय ?

खरी गोष्ट अशी आहे कीं रणसंग्रामांत ज्यावेळीं तोफांचा गडगडाट चालू होता त्यावेळीं युरोपच्या सामाजिक परिस्थितींतदेखील एक प्रकारचें दुसरें महायुद्ध सुरू होतें. आणि जणूं काय जादूच्या कांडीनेंच निर्माण करावी अशी एक अपूर्व क्रांति होऊं घातली होती.

ज्या दिवशीं युरोपनें रोमन कॅथॉलिक धर्म सोडून दिला त्या दिवसापासूनच युरोपीयन समाजांत जें एक प्रकारचें स्थैर्य होतें तें निघून गेलें. कॅथॉलिक धर्माच्या काळांत अनेक लढाया झाल्या असतील, खून मारामाऱ्या सुद्धां दिवसाढवळ्या झाल्या असतील, समाजाचा मोठा भाग अज्ञान पंकांत रुतलेला असेल, सर्व कांहीं असेल परंतु युरोपच्या समाजरचनेंत स्थैर्य होतें. धर्मव्यवस्था ढोंगी, स्वार्थी आणि ठग लोकांच्या हातीं गेली असेल, परंतु धर्मतत्त्वें इंद्रियनिग्रहाला वासनांचा संयमच इष्ट आहे असें मोठमोठ्यानें गर्जून सांगत होतीं. धर्मांत सुधारणा करण्यासाठीं लोकांनीं पोपविरुद्ध बंड केलें व अनाचार आणि ढोंग यांना पायबंद घातला हें खरें परंतु, त्याचबरोबर धार्मिक आणि सामाजिक बंधनाचा जो पाया होता तो देखील खिळखिळा केला गेला. स्पेन्सरनें म्हटल्याप्रमाणें धर्मामधून, शिक्षणामधून आणि त्याचाच परिणाम म्हणजे जीवनामधून संयमवृत्तीला (Asceticism) कायमची रजा मिळाली आणि स्वच्छंदाच्या घोषणा युरोपच्या आकाशांत दुमदुमूं लागली. भोगविलासाचें मान याप्रमाणें वाढलें तेव्हां सर्व सामाजिक शक्ति त्याच्याच वृद्धीसाठीं वापरण्यांत येऊं लागली. तार्किकांची तर्कशक्ति शास्त्रज्ञांचे शोध, साहसी प्रवाशांचें साहस या सर्वांचा उपयोग विलासपणाच्या सेवेंत होऊं लागला. सत्ता आणि विलासिता या दोन देवींची उपासना करतां करतां सगळा युरोप आणि त्याचें बलिष्ठ बालक अमेरिका हे मोहमयी प्रमाद-मदिरा पिऊन तर्र बनले. आणि मग जो मनुष्य व जो वर्ग या देवींची सांगोपांग उपासना करूं शकेल त्यालाच पुजारीपणाचा मान मिळूं लागला. युरोपांतील जुन्या काळचे झगडे क्षत्रीयाक्षत्रीया-

मध्यें अथवा ब्रह्मतेज आणि क्षात्रतेज यांच्यामध्यें होत. ज्याप्रमाणें ब्राम्हण एकाद्या वेळीं राजाला उद्देशून आज्ञा देत कीं 'एष पापो हन्यताम् हन्यताम्।' त्याचप्रमाणें पोप महाराज युरोपांतील वाटेल त्या राजांवर बहिष्कार घालीत. सुधारणा सुरू झाली, आणि यमाच्या दरबारांत जाऊन ज्याप्रमाणें कैफ म्हणाला कीं "निघा सगळे येथून, तुमचें कोणाचेंहि काम नाहीं. महाराजांची सेवा करण्यास मीच एकटा लायख आहे." त्याचप्रमाणें समाजाच्या हृदयमंदिरांत सत्ता आणि विलासिता या दोन देवतांची प्राणप्रतिष्ठा होतांच वैश्य वर्ग पुढें झाला आणि त्यानें पाहतां पाहतां राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतली व युरोपांतील ब्राह्मण व क्षत्रियांना आपले आश्रित किंवा गुलाम बनविलें. एडमंड बर्कसारख्या मुनीनें The age of chivalery has gone असे उद्गार काढून अश्रूंच्या धारेसह पिंडदान केलें. त्यानंतर राजदरबारांत पदवी किंवा मानमरातब देतांना राजसत्तेनें "यस्यास्ति वित्तं स नर: कुलीन:।" या तत्त्वाचाच अंगीकार केला. आणि असें झाल्यामुळें स्वाभाविकपणें धर्म त्याच दिशेनें पाहूं लागला. समाजशास्त्र त्याच धोरणानें रचलें गेलें. सरकारचें कर्तव्य एकाच श्रुतिस्मृतीनें स्थिर केलें गेलें आणि तोच सामाजिक व वैयक्तिक पुरुषार्थ होऊन बसला. ज्याच्या हातांत संपत्ति त्याच्या हातीं सत्ता, हें तत्त्व युरोपांतील प्रत्येक राज्यव्यवस्थेच्या मुळाशीं आहे ही गोष्ट सर्वांना कबूल करावी लागेल. समाजांतून ब्राह्मणाची सात्त्विक वृत्ति व क्षत्रियाची उदारता यांचा लोप होतांच थोड्याच कालांत वैश्य वृत्तीनें सर्व समाजाला त्राहि त्राहि करून सोडलें; यांत आश्चर्य तें काय? शेक्स्पीयरनें कितीहि फजीती केली तरी 'तूं जग किंवा मर, मला माझें एक एक पौंड मांस मिळालेंच पाहिजे' अशी मागणी कायद्याच्या कोर्टांत करणारा शॉयलाक, आज पुन: तऱ्हेतऱ्हेचीं रुपें धारण करून जगावर अम्मल चालवीत आहे. आणि जोपर्यंत मी कायद्याच्या कुठल्याहि कचाट्यांत सांपडत नाहीं तोपर्यंत मला कोणाची भीति आहे अशी गर्वोक्ति काढीत आहे. त्याचप्रमाणें पाश्चात्य भांडवलदार आणि राजसत्ता तहनाम्याच्या सर्व अटी अक्षरश: पाळून स्वत: धर्मनीति पाळत आहोंत असा गर्व करीत आहेत, वैश्य वर्गानें युरोपांतील समजाला फक्त त्राहि त्राहि करून सोडलें आहे, परंतु युरोपच्या

बाहेरील भोळ्या जनेतला तर तो आपलें भक्ष्यच समजतो आहे. या वैश्य वर्गाचें पैशाशिवाय दुसेंर एक साधन आहे आणि तें म्हणजे विलासासाठीं धडपडणारा परंतु द्रव्यदुर्बल असा मजूर वर्ग होय. धर्मामुळें गरिबींत देखील जें गांभीर्य आणि समाधानामुळें जें पावित्र्य निर्माण होतें तीं दोन्ही हा मजूर वर्ग गमावून बसला आहे. यामुळें धनिकांचा विलास पाहून त्याची ' भोक्तुं न भोक्तुं क्षमः' अशी स्थिति झाली व टॅन्टलस राजाप्रमाणें तो तडफडूं लागला. विलासिता तर हवी आणि सत्ता तर हातीं येत नाहीं, अशा स्थितींत मजूर-वर्गानें आकाशवाणी ऐकली कीं—संघशक्तिः कलौ युगे ! झालें, मजूरांनीं आपले प्रचंड संघ बनविले आणि एक निःशस्त्र पण घोर युद्ध सुरुं झालें. युरोपांतील मोठमोठे समाजसत्तावादी पंडित गर्जून सांगूं लागले कीं युरोपांत अठरा राष्ट्रें आहेत ही समजूत म्हणजे केवळ भ्रम आहे. युरोपांत दोनच राष्ट्रें जिवंत आहेत. जर्मनी आणि इंग्लण्ड ? नव्हे नव्हे ! एक गरिबांचें आणि दुसेंरं श्रीमंतांचें ! एक मजूरांचें आणि दुसेंरं मालकांचें; एक जमीन-दरांचेंआणि दुसेंरं शेतकऱ्यांचें. या दोन राष्ट्रांत विग्रह सुरुं झाला पण तह होण्याची कुणकुण सुद्धा ऐकूं येत नाहीं. रणमत्त बनलेल्या जर्मनीनें आणी-बाणीचा प्रसंग येतांच ज्याप्रमाणें सर्व आंतरराष्ट्रीय कायद्यांना कागदांचे कपटे समजून वाटेल तसे अत्याचार करण्यास सुरवात केली. त्याप्रमाणें गरि-बांच्या राष्ट्रानें प्रथम अज्ञानानें नंतर निराशेनें आणि शेवटीं विजयाच्या मस्तींत समाजाचें कल्याण अकल्याण बाजूला सारून धर्माच्या मर्यादेला पाया-खालीं तुडवून श्रीमंतांच्या राष्ट्रावर हल्ला केला. जशी क्रिया तशी प्रतिक्रिया. रशियांत श्रीमंतांनीं गरिबांची सहनशक्ति पराकोटीला नली. त्याचा परिणाम असा झाला कीं रशियांतील गरीब लोक जे खरोखरीच स्वभावानें अत्यंत गरीब होते ते सुद्धा डिवचलेल्या सर्पाप्रमाणें श्रीमंतवर्गावर तुटून पडूं लागले आहेत. युरोपांत सुरुं झालेल्या युद्धाची पर्वणी मिळतांच या सधन निर्ध-नांच्या युद्धाला जोर मिळाला आणि कैसरनें लाविलेली आग जरा कोठें विझूं लागली होती इतक्यांत या महायुद्धाचा रशियांत स्फोट झाला. सार्व्हि-याच्या दोन बॉम्बगोळ्यानीं ज्याप्रमाणें साऱ्या युरोपला आग लावली त्या-प्रमाणें रशियांत झालेला हा स्फोट साऱ्या जगाला पेटवून देईल अशी चिन्हें

दिसत आहेत. प्रजावादाच्या या उच्छृंखल स्वरुपाचें नांव बोल्शेवीझम् असें आहे. जर्मनीच्या सैन्याशीं लढणें सोपें होतें; कैसरच्या महत्त्वाकांक्षेचे किल्ले देखील ढांसळून पडले; पण बोल्शेवीझम्‌ची ही रणचंडी कोणापुढेंहि नमतें घेईल असें वाटत नाहीं. तिची झळ आपल्या देशालाहि लागेल कीं काय या भयानें आज प्रत्येक सुधारलेलें राष्ट्र थरथरा कांपत आहे आणि तहपरिषदेचा पुरोहित वुड्रो विल्सन हा अमेरिकेमधून लाखो खंडी धान्य आणून त्याचा या चंडीला नैवेद्य अर्पण करून तिला शांत करण्याचा प्रयत्न करीत आहे. युरोप आणि अमेरिकेची एकत्रित नीतिनिपुणता कदाचित् बोल्शेविझम्‌ची ही आग तात्पुरती शमवूं शकेल, कैसरसाठीं देखील एकादें सेंट हेलीना बेट मिळेल; परंतु जोपर्यंत सत्ता आणि विलासिता या दोन देवी युरोपच्या हृदय-मंदिरांत विराजमान आहेत तोपर्यंक शांति देवीचा त्याठिकाणीं प्रवेश होणें शक्य नाहीं. एवढें मात्र ब्रह्मवाक्यच समजलें पाहिजे. भविष्यकाळ अंधकारमय दिसत आहे. पण अशा स्थितींत तरणोपाय कांहींच नसेल काय? ज्याच्या नसानसांत आर्यसंस्कृति खेळत आहे तो धैर्यानें असेंच म्हणेल कीं 'आहे'— हा उपाय कोणता याचा विचार पुनः केव्हांतरी करूं—सध्यां इतिहास विधात्या ईश्वरावर श्रद्धा ठेवून निःशंक भावानें एवढेंच म्हणा कीं, 'जें होत आहे तें शाश्वत कल्याणासाठींच होत आहे. दिवस जसा शुभ आहे तशी रात्र देखील शुभच आहे. यौवन आणि वार्धक्यच काय पण मरणसुद्धां शुभच आहे. इतकें वाचल्यानंतर कोणी असें मनांत आणूं नये कीं युरोपांत आज पर्यंत झालेल्या किंवा यानंतर होणाऱ्या रक्तपाताबद्दल आमची पसंती आहे. तसेंच सत्ता जनतेच्या हातीं असली पाहिजे हें तत्त्व आम्हाला कबूल नाहीं असें मानण्याचें देखील कारण नाहीं. ब्राह्मणांचें वर्चस्व किंवा क्षत्रीयांचा दरारा हें देखील आमचें ध्येय नाहीं. आम्हाला मुख्यत्वेंकरून जें पहावयाचें आहे तें येवढेंच कीं हिंदुस्थानांत प्रयोगशाळेंत आजपर्यंत करून पाहिलेले चातुर्वर्ण्य पद्धतीचे सिद्धांत कसे व्यापक होऊं शकतील; आणि जगांतील अनेक कूट प्रश्न त्या सिद्धांतांच्या आधारें सोडविले जातील.

—एप्रिल १९१९

## ४ : आशियाचें ऐक्य

आशियाच्या ऐक्याची चर्चा आजकाल खूप चालू आहे. आशियाचा एक मोठा संघ स्थापिला पाहिजे अशाप्रकारच्या सूचना खूप ठिकाणाहून होत आहेत. अशा तऱ्हेचा संघ स्थापन होणें ही गोष्ट जपानला फार सोईची आहे. कारण आशियाच्या बंधुत्वामध्यें मोठ्या भावाचा मान जपानला मिळावयाचा आहे. इस्लामी ऐक्यापेक्षां आशियाचें ऐक्य अधिक व्यापक आहे म्हणून कांहीं लोक तें पसंत करतात. परंतु आशियाच्या ऐक्याची जरूरी युरोपच्या प्राणघातक अत्याचारामुळें जास्त भासूं लागली आहे. रशियाच्या जंगलांतील लांडग्याप्रमाणें युरोप इतर सर्व खंडावर आक्रमण करूं लागला आहे. त्यांतून वाचण्यासाठीं आशियानें एक झालेंच पाहिजे अशा तऱ्हेची भाषा ऐकूं येऊं लागली आहे.

ज्यांचा स्वभाव सारखा आहे किंवा ज्यांच्यावर एकाच स्वरूपाचें संकट लटकत असतें अशांचेंच ऐक्य होत असतें, अशा स्वरूपाचें एक जुनें वचन आहे. त्याप्रमाणें आशियाचें ऐक्य सहजासहजीं होऊं शकेल हें खरें, पण राक्षसांना विरोध करण्यासाठीं राक्षस बनणें, क्षत्रीयांचा एकवीस वेळां पराभव करण्यासाठीं स्वतः क्षत्रीय बनणें यांत शेवटीं तोटाच आहे. युरोपवर मात करण्यासाठीं त्या तऱ्हेची वृत्ति आपण अंगीं बाणविली, स्वार्थ-निर्दयता आणि दंभ यांचें साम्राज्य स्वीकारलें तर आपण देखील दुनियेला त्रासरूप होऊन जाऊं. आणि युरोपपेक्षां आशिया हा विस्तारानें व लोक-संख्येनें मोठा असल्यामुळें आपला त्रास इतका कांहीं वाढेल कीं ईश्वराला आमच्या जबड्यांतून पृथ्वीला वाचविण्यासाठीं नवाच अवतार धारण करावा लागेल. आशियाचें ऐक्य आवश्यक आहे, कारण मानवी ऐक्या-

मधील ती एक पुढची पायरी आहे. युरोपचा साम्राज्यमद उतरविण्याची सुद्धां जरूरी आहे; कारण त्यायोगें जगांतील लहान मोठे मानव वंश निर्भय होणार आहेत. परंतु हें ऐक्य युरोपच्या पद्धतीनें होतां कामा नये. सवाई युरोप होण्यासाठीं कांहीं त्या ऐक्याची जरूरी नाहीं. आशियाच्या महान् धर्मसम्राटानीं तो मार्ग दाखविला आहे. त्या मार्गानेंच आशियाचें ऐक्य झालें पाहिजे. आज जे लोक आशियाच्या ऐक्याची तरफदारी करीत आहेत त्यांच्यांत ही श्रद्धा आहे काय ? या मार्गानें ते जाऊं इच्छितात काय ?

# ५ : आशियाची साधना.

दक्षिणेंत ब्राह्मण ब्राह्मणेतरांचा झगडा कित्येक वर्षें चालू आहे. ब्राह्मण म्हणजे कोण हे आपल्याला माहीत आहेच; परंतु ब्राह्मणेतर असा हा वर्ग कोठून उत्पन्न झाला ? ब्राह्मणेतर नांवाची एकादी जात तर मुळींच नाहीं; तरीहि ब्राह्मणेतरांचा पक्ष निर्माण झाला आहे. ब्राह्मण ब्राह्मणेतरांच्या वादांत मुळींच न उतरतां आपण असें म्हणूं शकतो कीं ब्राह्मणांची ब्राह्मणत्वाविषयींची जाणीव आणि इतराहून आपण वेगळे आहोंत अशा तऱ्हेची पृथक्‌पणाची कल्पना हेंच ब्राह्मणेतर वर्ग निर्माण होण्याचें कारण आहे. ब्राह्मणामध्यें जातीची कल्पना तीव्र स्वरुपाची असल्यामुळें इतरामध्यें त्याविरुद्ध भावना निर्माण होणें अगदीं शक्य आहे.

आजची आपली आशियाविषयींची भावना अशीच आहे. युरोपांतील लोक भौतिक शास्त्रांत आणि आसुरी राजकारणांत प्रवीण झाल्यापासून त्यांनीं परस्परांत मत्सर आणि वैर असूनही साधारणपणें चांगला एकोपा राखला असून शिवाय बाहेरील देशावरहि आक्रमण केलें आहे. या आक्रमणाला बळी पडलेल्या लोकांत आपापसांत ऐक्य करण्याची वृत्ति केव्हांना केव्हां तरी निर्माण ही व्हायचीच; आणि म्हणूनच आपल्यांत आशियाच्या ऐक्याची कल्पना पसरुं लागली आहे. आशियाच्या ऐक्याच्या कल्पनेमध्यें ही एकच कल्पना असली तरी तें ऐक्य समर्थनीय गणलें जाईल. तरी पण तें कृत्रिम हें आहेच.

परंतु आशियाचें ऐक्य हें युरोपीयन लोकांच्या उत्कर्षाइतकें आधुनिक नाहीं. तें खूपच जुनें आणि खोल आहे. चीन व जपान, रशिया व मध्य आशिया, तुर्कस्थान, अरबस्थान, इराण आणि आपला हिंदुस्थान या सर्व देशांत प्राचीन काळापासून अनेक प्रकारें ऐक्याचे धागे विणले गेले आहेत.

परंतु त्यावेळीं युरोप वेगळें नव्हतें. युरेशीया हें अखंड खंड होतें आणि आज जरी तें इतकें अखंड राहिलें नसलें तरी शेवटीं तें अखंडच व्हायचें आहे.

कांहीं लोकांच्या मनांत असा विचार येतो कीं अजून आम्हाला स्वराज्य मिळालेलें नाहीं, आमच्या म्युनिसीपॅलिट्या देखील आमच्या ताब्यांत नाहींत, घरच्या अंत्यजांना आपण समाजांत मिसळून घेऊं शकलों नाहीं, अशा स्थितींत साऱ्या आशियाचा विचार कशाला करायचा ? पण हा आक्षेप योग्य नाहीं. जगाच्या आजच्या स्थितीचा विचार करून, भविष्याचा विचार करतेवेळीं सगळ्या जगाशीं असलेला आपला संबंध ध्यानांत घेऊन विचार केला असेल तरच आपल्याला आपला मार्ग बरोबर समजू शकेल. शिवाय आपण बाहेरच्या जगापासून कितीहि दूर राहूं इच्छीत असलों तरी जग कोठें आपल्याला दूर राहूं देणार आहे ? आणि आपला संबंध अशा एका सत्तेशीं जोडला गेला आहे कीं जी मांजराप्रमाणें एकूणएक घरांतील दूध तूप चाखून येतें. यामुळें आपला आपल्या शेजारच्या देशाशीं आज कोणत्या प्रकारचा संबंध आहे याचा आणि पुढें परिस्थिति आपल्याला अनुकूल झाल्यानंतर आपण कसा संबंध ठेवूं त्याचादेखील आपल्याला विचार केला पाहिजे.

कांहीं लोक म्हणतात कीं, युरोपीयन व हिंदी लोकांचे हितसंबंध विरोधी असल्यामुळें दोन्ही जाती कितीहि भांडल्या, तरीदेखील दोहोंमध्यें जीवनाच्या आदर्शाविषयीं एक प्रकारचें एकमत हें आहेच. दोघांच्या राजकीय आदर्शांत आणि सामाजिक कल्पनामध्यें व्यापकदृष्टीनें पाहिल्यास आशियांतील इतर देशापेक्षां साम्य अथवा परस्पराकर्षण अधिक आहे. चिनी आणि हिंदी लोकांत जितकें सामाजिक ऐक्य आहे त्यापेक्षां युरोपियन आणि हिंदी लोकांत तें अधिक आहे. हिंदू आणि खिस्ती धर्म यांच्यांत जेवढें साम्य आहे तितकें हिंदू आणि इस्लाम धर्म यांच्यांत नाहीं. राष्ट्रीय आणि सामाजिक दृष्ट्या पाहिल्यास आपण आशियांतील कित्येक देशापेक्षां युरोपला जास्त जवळ आहोंत. म्हणून आपण युरोपशीं लढून देखील आपला संबंध वाढविला पाहिजे. आशियाचें ऐक्य हें भौगोलिक अथवा प्रादेशिक ऐक्य आहे, परंतु युरोपशीं आपलें ऐक्य उच्च दृष्टीनें पाहिल्यास सांस्कृतिक

अथवा समानधर्मीय किंवा समध्येयी आहे. काठीची दोन्हीं टोकें परस्पर विरुद्ध दिशेला असलीं तरीहि ज्याप्रमाणें काटी अेकच असते त्याप्रमाणें युरोपीयन आणि हिंदी आदर्श परस्परविरोधी असूनहि एकाच आर्य आदर्शांच्या शाखा आहेत.

या म्हणण्यांत कांहींच अर्थ नाहीं असें नाहीं. युरोपची सध्याची संस्कृति आसुरी आहे, राक्षसी नव्हे. आणि भारतीय संस्कृतिमागील आदर्श दैवी आहे. हें कबूल केलें तरी देव आणि असुर हे भाऊभाऊ आहेत असें आपल्या पुराणकारांनींच सुचविलें आहे.

युरोपशीं आपला संबंध नाइलाजानें वाढला व त्यामुळें आपण युरोपशीं थोड्याफार अंशानें परिचित झालों. इस्लामबरोबर आपला संबंध देखील नाइलाजानेंच आल्यामुळें इस्लामचीहि कदर करण्यास आपण शिकलों. आतां ईश्वराचा असा सवाल आहे कीं जगाचें ऐक्य अनुभवण्यासाठीं चिनी संस्कृतीबरोबर परिचय करून घ्यावयाचा आहे, कीं तोहि मी जबरदस्तीनें करवूं ? आपण होऊन परिचय वाढवाल तर स्वतंत्र राहाल, नाइलाजानें वाढवूं इच्छीत असाल तर त्याची किंमत द्यावी लागेल.

युरोपचा विरोध करण्यासाठीं जर आशिया एक होत असेल तर तों आसुरी संघ होईल, कारण तो युरोपप्रमाणेंच स्वार्थमूलक संघ असेल. त्यांत क्षणोक्षणी संधी आणि विग्रहाचे रंग बदलत राहतील, व शेवटीं सारा युरोप एकीकडे व सारा आशिया एकीकडे होऊन असें एक महायुद्ध किंवा अति-युद्ध भडकेल कीं ज्यांत शेवटीं मनुष्यजातीचा व मानवी संस्कृतीचा संपूर्ण संहार होईल; व हजारो वर्षांचा मानवी पुरुषार्थ मातीमोल होऊन जाईल. ' सर्वे भद्राणि पश्यन्तु ' चा आदर्श दृष्टीसमोर ठेवणारे असे कसे होऊं देतील ?

युरोपचा विरोध असो किंवा नसो, मनुष्याजातीचें अैक्य दृढ करण्यासाठीं, दयाधर्माचें व शांतीचें साम्राज्य स्थापण्यासाटीं आशियानें एक झालेंच पाहिजे.

आणि आशिया एक होऊंहि इच्छितो. आपली खिलाफतीची चळवळ ही एकप्रकारें आशियाच्या ऐक्याचा पाया आहे. इस्लामशीं आपला

संबंध जुना आहे. खिलाफतीच्या चळवळींत भाग घेऊन आपण तो पुरा करीत आहों.

आशियाच्या ऐक्याची सुरवात आपण खिलाफतीनें केली आहे; पण ही ऐक्याची कल्पना मात्र आजची नाहीं. दिग्विजयाच्या द्वारें आर्य राजानीं चीनपासून इजिप्तपर्यंत, आणि उत्तरध्रुवापासून निदान लंका आणि बाली बेटापर्यंत सांस्कृतिक ऐक्य स्थापन करण्याचा प्रयत्न केला आहे. आणि ही ऐक्यसाधना करीत असतां आर्यांनीं आपल्या शेजाऱ्यांना जेवढें दिलें आहे तेवढें त्यांच्याजवळून मोकळेपणानें घेतलेंहि आहे. फक्त ही ऐक्यसाधना आपल्या उच्च अभिरुचीप्रमाणें आपल्या पद्धतीनेंच केलेली आहे. मला असें वाटतें कीं धर्मराजाला राजप्रसाद बांधून देणारा मयासुर चीनचा असावा आणि बृहस्पति किंवा शुक्राचार्य यांच्या कलेहून त्याची स्थापत्यकला वेगळी होती. चीन देशांतील चित्रकला व नृत्यकला यांचा प्रभाव भारतीय कलेवर पडला असावा.

इतिहासकारांच्या मताप्रमाणें एकेकाळीं आशियाच्या कलाकौशल्याचें केंद्र समरकंद व खोतानच्या आसपासच्या प्रदेशांत होतें. तेथून व्यापाराचे अनेक मार्ग वेगवेगळया दिशांनीं जात होते. एक मार्ग चीनकडे गेला होता, एक हिंदुस्थानकडे, एक इजिप्तमध्यें व एक युरोपांत. अशाप्रकारें व्यापाराबरोबर संस्कृतीचीहि देवाणघेवाण या मध्य भूमींतून होत असे. पण विश्वकर्त्याला इच्छा झाली कीं कांहीं दिवसपर्यंत, आजपर्यंत एकत्र आलेली हीं दोन टोकें, एकमेकांपासून भिन्न होऊन दूर रहावींत. रेतीचे सागर उसळूं लागले आणि त्यांनीं अमूदारिया व सरदारीयाचा प्रदेश उजाड करून टाकला. आज जेव्हां वावटळें उठतात आणि वाळूचे थर या प्रदेशांतून उडून जातात तेव्हां यां प्राचीन संस्कृतीचे अवशेष अजूनहि तेथें पाहायला मिळतात.

आर्यलोक पहिल्यापासूनच यात्रेंत प्रवीण. डोंगर पाहिला कीं तो ओलांडण्याची इच्छा त्यांना झाल्याशिवाय रहात नसे. नदी पाहिली कीं तिचें मूळ, तिचा उगम शोधल्याशिवाय ते रहावयाचे नाहींत. आर्यांचा देव इंद्र भुज्युला समुद्राच्या पलीकडे घेऊन गेला होता. आर्यराजे प्रत्येक राजसूय यज्ञाचे वेळीं चीन आणि इजितच्या राजांना आमंत्रण देत. अशोकानें चारी

दिशांना बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठीं आणि अभयाचा संदेश सर्वत्र पसरविण्यासाठीं आर्यांना आणि भिक्षूनां धाडलें होतें. आणि तो दिव्य संदेश ऐकल्यानंतर दयामय धर्मराज भगवान बुद्धाच्या देशाची यात्रा करण्यासाठीं दिगंतांतून यात्रेकरु येऊं लागले. आशियाचें ऐक्य साधण्याची संपूर्ण शक्ति असणारें तत्त्व म्हणजे महायान बौद्ध धर्मच होय. महायान बुद्ध धर्मांत, भगवान् बुद्धाचा उपदेश, तंत्र मार्गाचे लोकप्रिय विधी, आणि अनेक देवदेवतांचा वृंद असून शिवाय दुःखतप्त मानवाला आश्वासन आणि परोपकारी वीरपुरुषाला आकर्षून घेईल असा बोधिसत्त्वाचा आदर्श होता. महायान पंथाचा जेव्हां प्रसार झाला तेव्हां हिंदुस्थानचा चीन, इराण, बॅक्ट्रीया आणि सुवर्णद्वीप ( ब्रह्मदेश ) यांच्याशीं असलेला संबंध घरच्या आंगणासारखा झाला होता. त्यानंतर धर्मसाम्राज्याची कल्पना अरबस्तानांत पोहोंचली आणि तिनें त्रिखडांत एकेश्वरवाद आणि समानता यांचा संदेश पोहोंचविला. अजून देखील हा धर्म मध्य आशियांतील व आफ्रिकेंतील नव्या नव्या लोकांना अल्ला-तालाच्या व त्याच्या नबीसाहेबाच्या चरणीं आणण्याचें काम करीत आहे. मुसलमानी धर्माचा उदय झाला तेव्हां हिंदुस्थानांतील ब्राह्मण आणि श्रमण तिबेटांत जाऊन बसले होते. हिमालय आणि हिंदुकूश यांच्या पलीकडे अनेक मठांत हिंदुस्थानच्या प्राचीन संस्कृतीचे साक्षीदार म्हणून साहित्य, स्थापत्य आणि कला यांचे नमुने पडलेले आहेत. हिंदु लोकांची अत्यंत पवित्र यात्रा म्हणजे कैलास व मानससरोवरांची यात्रा होय. तिच्या द्वारें हिंदू आणि चिनी संस्कृतीची अखंड देवाण घेवाण चालत असे. आजदेखील थोड्याफार अंशानें ती चालूंच आहे. हिमालय ओलांडून उत्तरेकडे जाण्याचे जेथें जेथें रस्ते आहेत तेथें तेथें आर्यसंस्कृतीची ठाणीं—तीर्थस्थानें—आहेत.

हिंदुस्थानचा शिष्यसमूह आपण समजतो त्यापेक्षां मोठा आहे. चिनी आणि जपानी लोक हिंदुस्थानाकडे आदरानें पाहतात. तिबेटला जाण्याचे रस्ते पुनः मोकळे होऊं लागले आहेत. हिंदुस्थानचा अहिंसेचा मार्ग साऱ्या जगांत प्रख्यात झाला आहे. युरोप आणि आशिया यांच्यामधील युद्धांत जर आपण अहिंसा धर्माला प्राधान्य देऊं तर चीनमध्यें

त्याचा जरूर स्वीकार होईल. जपानवर त्याचा परिणाम होईल आणि अशाप्रकारें आशियाचेंच नव्हे तर साऱ्या जगाचें ऐक्य प्रस्थापित करण्यासाठीं हवें असलेलें वातावरण निर्माण होईल.

आशियानें एक झालेंच पाहिजे, परंतु तें स्वार्थासाठीं नव्हे; युरोपच्या विरुद्ध लढून त्याला पादाक्रांत करण्यासाठीं नव्हे, तर युरोपांत जो स्वार्थपरायण साम्राज्यवाद उत्पन्न झाला आहे त्याचा नाश करण्यासाठीं व धर्माचें साम्राज्य स्थापन करण्यासाठीं. नोव्हेंबर १९२३.

[1] स्वेच्छेनें बहिष्कृत झालेल्या, खानदानी फ्रान्सच्या हे चिंतनशील अतिथि ! आमचें तुला वंदन असो ! मौन आणि वाचा या दोहोंचा तुला आशीर्वाद आहे. तुझ्या स्वतःच्या राष्ट्राचा तुला चांगला परिचय आहे. म्हणूनच तूं जगांतील इतर राष्ट्रांना समजूं शकतोस. फ्रान्सचा भूतकाळ, युरोपची तपःश्चर्या, पश्चिमेची आकांक्षा, हीं तुझ्यांत जागृत आहेत, म्हणूनच तूं भविष्याला प्रत्यक्ष पाहूं शकतोस. परंतु ध्यानांत ठेव कीं भविष्यालाहि अनेक अंगें आहेत. ज्यानें संपूर्ण भूतकाळ पाहिला असेल तोच कदाचित् संपूर्ण भविष्यकालाचें ओझरतें दर्शन घेऊं शकेल. सनातन अनंततेच्या विस्तारांत भूत आणि भविष्य सारखेच जिवंत आहेत. सारखेच वर्तमान आहेत.

तुला कशाप्रकारचा हिंदुस्थान हवा आहे, हें आम्हांला समजलें. तुझ्या या पवित्र अभिलाषेबद्दल आम्ही तुझें अभिनंदन करतो. आम्हाला असें वाटत नाहीं कीं आम्ही स्वयंपूर्ण राष्ट्र आहोंत. परंतु आम्ही आमच्या स्वदेशी धर्माप्रमाणें आमच्याच प्रकाशानें प्रकाशित होऊं इच्छितों. भेदाच्या भिंती आम्हांला नकोत. आमचा प्रकाश हा खरोखरच प्रकाश असल्यामुळें जगांत सर्वत्र पसरेल. प्रत्येक मानवजातीजवळ तिचें स्वतःचें असें तेज असतेंच. जेथून म्हणून प्रकाश येत असेल त्यांकडे आम्ही नम्र दृष्टीनें पाहूंच. ईश्वरी प्रकाश हा एकरूपच असणार. परंतु भिन्नभिन्न जातींचें वैशिष्ठ्य हें भिन्नवर्णीय असणार आणि हीच तर ईश्वरी योजनेंतील सुंदरता आहे. त्यांतच

---

१ अहमदाबाद कॉंग्रेसच्या वेळीं श्री पॉल रिशर यानीं दिलेल्या व्याख्यानास उत्तर.

काव्य आहे. आम्ही कोणाला निंदीत नाहीं किंवा वंदीत नाहीं. सृष्टि जड आणि चेतनाचीच बनलेली आहे, प्रवृत्ति सत्–असत्‌पासूनच निर्माण झाली आहे, असें आम्ही शिकलों आहोंत. जोपर्यंत जीवदशा आहे तोपर्यंत दोहोंची आवश्यकता ही रहावयाचीच. जडाची पूजा करणें याला आम्ही जडवाद म्हणतो. युरोपांत सर्वत्र जडाचीच पूजा चालते असें आम्हाला म्हणावयाचें नाहीं. परंतु युरोपजवळून आम्ही फक्त जडवादच शिकूं शकलों याचें आम्हांला वाईट वाटतें. परंतु आमच्यामध्यें आमचा स्वतःचा जडवाद नसता तर आमचें पतन झालेंच नसतें. म्हणून आम्ही स्वतःलाच दोष देतों. आम्ही केव्हांच जडाला वश होऊन गेलों होतों. युरोपकडून आम्ही त्या जडाची पूजा करावयास शिकलों. अधःपातालाच उन्नति मानून चाललों. आणि यामुळेंच आमच्या हृदयाला वेदना होत आहेत.

आत्मा म्हणजे नित्य नूतनता हें आम्ही जाणतों. जें नित्य नूतन नाहीं त्यालाच मरावें लागतें. जन्म–मरण जितकें सत्य आहे तितकेंच सनातन जीवनसुद्धां सत्य आहे. गवत आणि वनस्पति उन्हाळ्यांत मरतात आणि पावसाळ्यांत पुनः उगवतात. हा त्यांचा जीवनधर्म. वडापिंपळाचा जीवनधर्म निराळा आहे. कोठलेंहि राष्ट्र बाल्यावस्थेंत भविष्याकडेच पाहतें. यौवनदशेंत वर्तमानांत गुंगून राहतें आणि वार्धक्यांत भूतकाळाकडेच अश्रुपूर्ण दृष्टि टाकते; परंतु ज्या राष्ट्राला सनातन व्हायचें असेल त्याला त्रिकालदर्शीच असलें पाहिजे. त्याच्यांत यौवनाचा उत्साह नसला तरी चालेल, परंतु गांभीर्य मात्र पुरेपूर असलें पाहिजे. त्याच्या स्वभावांत धीरोदात्तता अवश्य पाहिजे.

आमची समस्या सर्वांत कठीण आहे हें खरें आहे. विरोधी धर्म आणि कलहप्रेमी पंथांचें प्रेमधर्मानें सम्मेलन करण्याचें काम आमच्या शिरावर येऊन पडलें आहे. हा आमचा खास आदेश आहे. हें आमचें जीवितकार्य आहे. विधात्यानें यासाठींच आम्हाला एक खास मंत्र दिला आहे. त्याला आम्ही स्वदेशी या नांवानें ओळखतो. वर्णव्यवस्था हें तिचेंच एक अंग आहे. जगांत जर एकतेची सत्ता चालवावयाची असेल, विविधतेंत असलेलें ऐक्य राखावयाचें असेल, सप्तस्वरांचे संगीत जिवंत ठेवावयाचें असेल तर

स्वधर्ममूलक वर्णव्यवस्था हाच त्याला उपाय आहे. वर्णव्यवस्था हें भारतवर्षाचें वैशिष्ट्य आहे. त्याचा जर आम्ही त्याग केला तर आम्ही आमच्या आदेशाशीं बेइमान ठरूं; ईश्वराच्या योजनेला निष्फळ करूं.

हें खरें आहे कीं वर्णव्यवस्था— ईश्वरानें इच्छिलेली वर्णव्यवस्था— आम्ही राखूं शकलों नाहीं. प्रेमधर्म आमच्यांत पूर्णपणें प्रगटला नाहीं. म्हणूनच व्यवस्थेमध्यें विद्वेष आला, विविधतेंत विस्कळितपणा आला. एकता मोडून गेली आणि आम्ही संकुचित बनलों.

विविधतेंत ऐक्य हा ईश्वरी संदेश आहे. आम्ही ऐक्याला विसरलों आणि तुम्ही विविधतेकडे साशंकतेनें पाहतां. आपण दोघेहि चुकत नाहीं काय ?

आज वर्णव्यवस्थेंत तिरस्कार आहे. द्वेष, दंभ आहेत. अहंकार आहे आणि त्याचेंच चिन्ह—त्याचाच परिणाम म्हणजे आमच्यांत घुसलेली अस्पृश्यता. जेव्हां आम्ही अस्पृश्यता दूर करण्याची भाषा बोलतो तेव्हां तिरस्काराला दूर लोटूं इच्छितो, द्वेषाला हाकलून देऊं इच्छितों, दंभ, अहंकाराला जाळून टाकूं इच्छितों हें तूं ध्यानांत ठेव. जगांत ज्येष्ठ कनिष्ठ भाव हा राहणारच पण श्रेष्ठ कनिष्ठाची भावना राहतां कामा नये. जेथें नम्रता आहे तेथें पावित्र्य वसतें असें आम्ही मानत आलों आहोंत. वर्णभेद जर आम्ही काढून टाकला तर धर्मभेद कसा सहन करूं ? दया धर्माला मग कोणतें स्थान ? स्वधर्माचा अर्थ काय ?

जेथें आदर्शाचा भेद असेल तेथें उच्चनीच भेद राहूं शकत नाहीं. परंतु जेथें आदर्शशिखर एक असून त्याचा पंथ कमीजास्त प्रमाणांत आक्रमिलेला असेल तेथें उच्चनीच स्थिति ही असावयाचीच. परंतु त्यामुळें अहंता किंवा दीनता उत्पन्न होतां कामा नये. गुरुशिष्यामध्यें उच्चनीच भाव नसतो काय ? पापी आणि पुण्यवान एकाच भूमिकेवर असतात काय जेथें प्रेम असेल तेथें समतेचा विचारच येणार नाहीं. कारण प्रेम हें विषमतेच्या बाबतींत आंधळें असतें.

आम्ही घरांत जशी अस्पृश्यता फैलावूं दिली तसे बाह्य जगाशींदेखील आम्ही अस्पृश्यच राहिलों हें आमचें पाप आहे खरें. समुद्रयात्रा करून, देशदेशांतराशीं व्यापार करून आम्ही तें पाप धुऊन काढूं शकणार नाहीं.

परंतु देशदेशांतराचा प्रकाश स्वीकारण्यासाठीं आमचे दरवाजे सताड उघडे ठेवून, तुझ्यासारख्या देशोदेशीच्या सज्जनांना आमच्या हृदयांत स्थान देऊन, जगाच्या दुःखानें दुःखित होऊन, जगाची सेवा करण्यासाठीं स्वतंत्र होऊन आम्ही त्या पापाचें प्रायश्चित करूं शकतों.

हे ईश्वरपरायण अतिथि ! तुला आम्ही वंदन करतों. आमची संकुचितता दूर करण्याची संधि आम्हाला मिळावी यासाठीं तूं आमचें आतिथ्य स्वीकार, तुझ्या हृदयींचे भाव प्रकट कर. आमच्या हृदयांतील भावना समजून घे. आणि आम्हांला आमच्या मार्गानें जाण्यास मदत कर. स्वतःचा मार्ग स्वतः नक्की करूं शकण्याइतकें आम्ही स्वावलंबी आहोंत. परंतु तुझ्यासारख्याची मदत न घेण्याइतके अहंकारी नाहीं. —८।१।४२

नमस्तेऽस्तु भगवन्नतिथिर्नमस्यः ।

# ७ : आपलें राष्ट्रीय ध्येय

छत्रपति शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रांत वाढलेले आम्ही महा राष्ट्रीय स्वातंत्र्यवादीच आहोंत हें सांगण्याची आवश्यकता आहे काय ? हातीं येईल तें साधन वापरुन शत्रूचें जूं झुगारुन द्या आणि भारतवर्षाच्या आनंद-वनभुवनांत धर्मराज्य अथवा रामराज्य स्थापन करा. शक्ति आणि युक्ति यांची सांगड घालून राज्य मिळवा आणि त्याचा उपयोग धर्माच्या विस्तारासाठीं करा अशी महाराष्ट्राच्या समर्थांची शिकवण आहे. शिवाजीच्या हस्ताक्षरांत एक पत्र मिळालें आहे. त्यांत " हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याचा आमचा प्रयत्न आहे " असे शब्द आहेत. अशा परंपरेंत वाढलेले आम्ही ' डोमी-नीयन स्टेट्स् ' कसेंकाय ओळखणार ? डोमीनीयन स्टेट्स् म्हणजे वसाहतीचें स्वराज्य किंवा रुपकाच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे कन्याभूमीचें स्वराज्य.

मातृभूमीमधून निघून साहसी लोकांची एक टोळी दूर देशास जाऊन राहते. तेथें आपल्या पुरुषार्थाच्या बळावर राज्य स्थापन करते आणि मग मातृभूमीशीं असलेला आपला संबंध तुटला न जावा यासाठीं विशाल संघटनेचें कवच धारण करून जास्त विस्ताराची शक्ति प्राप्त करते याचें नांव कन्याभूमीचें स्वराज्य. कन्याभूमींत सामर्थ्य व महत्त्वाकांक्षा ही ओसं-डत असतात. आणि मातृभूमीमध्यें प्रतिष्ठा आणि वात्सल्य हीं स्वाभाविकच असतात. यामुळें अनेक कन्यांच्या मदतीनें कानीन साम्राज्य आपोआप प्रस्थापित होतें.

आपण कांहीं इग्लंडची कन्या नाहीं, आपल्याला वारसा इंग्लंड-कडून मिळालेला नाहीं. आपण बालकप्रजेप्रमाणें गळेपडूंचा धंदा करूं इच्छीत नाहीं. आपली संस्कृति वेगळी आहे आपली परंपरा वेगळी आहे. आपले संस्कृतिबांधवहि वेगळेच आहेत. भविष्यकालासंबंधीं आपले

प्रश्नहि अगदींच स्वतंत्र आहेत. एकीकडे इस्लामी संस्कृति तिन्ही खंडांत पसरली आहे. आणि दुसरीकडे आर्य–बौद्ध संस्कृति विशाल मानव समाजांत अनेकप्रकारें पसरलेली आहे. या दोन संस्कृतींचा समन्वय करणें हा भारतवर्षाचा खास पुरुषार्थ आहे. एवढें केल्यानंतर पाश्चात्यांच्या वैज्ञानिक संस्कृतीशीं मेळ बसविणें हें थोडें देखील कठीण नाहीं. ख्रिस्ती संस्कृति हिंदी संस्कृतीपेक्षां इतकी कांहीं भिन्न नाहीं कीं त्यांचा समन्वय विशेष कठीण व्हावा. आज युरोपच्या ज्या संस्कृतीचा जगाला परिचय होत आहे ती ख्रिस्ती संस्कृति ख्रिस्ताची नसून ख्रिस्ताच्या उपदेशाचा बुरखा पांघरून फिरणारी आणि वैज्ञानिक शक्तीच्या योगें बलाढ्य झालेली रोमन संस्कृतिच आहे. ब्रिटिश साम्राज्य हें या संस्कृतीचें उत्तम प्रतिनिधित्व करीत आहे. आर्य आणि इस्लाम या संस्कृतींचा समन्वय करण्याचें कार्य ब्रिटनच्या सुद्धां शिरावर आहे; परंतु आतांपर्यंतच्या अनुभवावरून असें म्हणावें लागतें कीं हें काम करण्याची दानत किंवा हिम्मत ब्रिटननें दाखविलेली नाहीं.

अशा स्थितींत जर आपण कन्याभूमीचें स्वराज्य मागूं लागलों तर त्याला अर्थ काय ?

खरी गोष्ट अशी आहे कीं आपल्याला शक्ति अंगी बाणवावयाची आहे. परस्पर विश्वासाशिवाय राष्ट्रीयता संभवत नाहीं सामर्थ्याशिवाय परस्पर विश्वास आणि आदर्श अशक्य असतात. हें सामर्थ्य आणि ही उदारता प्राप्त करणें हें आपलें प्रमुख आणि एकमात्र कर्तव्य आहे. आपल्या लोकांनीं हजारों वर्षांपासून प्रजाद्रोह केला आहे, त्यांतून सुटका करून घेतली कीं ही शक्ति प्राप्त होईल. शक्ति प्राप्त झाल्यानंतर आपण साहजीकच आपल्या घरचे मालक होऊं. आणि मग आपल्यापुढें जो प्रश्न असेल तो पूर्ण स्वातंत्र्य कीं वसाहतीचें स्वराज्य असा नसून ‘स्वतंत्र हिंदुस्थान इंग्लंडबरोबर मैत्रीची भागीदारी कायम करूं इच्छितो कीं त्याच्यापासून वेगळा होऊं इच्छितो’ अशा स्वरुपाचा असेल.

हा प्रश्न फक्त आपल्याच समोर आहे असें नाहीं. इंग्लंडपुढें देखील हाच प्रश्न आहे.समर्थ हिंदुस्थानला प्रेमानें वश करून घेऊन बरोबरीनें वाग-

विल्यानें ब्रिटिशजनता कृतार्थ होईल कीं हिंदुस्थानापासून वेगळे झाल्यानें?

हिंदुस्थान आणि ब्रिटन या दोहोंच्या भाग्यांत कांहींशी समानता आहे. हिंदुस्थानच्या घरीं सगळ्या संस्कृती चालून येतात आणि ब्रिटन हें मांजरासारखे भटकें असल्यामुळें जगाच्या सगळ्या संस्कृतींच्या परिचयांत येतें. ब्रिटन जर लोभमुक्त आणि मदमुक्त होईल आणि हिंदुस्थान भयमुक्त, भेदमुक्त होईल तर हे दोन्ही देश मिळून सर्व संस्कृतींचा समन्वय करूं शकतील. ब्रिटनचा लोभ आणि मद उतरविणें हें हिंदुस्थानच्या हातीं आहे. हिंदुस्थान आपापसांतील भेद आणि त्यापासून उत्पन्न होणारें भय सोडून देईल व स्वाश्रयी बनेल तर ब्रिटिशसाम्राज्य आपोआप निरोगी होईल. अशाप्रकारें विशुद्ध बनलेले हे दोन देश जर सहकार्य करतील तर दोहोंच्या हातून जगाची सर्वोत्कृष्ट सेवा होऊं शकेल. हिंदुस्थानापुढें प्राचीन काळापासून दिव्य दृष्टी आहे. फक्त साधनेची दुर्बलता काढून टाकावी लागेल. इतिहास विधात्यानें ब्रिटन आणि हिंदुस्थान यांना एकत्र आणलें. यांत ब्रिटननें हिंदुस्थानावर हुकुमत चालवावी हा अर्धा डाव पुरा झाला आहे. अर्ध्यांतच डाव सोडून खेळ पुरा होऊं शकत नाहीं. हिंदुस्थानला देखील मोठेपणाचा डाव खेळूं दिला पाहिजे. ब्रिटन जर रडी खेळेल आणि डाव खेळूं देणार नाहीं तर त्यानें खुशाल वेगळें व्हावें.

अशा प्रकारच्या प्रेमाच्या, जबाबदारीच्या आणि समानतेच्या सहकार्याला जर इंग्रज आणि इंग्रजी शिकलेले लोक डोमीनीयन स्टेट्स् या नावानें ओळखू इच्छित असतील तर त्याला आपली हरकत नाहीं. आपल्याला शब्दाशीं काय करावयाचें आहे? आम खाने या पेड़गिनने?

१८।१२।२९

महायुद्धांत दमून शरपंजरीं पडलेल्या युरोपीयन राष्ट्रांना 'जाऊं द्या हे मिथ्या प्रयत्न, समाजाची पुन: नवी रचना करा आणि नवजीवनांत प्रवेश करा." असा आपला संदेश सांगून महाशय पॉल रिशार आशियाकडे वळले आहेत. महायुद्धानंतर राष्ट्रसंघाची स्थापना होऊन जी सभा भरली तींत जपानी राष्ट्राला स्थान मिळालें होतें. हिंदुस्थान 'सरकार' सुद्धां तिथें हजर होतें. दुनियेंत स्वयंनिर्णय आणि लोकसत्ता यांच्या युगाला सुरवात करणें हा या संघाचा उद्देश होता. जपाननें पाहिलें कीं राष्ट्रसंघ किंवा जगांतील प्रबळ राष्ट्रें जर सर्व मानववंशाविषयीं समतेची भावना स्वीकारतील तरच स्वयंनिर्णय आणि लोकसत्ता अमलांत येतील. आपल्या चौदा तत्त्वानीं "मी सत्ययुग प्रवर्तवीन" असा ज्याप्रमाणें प्रेसीडेंट विल्सन यांना भ्रम झाला होता त्याचप्रमाणें अशा तऱ्हेचें सत्ययुग निर्माण झालें आहे, या भ्रमांत जपान पडलें होतें. मानववंशांच्या समतेबाबतचा ठराव फेटाळून लावून जपानचा हा भ्रम युरोपीयन राष्ट्रांनीं लागलीच दूर केला. त्या प्रसंगाला उद्देशून दोन वर्षांपूर्वी पॉल रिशारनीं टोकीयोंत एक भाषण केलें होतें. समता, स्वाधीनता, व बंधुत्व हा फ्रेंच आदर्श असल्यामुळें जपानच्या ठरावाविषयीं पॉलच्या मनांत सहानुभूति असणें स्वाभाविक होतें. ते जपानला उद्देशून म्हणतात:—

राष्ट्रसंघांत एकादा ठराव पास करण्यानें युरोपांतील राष्ट्रांचा अभिमान आणि अज्ञान हीं नष्ट होतील असें का तुम्हांला वाटतें? ज्या मूर्खपणामुळें मनुष्य अन्याय करण्यास प्रवृत्त होतो तो मूर्खपणा शहाणपणाचा एकादा शब्द उच्चारून धुऊन काढणें शक्य आहे काय? तुमचें ध्येय

त्यांच्या लाभाच्या आड येत असेल तर ते त्याची फुटक्या कवडीइतकी तरी त्याची परवा करतील काय ? त्यांची धर्माविषयींची कल्पना, आपल्या स्वार्थावर परोपकाराचा मुलामा चढविण्यांत आणि स्वतःच्या अहंकाराला आदर्शाचे गोंडस नांव देण्यांत, सामावलेली आहे. तुम्ही युरोपकडून कशाची अपेक्षा करतां ? युरोपजवळ जी वस्तू नाहीं तिचीच ! अर्थात नवजीवनाची. परंतु युरोपकडून आज कशाचीहि अपेक्षा ठेवूं नका. युरोपला वैराग्य प्राप्त व्हावें, युरोपचा पुनर्जन्म व्हावा येवढीच इच्छा करा. युरोपला आज वाचविण्याची जरुरी आहे. प्रेमाचें वातावरण निर्माण करून तेथें माजलेल्या यादवीमधून आज युरोपला बचावलें पाहिजे. आत्मज्योति प्रकट करून त्याला अंधकारांतून बाहेर खेचलें पाहिजे. आणि मृत्यूच्या कचाटींतून त्याचें पुनरुत्थान केलें पाहिजे. जुनें युरोप-खानदानी युरोप-कधीच धुळीस मिळालें आहे. आपल्या पापाखालीं तें कधींच गाडलें गेलें आहे. नवें युरोप अद्याप जन्माला आलेलें नाहीं. तें अजून वाट पहात आहे. आशियाची वाट पहात आहे. कारण नेहमीं आशियाकडूनच युरोपला नवजीवन मिळालें आहे. आशियाच जगदुद्धारक बनला आहे. म्हणूनच मी युरोपचा पुत्र तुम्हांला प्रार्थना करीत आहे कीं तुम्हीं आशियाला जागे करा. जागे करून ऐक्य निर्माण करा. आशियांतील सर्व राष्ट्रांची संघटना करा. त्यांचे मालक बनूं नका, भाई बना. आशियाचा राष्ट्रसंघ बनवा, कुटुंब बनवा. हें सर्व करण्यासाठीं एकच प्राण संचारला पाहिजे. एकच आत्मा सर्वांत वसत असतो याचा साक्षात्कार जेव्हां तुम्हांला होईल तेव्हांच तुम्ही हें सर्व करूं शकाल. युरोपनें आशियाला लुटलें आहे. परंतु युरोप आशियाच्या या अमर आत्म्याला लुटू शकलें नाहीं. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' हा सिद्धांत आशियानें शोधून काढला आहे. आणि त्यांतच आशियाचा मोठेपणा आहे. युरोपची महत्ता, युरोपचें सामर्थ्य विज्ञानांत आहे; परंतु विज्ञानाचें सामर्थ्य अल्पजीवि असतें. थोडे दिवसपर्यंत सर्वत्र आनंदीआनंद व भपका, आणि नंतर सर्वनाश हा त्याचा इतिहास आहे. आशियाचें सामर्थ्य त्याच्या आध्यात्मिक ज्ञानांत आहे. हें सामर्थ्य चिरंजीवि आहे आणि त्यायोगें सर्वत्र चिरंतन शांति पस-

रत असते. या ऐक्य आणि शांतीच्या पायावरच नव्या जगाची उभारणी केली जाईल. आजचे कांहीं विजेते दंडुक्याच्या जोरावर तीं करूं इच्छितात, विषमतेच्या पायावर नवें जग उभारूं इच्छितात. पण तोंडानें जेव्हां ते शांतिपाठ उच्चारतात तेव्हां सर्व युद्धदेवता जागृत होतात. कारण शांतीच्या नांवावर त्यांना सर्व जगभर दंडुक्याचें राज्य चालवावयाचें आहे. परंतु याच्या उलट याची प्रतिक्रिया कशी होते आहे पहा. तेथें श्रीमंताविरुद्ध सर्व गरीब एक झाले आहेत. प्रजा राजसत्तेला विरोध करूं लागली आहे. कारण दोघेहि दंडुक्यानें समतेचें राज्य–समतेचा स्वर्ग–काबीज करूं इच्छिताहेत. त्यांचें अनुकरण करण्याची तुम्हांस जरुरी आहे काय ? उलट तुम्हीच त्यांना नवीन धडे शिकवा. शांति आणि बंधुत्व यांचें साम्राज्य प्रेमाच्या पायावरच—सर्व जीव, सर्व जाति, सर्व वंश, सर्व राष्ट्रें आणि सर्व जग यांत एकच ईश्वरीतत्त्व भरलेलें आहे या भावनेच्या पायावरच—स्थापित होऊं शकेल. या पायावर उद्यांची संस्कृति–आशियाची संस्कृति–रचा; ज्यांत उदारतेला, आर्यत्वाला हद्दपार केलेलें नाहीं अशी समता रचा, जिच्यांत सौंदर्याला बाध येणार नाहीं अशी न्यायाची इमारत उभारा. पृथ्वी आणि स्वर्ग यांना एकत्र आणणारें ईश्वरी साम्राज्य जेथें वसू शकेल अशी लोकसत्ता स्थापन करा. विषमता आणि भेदाभेद यांना जगांतून नेस्तनाबूद करण्याचा हाच एक मार्ग आहे.

एष पन्था । एतत्कर्म । नान्यः पन्था विद्यतेऽयनाय ।

भविष्याकडे पहा, कारण जगाचा कायापालट व्हावयाचा आहे. सगळ्या प्रजा नवें रूप धारण करतील. जे बदलत नाहींत त्यांना मरावें लागतें. भूतकाळांत काय शोधीत आहांत ? तेथें तर सगळे अन्याय आणि त्याचे भग्नावशेष पसरले आहेत. तुम्ही आदर्श शोधतां काय ? तेथें तर सगळा स्वार्थ पसरला आहे. भूतकाळाला विनाशाच्या रात्रींत अदृश्य होऊं द्या. भविष्याची काळजी करा. भविष्य ही भूतकालाची सुधारणा आहे. भूतकाळाचे डाग धुऊन टाकण्यासाठीं भविष्यकाल मिळालेला आहे. तुमच्या-

पेक्षां दुर्बळ आणि गरीब लोकांना असें कांहीं करूं नका कीं जें भविष्य-कालाला येऊन धुऊन काढावें लागेल. भविष्यकाळ जुल्मी लोकांना विरोध करतो. जुलमी लोक आपल्या दुष्कृत्यांचें बी भविष्यकालांत पेरून ठेवतात. युरोपची प्रजा ख्रिस्ताला पूजिते. ख्रिस्त आशियाचा पुत्र होता. आज जर येशू ख्रिस्त युरोप अमेरिकेंत जाईल तर त्याच्याजवळ कायद्याप्रमाणें अमुक इतके डॉलर्स नाहींत येवढ्यासाठीं त्याला ते हाकलून लावतील. ऑस्ट्रेलियांत जाईल तर इंग्रजी भाषेच्या परीक्षेंत तो पास होऊं शकणार नाहीं म्हणून त्याला तेथें उतरूं देणार नाहींत. आणि दक्षिण आफ्रिकेंतील ख्रिस्ती युरोपीयन लोक त्याला स्वतःला स्पर्श देखील करूं देणार नाहींत. याला ते सुधारणा म्हणतात ! जंगली लोकांच्या सुधारणा !!

अहंकारासारखा दुसरा मूर्खपणा नाहीं आणि अज्ञानासारखा दुसरा अहंकार नाहीं. तुम्ही पौर्वात्य लोक जेव्हां आम्हा पाश्चात्य लोकांना धिःकारीत होता तेव्हां तुम्ही जंगली होता. आज पाश्चात्य लोक तुमचा धिःकार करून स्वतःचा जंगलीपणा सिद्ध करीत आहेत. आशिया ही युरोपची माता आहे. तिचा अनादर करण्याचें जेव्हां युरोप सोडून देईल तेव्हांच तें सुधारेल. युरोपचा वर्णद्वेष हा मानवजातीचा तिरस्कार आहे. राष्ट्रसंघांतून तुम्ही निघून गेला असतां तर युरोपियन राष्ट्रें दचकलीं असतीं. परंतु तुम्ही हें विसरूं नका कीं त्यांचा राष्ट्रसंघ हा मेंढ्यांचें कातडें पांघरलेल्या लांडग्यांचा संघ आहे. जोपर्यंत हृदयपरिवर्तन होत नाहीं तोपर्यंत राष्ट्रसंघासारखी सुंदर संस्था उभी करून तरी काय होणार ? रशियाच्या जुलमी झारनें स्थापिलेल्या हेगच्या शांतिमंदिराची ती नवी आवृत्ति बनेल एवढेंच ! हेगचें हें शांतिमंदिरच या महायुद्धाचें निमित्त झालें होतें ना ? परंतु राष्ट्र-संघाशीं असहकार करणें येवढेंच पुरेसें नाहीं. वर्णवंश आणि भाषा यांचा भेद टाकून देऊन जगांतील सर्व मानवाशीं सहकार करा. आशियांतीस सर्व राष्ट्रांना एकत्र आणा. आशियांतील राष्ट्रें आतां स्वतंत्र झालींच पाहिजेत. जोपर्यंत आपला शेजारी गुलामगिरींत आहे तोपर्यंत आपण कोणीहि स्वतंत्र नाहीं. जोपर्यंत एकादेंहि राष्ट्र या जगांत दुसऱ्याचें गुलाम असेल तोपर्यंत कुठलेंहि राष्ट्र खरें स्वातंत्र्य उपभोगीत आहे असें म्हणतां येणार नाहीं.

सर्वांनीं स्वतंत्र व्हावें यासाठीं तुम्ही आपल्या दासाला मुक्त करून स्वतः देखील मुक्त व्हा. दुसऱ्याला गुलाम बनविल्यानें आपण देखील गुलाम बनतो. आशियाचा उद्धार कराल तेव्हांच तुमचा आणि जगाचाहि उद्धार व्हावयाचा आहे. कारण आशियाच जगाचें हृदय आहे.

ऐहिक वस्तूंच्या मोहानें प्रजेचा विनाश होतो. धनलालसेनें सत्यनाश होतो. पाशवी बळाचा अभिमान हा नेहमींच मृत्युमार्गाकडे नेणारा असतो. गेलीं चार वर्षे तुम्ही महायुद्धाचें भीषण नाटक पाहिलें आहे. या महाभयंकर रक्तपाताच्या अखेरीं लक्षावधि मानवांचा संहार झाला आहे. एक विशाल संस्कृति आणि जग विनाशाच्या निकट येऊन पोहोंचलें आहे. यापासून बोध घ्या. एका शब्दांतच हा बोध सांगतां येईल. ध्येय, आदर्श—आदर्शांचें अनुसरण करा. आदर्शाचा मार्ग हा एकच खरा मार्ग आहे; व्यवहार्य रस्ता आहे; सुरक्षित रस्ता आहे. उच्च सदिच्छा बाळगा, आशियाची नवी संस्कृति उभी करा कारण युरोपची संस्कृति आतां विनाशाच्या मार्गाला लागली आहे असें समजा. तुम्हालाच आतां आदर्श समाज निर्माण करून दाखवावा लागेल. राजा आणि प्रजा जेव्हां धर्मनिष्ठ होतात, ईश्वरपरायण होतात, तेव्हांच त्या दोहोंमधील विरोध नष्ट होऊं शकतो. अशा तऱ्हेचा आदर्श समाज बनवून राजा आणि प्रजेचें ऐक्य सिद्ध करून दाखवा. राजा हा विष्णूचा अवतार असेल तर प्रजा देखील विराट पुरुषाचेंच स्वरूप आहे. राजा जर एकमेवाद्वितीयम् तर प्रजा देखील सर्वं खल्विदं ब्रम्ह; आणि खरी लोकसत्ता हीच खऱ्या टेनोचें * साम्राज्य आहे.

राजा आणि प्रजा ही टेनोचीं दोन अंगें आहेत. तुम्ही आपल्यावरील शोगन सत्ताधाऱ्यांची ( राजे रजवाडे ) सत्ता नष्ट केलीत, परंतु तेच शोगन आतां नारिकिनचें ( भांडवलवाल्याचें ) रूप घेऊन तुमच्यावर राज्य करीत आहेत. युरोपचा इतिहास कंठशोष करून सांगत आहे कीं भांडवलवाल्यांच्या पाठोपाठ दुष्काळ आणि दिवाळें यांचें साम्राज्य

* टेनो हा ईश्वरी साम्राज्याचा—सत्ययुगांतील दैवी सम्राटाचा जपानी आदर्श आहे.

राजा आणि प्रजेचें ऐक्य साधल्यानंतर तुमचा शेजारी जो चीन त्याच्याकडे दृष्टिक्षेप करा. चीनचे सध्या जे तुकडे पडले आहेत ते सांधून द्या. तुम्हा दोघांचा आत्मा एक झाला पाहिजे. उद्यां आशियांतील सारे लोक स्वतंत्र होतील. कारण स्वातंत्र्यदेवीनें आतां या भूलोकावर विचरण्यास सुरवात केली आहे. पण प्रश्न फक्त एवढाच आहे कीं तुमचा देश आशियांतील लोकांचा उद्धारक होणार कीं इतराप्रमाणेंच तुमच्यादेखील तावडींतून आशियांतील लोकांचा उद्धार करावा लागणार? उद्यां आशियांतील प्रजा एक होतील. प्रश्न एवढाच आहे कीं जपान त्यांना एक करील कीं जपानच्या मदतीशिवाय किंबहुना जपानला विरोध करून देखील आशियाला एक व्हावें लागेल. दोन वर्षांपूर्वी मी तुमच्या देशाला सांगितलें होतें कीं चीनला 'शिंगटौ' परत द्या. अजून तुम्ही तें केलें नाहीं. आज मी तुम्हांला सांगतों कीं कोरीयाला मुक्त करा. आशियाचा विश्वास संपादन करा म्हणजे आशियावर तुम्हाला नैतिक साम्राज्य प्राप्त होईल. भविष्य कालीं तुम्हाला विजयमुकुट परिधान करावयाचा असेल तर तुम्हाला एवढी किंमत आज दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं जसजशी ढिलाई कराल तसतशी त्याची किंमत वाढत जाईल आणि हेतुसिद्धी मात्र दूर जाईल. या महान लाभासाठीं क्षुद्र विचारांचा त्याग करा. एवढें कराल तेव्हां पाया तयार झाला असें म्हणतां येईल. मग तुम्ही आध्यात्मिक साम्राज्याचे वीर आणि विजेते बनाल. स्वतःच्या आचरणानें जगाला दिव्य संदेश देणारे महान् धर्मप्रवर्तक बनाल.

कांहीं लोक तुम्हांला सुचवितात कीं परदेशांतील धर्मप्रवर्तकांना तुम्ही आपल्या देशांत येऊं देऊं नका. परंतु माझें असें सांगणें आहे कीं तुम्ही तसें करूं नका. ज्याप्रमाणें प्रत्येक स्वतंत्र राष्ट्रांत दुसऱ्या राष्ट्राचा प्रतिनिधी असतो त्याप्रमाणें तुम्ही वागा. तुमच्या धर्मोपदेशकांना देशोदेशीं धाडून द्या; आणि तुमचा प्रेमधर्म, विश्वैक्याचा धर्म जगाला शिकवा. दयामय प्रभूच्या नांवानें ज्या धर्मानें जगाला द्वेष व भीति यांनीं त्राहि भगवान् करून सोडलें आहे त्यांना शिकवा कीं सर्व प्राण्यांत आणि वस्तूंत एकच आत्मतत्त्व भरून राहिलें आहे. आणि म्हणूनच या पृथ्वीतलावर राहणारे आपण सर्व भाऊभाऊ आहोंत. अखिल मानव जातीला सुख आणि

ऐश्वर्य प्राप्त व्हावें म्हणून जो स्वतःच मानवीरूपानें अवतरतो त्या भगवंताचें नांव घेऊन सर्वत्र संचार करा. कारण आतां त्याच्या येण्याची वेळ झाली आहे, त्याच्या नांवाचा जयजयकार करा.

या पवित्र मंदिरांत मी भविष्यकालीन मानवाला आणि त्याबरोबरच तत्कालीन मानव समाजाचा नेता, मार्गदर्शक असा जो ईश्वरी पुरुष, त्याला देखील वंदन करतो. तो उद्यांचा पुरुषश्रेष्ठ, नव मानव--त्याचें वर्णन कसें करतां येईल ? तो आपल्याहून भिन्न असेल, पण त्याचा इनकार तरी कोण करूं शकणार ? प्रत्येक युगानें त्याची वाट पाहिली आहे. प्रत्येक मानव वंश त्याच्या आगमनाची आशा बाळगून आहे. सर्व धर्मसंस्थापकांनीं त्याच्याविषयीं भाकितें केलीं आहेत. गेलीं कित्येक शतकें त्याच्या आगमनाची तयारी चालूं आहे. आजचा मानव हा पृथ्वीवरील सर्वश्रेष्ठ प्राणी नव्हे. आधुनिक सुशिक्षित मानव, सर्वस्वी हिंस्र आणि रानटी महायुद्धें आत्मीयतेनें लढवणारा मानव ही परमेश्वराची सर्वश्रेष्ठ निार्मिती नव्हे. आजचा मानव पुरुषश्रेष्ठ नाहीं. तो नरव्याघ्र असेल किंवा व्याघ्रनर असेल. परंतु पृथ्वीनें आतापर्यंतची आपली प्रसववेदना त्याच्यासाठीं खास सहन केलेली नाहीं.

उद्यांचा मानव–तो पुरुषश्रेष्ठ–अद्याप झालेला नाहीं, परंतु तो येत आहे यांत शंका नाहीं. अखिल विश्व त्याची शतकानुशतकें वाट पहात आहे. धरित्री कंपायमान होत आहे. आणि जगांत ज्या कांहीं घडामोडी होत आहेत त्या त्याच्या आगमनाची जणूं कांहीं पूर्वचिन्हेंच आहेत. त्याच्या आगमनापूर्वी सर्व तुफान वादळें व झंझावात उत्पन्न होतात व हृदयाला पवित्र करणारा अग्नि प्रदीप्त होतो. आणि त्यानंतर नवजीवन उत्पन्न करणारा सौम्य प्राण जगांत अवतरत असतो. तो महादेव शिव देखील आहे आणि रुद्र देखील आहे. भयभीत राष्ट्रें त्याच्या नांवानेंच त्याला विरोध करतात. पाशवी बलानें ते त्या वादळावर विजय मिळवूं इच्छितात, विजेला शांत करूं इच्छितात, पंचमहाभूतांच्या प्रभावाला बांध घालूं इच्छितात; महासागराच्या भरतीला अडवूं इच्छितात. त्यांना असें वाटतें कीं ही पृथ्वी स्वतःच्या स्वार्थी अहंकाराच्या तृप्तीसाठींच आहे. पण त्यांना हें माहीत

यायचेंच. रशियाचा इतिहास देखील तेंच सांगतो. तुम्ही आपल्या राष्ट्रांतील नाहीं कीं हें जग प्रभूसाठीं आहे, भविष्यकालीन दैवी मानवासाठीं आहे. भविष्कालीन मानव आपल्यासारखा नाहीं, आपल्या कल्पनेप्रमाणेंदेखील नाहीं. आजचा मानव गुलाम आहे. उद्यांचा मानव मुक्त असेल. आजचा मानव दुर्बल आहे म्हणून तो पशुबलाची अपेक्षा बाळगतो; तो कृपण आहे म्हणून धनाची लालसा बाळगतो. उद्याचा दैवी मानव निःशस्त्र असूनहि समर्थ असेल, अकिंचन असूनहि समृद्ध असेल. त्याला कांहीं मिळवावें लागणार नाहीं. कारण सगळें त्याचेंच आहे. तो शक्तीच्या किंवा सत्तेच्या मागें लागणार नाहीं कारण तो सर्वशक्तिमान असेल. आजचा मानव विज्ञानावर विश्वास ठेवतो कारण तो अज्ञानी आहे. भविष्यकालीन मानव स्वयंप्रज्ञ असेल, त्याला ज्ञानाचा साक्षात्कार झालेला असेल. ऐहिक कायद्यांचे आणि नियमांचें पालन करून आजचा मानव स्वतःला शुद्ध समजतो पण उद्याचा दिव्यपुरुष बाह्य बंधनापासून मुक्त असून शुद्ध अंतःप्रेरणेच्याच नियमांच्या ताब्यांत असेल. आजच्या माणसाची धार्मिकता कोणताहि एक धर्म मानण्यांत सामावलेली आहे. पण उद्याचा माणूस अमुक एका धर्माचा असणार नाहीं किंवा सर्व धर्म त्याचेच असतील. कारण त्याला परमेश्वराचा साक्षात्कार झालेला असेल. पृथ्वीप्रमाणें स्वर्गाचाहि तो रहिवाशी असेल. तो या जगाचा स्वामी आणि सेवक दोन्हीहि असेल. आजच्या मानवांनो ! तुम्ही त्याची कल्पना कशाला करतां ? त्याचें वर्णन कशाला करतां ? तुम्हीच उद्याचे मानव बनून जा. तो तुमच्या जवळच आहे पण अदृश्य आहे. आपल्या हृदयाचीं द्वारें उघडून त्याला स्थान द्या. तो एकाच हृदयांत प्रवेश करणार नाहीं. साऱ्या समाजांत प्रवेश करूं इच्छितो. तोच तुम्ही व्हा आणि या जगावर त्याचें राज्य होवो.

पृथ्वीवर कित्येक अलौकिक पुरुष असतात. दिसण्यांत सामान्य लोकांपेक्षां ते वेगळे दिसत नाहींत. परंतु या मर्त्य लोकांत ते अमर असतात. दुनिया त्यांची कदर करीत नाहीं. पण दुनियेला जें समजत नाहीं तें ते जाणतात. जग ज्याच्यामागें धावत असतें तें त्यांना मिळालेलें असतें. त्यांची वासना नष्ट झालेली असते, त्यांना अमर्याद सुख प्राप्त झालेलें असतें.

ते एकांतांत राहातात पण त्यांचा एकांत हेंच एक मोठें जग बनतें. ते जन्मापासून दरिद्री असतात किंवा जन्मापासून नसले तरी थोड्याच दिवसांत दरिद्री बनून जातात. तरी पण साम्राज्याची दौलत त्यांना मोहविवश करीत नाहीं. त्यांची संपूर्णता कोणत्याहि गोष्टीमुळें वाढत नाहीं किंवा कमी होत नाहीं. जगांतील सारी संपत्ति त्यांच्या दारिद्र्यमय श्रीमंतीची बरोबरी करूं शकणार नाहीं. जगाचें दुःख त्यांनीं पाहिलेलें असतें आणि अनेक संकटें व कष्ट त्यांनीं अनुभवलेले असतात. तरीहि त्यांचें हृदयाकाश शांत आणि स्वच्छ असतें. भयंकर वादळांत देखील त्यांच्या हृदयाला शांति मिळते. रणांगणावर देखील ते शांततेचा उपभोग घेतात. नरकांत देखील ते ईश्वरी प्रसन्नतेचे किरण पाहतात. असे अमृताचे पुत्र सर्व धर्मांत असतात. तरी ते रूढ धर्मांहून वेगळे असतात. ते शिखरावर आरूढ झालेले असतात. सगळे रस्ते तेथेंच येऊन मिळतात. पृथ्वीला मातृभावानें वंदन करतात म्हणूनच ते स्वर्गाला ओळखतात. या पृथ्वीवरच ते स्वर्ग आणतात. खरोखर पृथ्वी हीं मनुष्य आणि स्वर्ग यांच्या आड आलेली नसून मनुष्य स्वतःच पृथ्वी आणि स्वर्ग यांच्या आड येतो. मनुष्य जसा कित्येक वेळां पृथ्वीचा नरक बनवतो, त्याप्रमाणें तो तिचा स्वर्गदेखील बनवूं शकतो. फक्त माणसांचा अहंकार नेहमीं आड येतो. अहंकारांत दुःख आहे. स्वर्गांतदेखील अहंकाराच्या नशिबीं दुःखच आहे. आत्म्याला स्वर्गांत रहावयाचें नाहीं, स्वर्गालाच आत्म्यांत आणावयास हवें. खरा आनंद, सुख आणि दुःख या दोहोंहून वेगळा आहे. उपनिषदें म्हणतात —

> यतो वा इमानि भूतानि जायन्ते, येन जातानि जीवन्ति ।
> यत् प्रयंति अभिसंविशंति तद् विजिज्ञासस्व ।
> आनंदात्हि अेव खलु इमानि जायन्ते ! आनन्देन जातानि जीवन्ति
> आनन्दम् प्रयंन्ति अभिसंविशन्ति ।

अहंकाराची गांठ सुटली कीं ते मुक्त होऊन आनंदांत-अमर्याद शुद्ध आनंदांत—प्रवेश करतात. हा कांहीं सिद्धांत किंवा मत नाहीं. तो एक अनुभव आहे. साक्षात्कार आहे. सर्व काळचा आणि आणि सर्व स्थळांचा

अनुभव आहे. सर्व अमृताचे पुत्र असेंच सांगतात. कांहीं बोलतच नाहींत; कारण त्यांना अवर्णनीय वस्तु मिळालेली असते.

अशा अमृताच्या पुत्रांच्या शोधार्थ मी सगळें जग हिंडलों आहे. कारण त्यांची एकत्र येण्याची वेळ आलेली आहे. भिन्न भिन्न परिस्थितींत तें राहतात. तरीहि सर्वांत एकच ईश्वरी शक्ति आणि आनंद वास करीत असतो. लोक अद्भुत शक्तीवर विश्वास ठेवीत नाहींत. परंतु हे अमृताचे पुत्र एका दृष्टिपातानेंच जुनी रचना मोडून टाकतात. असे अमृताचे पुत्र मला भेटले आहेत. त्यांच्यांत कित्येक स्त्रियाहि आहेत. आणि अशांचा शोध करीतच मी या देशांत आलों आहे. कारण त्या सर्वांची एका ठिकाणीं येण्याची वेळ जवळ आली आहे असें मला वाटेंत. जेव्हां ते एकत्र येतील तेव्हां परमेश्वर प्रगट होईल.

आशियानें एक झालें पाहिजे. अशाप्रकारें एक होण्यांतच त्याचें उज्वल भवितव्य, उच्च जीवन आणि सोज्वळ संस्कृति साठविलेलीं आहे. प्रत्येक राष्ट्राचें वैशिष्ठ्य एकत्र येऊन आशियाचा आत्मा संपूर्ण होईल. जपानची भावना, चीनची बुद्धिमत्ता, आणि हिंदुस्थानची धार्मिकता यांचा सुंदर मिलाफ होईल. आणि या भविष्याच्या उदरांत आशियाचे सर्व आदर्श एकत्र होतील. सर्व धर्मांचा समन्वय तेथें होईल. वैदिक धर्म व शिंटो धर्म, बौद्ध धर्म व शांत झालेले खिस्ती व इस्लामी धर्म हे तेथें एकत्र येतील; कारण हे अनेक धर्म अनंताच्या उपासनेच्या एकाच धर्माचे भिन्न भिन्न संप्रदाय आहेत.

—एप्रिल १९२१

---

पॉल रिशारच्या पुस्तकाचें सार या आणि यानंतरच्या लेखांत देतांना काकासाहेबांनीं 'आशियाच्या साधनेविषयीं' आपल्याला मान्य असलेले विचार या ठिकाणीं मांडलेले आहेत. या दोन्ही सारानुवादांत स्वामी आनंदांचा हात असावा असें समजतें.

—संपादक.

लोकसत्तेच्या कल्पनेचा प्रचार देशांत कोणत्याप्रकारें करावा असा प्रश्न जपानमधील एका प्रख्यात मासिकाच्या संपादकानें महाशय पॉल रिशार यांना विचारला होता. त्याला उत्तर म्हणून लोकसत्तेविषयींची आपली उदात्त व व्यापक कल्पना व व्यापक कल्पना त्यांनीं 'आशियाचा प्रभातकाल' यांत दिली आहे. त्यांत ते म्हणतातः—

सध्यांची लोकसत्तेची कल्पनाच भ्रामक आहे. तिला आपल्या देशांत दाखल करण्याचा मोह तुम्ही बाळगूं नका. खरी वस्तू शोधून काढा आणि तिचा प्रसार करा. जगाला शिकवा.

लोकसत्ता दोन प्रकारची असते. एक खरी व आदर्श. आणि दुसरी पार्लमेंटरी पद्धतीची; जी आजकाल पुष्कळ देशांत चालू आहे. पहिली कोठेंहि पाहण्यांत आलेली नाहीं. दुसरी व्यक्तीला आणि संपत्तीला प्रमुख पद देते. अशा लोकसत्तेला का जपान आपलीशी करूं इच्छित आहे ? तसें असेल तर जपानला खूप विचार केला पाहिजे. पाश्चात्य गुरूंची नक्कल करण्यास कितीसा वेळ लागणार ! जपान आजकाल परदेशींयांचें अनुकरण करूं लागलाच आहे. आचाराबरोबर विचार व वस्तूमागून वृत्ति आपणांत घुसत असतात. प्रत्येक वस्तूंत ती तयार करणाऱ्या कारागीराची वृत्ति देखील वसत असते. म्हणूनच पाश्चात्यांच्या वृत्तीचा स्वीकार केल्यामुळें जपानच्या हृदयांत पार्लमेंटरी पद्धतीच्या भांडवलशाही प्रधान लोकसत्तेच्या कल्पनेनें ठाण मांडलें आहे.

यांत दोन दोष आहेत. पहिला, तितकासा मोठा नाहीं पण दुसरा मात्र प्राणघातक आहे. जपान ज्यांचें अनुकरण करूं इच्छितो ते युरोप व अमेरिका यांच्यांत अतिशय झपाट्यानें बदल होत आहेत. आज तुम्ही

त्यांच्या ज्या राजकीय अथवा सामाजिक पद्धतींचें अनुकरण करूं इच्छितां त्या पद्धती त्यांनीं कालच रद्द करून फेंकून दिलेल्या आहेत. जिला तुम्ही आदर्श पद्धति म्हणून स्वीकारतां तिला त्यांनीं प्रगतीला बाध आणणारी आणि जंगली म्हणून जाहीर केलें आहे. अनुकरण करूं जाल तर तुम्ही नेहमीं मागासलेलेच रहाल.

आजच युरोपांत कोट्यवधि लोकांनीं मध्यम वर्गाची व्यक्तिप्रधान सत्ता झुगारून देऊन मजूरांची आणि शेतकऱ्यांची सत्ता दाखल केली आहे हें तुम्हाला दिसत नाहीं का ? पार्लमेंटरी भौगोलिक व प्रांतिक प्रतिनिधित्वाची कल्पना कृत्रिम वाटल्यामुळें त्यांनीं फेंकून दिली आहे. त्याऐवजी धंदेवार सामाजिक सत्तेचें ‘ सोव्हीएट् ’ त्यांनीं स्थापन केलें आहे. युरोपचा मोठा भाग हा असा बदललेला आहे. उरलेला हां हां म्हणता बदललेला तुम्ही पहाल !

हें सर्व अहेतुकपणें घडलेलें नाहीं. हें पिरिवर्तन कितीहि असामान्य वाटत असलें तरी तें स्वाभाविक विकासानें झालेलें आहे. या विकासामागें जें तत्त्व आहे, जी विचार प्रणाली आहे, ती समजून घेणें कठीण नाहीं.

या परिवर्तनाचीं कारणें आपल्याहि देशांत प्रविष्ठ झाल्यानंतर त्याचीं स्वाभाविक फळें आपल्याला मिळाल्याशिवाय कशी राहतील ? जपानला असें वाटतें काय कीं हा मार्ग दुसऱ्यासाठीं विनाशाचा असला तरी स्वत:ला त्याची आंच लागणार नाहीं ? तसें असेल तर जपान धोका पतकरीत आहे. जेव्हां एकादा समाज सत्याला सोडून असत्याला डोक्यावर घेतो; सत्याला सोडून पाल्यापाचोळ्याच्या मागें धांवतो तेव्हां समाजांतील पार्थिव लोकांच्या—संपत्तिपरायण लोकांच्या—हातांत सत्ता जाते. प्रथम धनाढ्य वर्गाच्या आणि नंतर मध्यम वर्गाच्या मजुरांच्या हातून धनराशी रिचवणें हेंच जेव्हां समाजाचें एकमेव काम होतें, तेव्हां सहजच मजुरांची प्रतिष्ठा वाढते. ज्याच्याशिवाय तुमचें चालणार नाहीं, ज्याच्या जीवावर तुम्ही सारी चैन करतां तो मजूरच शेवटीं तुमचा स्वामी होईल. त्यांच्या हातीं तुम्हाला राजसत्ता द्यावी लागेल. आणि हें योग्यच आहे.

अशाप्रकारें पाश्चात्यांचा जडवाद स्वीकारण्यानें, भांडवलवाल्यांना अनुकूल अशी समाजरचना करण्यानें, आधुनिक संस्कृतीच्या नांवानें ओळखला जाणारा सुधारलेला जंगलीपणा स्वीकारण्यानें, शेवटीं देशांत मजूर व कामकऱ्यांची सत्ता स्थापन व्हायचीच. ज्या आर्थिक कारणामुळें आज जपानांत ‘नारिकिन’ (भांडवलवाला वर्ग) निमार्ण झाला आहे, त्याच कारणामुळें त्याच्या मागोमाग मजूरांची सत्ता ही यावयाचीच. या धडधडीत दिसणाऱ्या गोष्टीकडे डोळेझांक करून काय होणार? दृष्टिक्षेप तर करून पहा, सारें दृश्य आरशाप्रमाणें तुम्हाला दिसूं शकेल. तुम्हाला हें भविष्य न आवडणारें आहे. तें टाळण्यासाठीं तुम्ही काय केलें? कल्पना–साम्राज्यांत वावरणारे कांहीं लोक जुनें सत्ययुग पुनः अवतरण्याची आशा बाळगतात. जेव्हां लोक व्यापारामागें लागले नव्हते, जेव्हां जगांत सगळीकडे आपला व्यापार लादण्याचा व्यापारी आग्रह नव्हता, जेव्हां आपली कारागीरी आणि आपला आत्मा विकून खाण्याची ‘सुधारणा’ कारागीरांत शिरली नव्हती, जेव्हां मनुष्याला आपली उपजीविका परमात्म्याचा प्रसाद म्हणून मिळत होती व मानव आपल्या हातून निर्माण होणारें सर्व कांहीं कृष्णार्पण करीत असे आणि अशाप्रकारें सर्व लोक स्वभावतःच एकमेकांची सेवा करीत असत, असें तें सत्ययुग पुनः येण्याची आशा आतां नाहीं. मनुष्य स्वतंत्र राहिलेला नाहीं. पोटासाठीं त्याला काम करावें लागतें. ‘ टेनो ’ साठीं आतां तो काम करीत नाहीं. परंतु नफा मिळण्यासाठीं तळमळणाऱ्या भांडवलदार गिरणीमालकासांठीं त्याला काम करावें लागतें.

लोकहितासाठीं निष्काम कर्म करण्याचा आदर्श तुम्ही त्याच्यापुढें आतां ठेवूं शकत नाहीं. ज्या गिरणींत त्याला काम करावें लागतें त्या गिरणीच्या मालकांना प्रथम निष्काम कर्मांचा--निस्वार्थी जीवनाचा मंत्र तुम्ही पटवा. तरच मजुराच्या मनांतून आपण गुलाम आहोंत ही भावना निघून जाईल. आणि तो स्वतःहि शेठ बनण्याचा प्रयत्न करणार नाहीं.

कांहीं लोकांना असें वाटतें कीं अशाप्रकारें सत्ययुगाकडे परत जाणें हें जरी संभाव्य राहिलें नसलें तरी आजच्या अधोगतीच्या मार्गानें पुढें जाण्याचें तरी पाशवी बळानें कां थांबवूं नये? होय, कड्यावरून कोसळ-

णाऱ्या धबधब्यालादेखील हातापायाचा जोर लावून कां अडवींत नाहीं ? त्याचा प्रवाह तुम्ही कदाचित् क्षणभर अडवूं शकाल परंतु यामुळें उलट तो अनिवार्य होऊन बसेल याचा कांहीं विचार तुम्ही केला आहे काय ? त्याला अडविण्यासाठीं तुम्ही जितके बांध बांधाल तितका तो उंच चढत जाईल आणि शेवटीं बांध तोडून अतिवेगानें खालीं पडून उत्पात माजवील. चैतन्याला त्रिभुवनांत कोणी अडवूं शकत नाहीं. त्याला पुरून टाकल्यास तें उगवून वर येईल. त्याला दडपून टाकल्यास तें उसळी मारुन वर येईल. विचाराच्या भरारीला कोण अडवूं शकेल ? शक्तिमान विचारांच्या विजययात्रेचा मार्ग कोण तोडूं शकेल ? जगांतील एकाहि पोलीसाच्या हातीं ही सत्ता नाहीं. ज्या उच्च आकाशांतून उतरून हे विचार हृदयांत विजेत्याप्रमाणें प्रवेश करतात तेथें त्या स्वतंत्र प्रदेशांत--तुमच्या नोकरशाहीचे कायदे कानू पोहोंचूं शकणार नाहींत. जो दुर्बळ असेल तोच बळाचा उपयोग करील; जबरदस्ती करील. पाशवी बलाचा मार्ग, तुम्ही ज्या गोष्टीं टाळूं इच्छितां तिच्याचकडे तुम्हाला अचकू घेऊन जातो. रशियाचे झार याच रस्त्यानें गेले होते. तुम्ही त्यांचें अनुकरण करूं नका.

तुम्हाला न आवडणारें लोक-बळ दडपून टाकण्यासाठीं जेव्हां तुम्ही आपली सेना धाडतां तेव्हां खूप काळजी घेत जा. तुमचीं लष्करें कदाचित् बाह्य विजय मिळवितील. परंतु त्या लोक-बळानें-लोकचैतन्यानें-कुठें तुमच्या सेनेच्या हृदयावर विजय मिळविला नाहीं ना इकडे ध्यान असूं द्या!

तर मग या संकटांतून पार पडण्याचा एकहि मार्ग नाहीं का. नाहीं कसा ? रस्ता अगदीं नीट आहे. त्यांत मागें राहण्याची किंवा परत फिरण्याची कांहीं आवश्यकता नाहीं. जें यावयाचें आहे त्याच्यासाठीं वाट करून द्या. आणि त्याच्यावर विजय मिळवा. भविष्यापासून दूर पळूं नका. त्याचा नाश करण्याचादेखील प्रयत्न करूं नका. भविष्याच्या सेवेला लागा. उद्यांचे साहाय्यक, साथीदार बना. नाहींतर तोच तुम्हाला विरोध करील. भविष्याचा पाया रचण्यास सुरवात करा, नाहींतर तोच तुम्हाला उखडून टाकील. महापूर येत आहे त्यासाठीं पाट खोदून तयार ठेवा. तसें कराल

तरच तुमची जमीन वाहून जाण्याऐवजीं पुराच्या नवजीवनानें सस्यशालिनी होईल.

या नवीन येणाऱ्या चैतन्यावर तुम्हाला सत्ता प्राप्त करून घ्यावयाची असेल तर त्याला मारून टाकण्याचा प्रयत्न करूं नका. त्याचें मार्गदर्शन करण्याची हिंम्मत बाळगा. त्याचे सहाय्यक बनाल तरच त्याचें मार्गदर्शन करूं शकाल कामगारांच्या, जनतेच्या हितरक्षण करणाऱ्या योजना आजच तुम्ही स्वतः तयार करा, नाहींतर ते स्वतःच आपल्या योजना बनवतील आणि तुम्हाला विरोध करूं लागतील. उद्यां प्रायश्चित्त घ्यावें लागूं नये म्हणून सर्वांना सारखा आणि संपूर्ण न्याय द्या. सारांश तुमच्या किंवा इतरांच्या स्वार्थी वासनांचे निराकरण करावयाचें असेल तर आदर्शाची उपासना करा. दुसरे सोपे मार्ग सांपडतील परंतु ते विनाशाकडे नेणारे आहेत; त्यांचा त्याग करा.

आज अनुकरण नको आहे. संस्करण हवें आहे. नकली बनूं नका. दुसऱ्यांकडून नकली लोकसत्तेचे धडे शिकण्यापेक्षां खऱ्या लोकसत्तेचे धडे इतरांना शिकवा. आणि ती खरी लोकसत्ता हातीं यावी म्हणून तुम्ही स्वतः त्याचें आचरण करा.

खरी लोकसत्ता ही एकादी खास पद्धति किंवा तंत्र नसून ती एक अन्तःकरणाची प्रवृत्ति आहे ती कायदे, नियम, संस्था आणि पार्लमेंट सारख्या लोकसभा यांच्यावर अवलंबून नसते. साम्राज्यांत सुद्धां लोकसत्ता संभवते आणि प्रजासत्ताकांतसुद्धां हुकुमशाही चालूं शकते. राष्ट्राध्यक्ष राजापेक्षां जास्त हुकूमशहा असूं शकतात. रोमन साम्राज्यांत जितकी हुकूमशाही होती त्यांहून ग्रीक प्रजासत्ताकांत अधिक गुलामगिरी होती.

इंग्लंडांतील बहुतेक साऱ्या संस्था लोकसत्तावादी आहेत तरीहि तेथली सारी जमीन मूठभर लोकांच्या हातीं आहे. लंडनची लोकसभा ( Parliament ) साऱ्या जगांत आदर्श समजली जाते, तरीहि लंडनमध्यें जितके गरीब लोक उपाशी मरतात तितके इतरत्र क्वचितच मरत असतील.

सरकारी धोरण वारंवार प्रजेला समजावून देणें म्हणजे लोकसत्ता स्थापन करणें असें कांहीं म्हणतां येणार नाहीं. कांहीं दिवसापूर्वी एक अमे-

रिकन कोट्यधीश रशियांतील उपाशी मरणाऱ्या मजूरांना आणि शेतकऱ्यांना लोकसत्तेचें रहस्य समजाविण्यासाठीं माजी झारच्या स्पेशल ट्रेनमधून फिरत होता आणि राजमहालांतील खिडकींत बसून भुकेलेल्या लोकांना व्याख्यानें ऐकवीत होता. याला का लोकसत्तेच्या प्रस्थापनेचा प्रयत्न म्हणावयाचें ?

खरी लोकसत्ता निवडणुकीच्या कवायतींत देखील नाहीं. " तुझ्यावर वाटेल तसें राज्य करणाऱ्या पाचशें किंवा सहाशें मालकांपैकीं अमक्याच्या बाजूनें किंवा त्याच्याविरूद्ध तूं आपलें मत दे, म्हणजे तूं स्वतंत्र आहेस " असें म्हणून चारी बाजूंनीं गुलामगिरीनें जखडलेल्या आजच्या गुलामाला फसविण्यांत देखील खरी लोकसत्ता नाहीं. एकाऐवजीं पुष्कळ लोक हुकूमशाही गाजविण्यासाठीं एक झाले म्हणजे कांहीं ती स्वतन्त्रता होत नाहीं. जुलूम करण्याची सत्ता एकाच्या ऐवजीं बहुमताच्या हातीं दिल्यानें कांहीं स्वातंत्र्य प्रस्थापित होत नाहीं. निनांवी हुकूमशाही किंवा धनिकवर्गाची लोकसभेमध्यें निवड, याला कांहीं खरी लोकसत्ता म्हणतां येणार नाहीं. खरी लोकसत्ता, स्वाधीनता ही मानवाला त्याच्या बंधनामधून सोडविण्यांत, त्याला उदात्त, महत्तर, आणि सुखी बनविण्यांत आहे. जेथें मोठे लोक स्वतःला लहान समजतात व सामान्यलोक स्वतःची महत्ता समजूं शकतात तेथेंच खरी लोकसत्ता वसत असते. जेथें मोठे लोक सामान्य लोकांचे आदर्श बनतात, स्वतः निस्वार्थी व अकिंचन असतात तेथेंच खरी लोकसत्ता नांदूं शकते. जेथें राजे लोक मातीच्या भांड्यांत जेवून देखील लोकांवरील आपली सत्ता राखूं शकतात तेथेंच खरी लोकसत्ता असते.

जेथें लोकसेवेसाठीं राज्य स्थापिलें जातें, जेथें राजांच्या दृष्टिनें प्रजापालन हें जणुं काय स्वतःच्या मुलांचेंच पालनपोषण असतें आणि जेथें प्रजानुरंजन हाच मुख्य राजधर्म मानला जातो, तीच खरी लोकसत्ता होय.

परंतु हें लोकरंजन किंवा लोकमत म्हणजे कांहीं विशिष्ठ गटांतील लोकांच्या मनाची लहर असणार नाहीं. आपला स्वार्थ साधण्यासाठीं जनमताला चिरडून टाकून कांहीं लोकांनीं माजविलेली हुल्लड असणार नाहीं.

खऱ्या लोकमतांत जनतेचें हृदय आणि आत्मा प्रतिबिंबित झालेले असतात. जे आपला स्वार्थ विसरून गेलेले आहेत, तेच या जनमतास समजूं शकतात आणि लोकसेवा करूं शकतात. आपल्याच विशिष्ठ पक्षाचें हित साधणारे धंदेवाईक मुत्सद्दी लोकमताचे खरे प्रतिनिधि होऊं शकणार नाहींत.

जनतेच्या हृदयापुढें — विराट आत्म्यापुढें जेथें व्यक्तीची मान नमते आणि जेथें विराटांची शक्ति सामान्य व्यक्तीचा आदर राखते, तेथेंच खरी लोकसत्ता असते. ती व्यक्तिप्रधानहि असत नाहीं वा समाजप्रधानहि असत नाहीं. ती उभयप्रधान असते. व्यष्टि आणि समष्टि दोहोंचा तेथें मिलाफ झालेला असतो.

खऱ्या लोकसत्तेंत राज्यतंत्रहि असत नाहीं आणि प्रजातंत्रहि असत नाहीं. कारण तिला फक्त खरें प्रजातंत्रच खपतें. आणि खोट्या राजांनाच-जे राजे अन्याय आणि पाप यांच्याशीं मैत्री करून खरें दैवत जी प्रजा तिचा द्रोह करतात-अशांनाच-ती हांकलून लावते. खरी लोकसत्ता खोट्या राजसत्तेची पाळेंमुळें खणून काढते. आणि इतकेंच नव्हे तर खऱ्या राजसत्तेची प्रतिष्ठापना करते. प्रजारक्षक होण्याऐवजीं प्रजाभक्षक होणाऱ्या राजाचा ती नाश करते. अन्यायानें चिडून प्रक्षुब्ध झालेला जनतेचा आत्मा या प्रजापीडकाला वेन राजाप्रमाणें उखडून टाकतो.

खऱ्या लोकसत्तेचा स्वभाव हा असा आहे. ज्या ठिकाणीं ती प्रभावशाली असते त्या ठिकाणीं सत्य आणि न्याय यांचें आधिपत्य चालतें. जगांतील महान् समन्वय लोकसत्तेंत आहे. खऱ्या लोकतंत्रांत स्वतंत्रता आणि एकता एकत्र नांदू शकतात. व्यवहारवाद आणि आदर्शवाद यांचें मधुर मीलन येथेंच होऊं शकतें. स्वर्ग आणि पृथ्वीचा संयोग येथेंच होतो.

पण अशी लोकसत्ता आहे कोठें ? कोठें मिळणार ? अजून ती कोठेंहि अवतीर्ण झालेली नाहीं. आणि म्हणून साऱ्या जगांत अव्यवस्था, अव्यवस्था माजलेली आहे. या अनवस्थेमधूनच जगांतील सारे लोक खऱ्या लोकसत्तेचें दर्शन घेऊं इच्छितात. तिच्यातूनच ती अवश्य निर्माण होईल. पण जपानच्या नागरिकांनो ! तुम्ही देखील त्याच अनवस्थेमधून, त्याच घोटाळ्यांतून तुमच्या देशांत ती खरी लोकसत्ता अवतरावी असें इच्छितां काय ?

मुळींच नाहीं. मग इतर लोक त्या खड्ड्यांत कसे पडले तें तुम्ही समजून घ्या. विचारांतील व आचारांतील अहंकार, अन्याय व जुलूम हींच त्याच्या मुळाशीं आहेत. त्यांनीं साऱ्या दुनियेचा लोभ धरला आणि आपल्या आत्म्याचा खून केला.

जपान ! त्या लोकांचें अनुकरण तूं मुळींच करूं नकोस. तुझ्या आत्म्याचें आणि परमात्म्याचें दर्शन करण्याचा तूं प्रयत्न कर. तुझ्या खास निर्मिलेल्या ईश्वरी आदेशाची ओळख करून घे आणि त्याची अम्मल-बजावणी कर. आशियाला स्वतंत्र कर, सुखी कर. कारण त्यांचा भार तुझ्या शिरावर आहे, त्यांतच तुझ्या कर्तव्याची सिद्धि आहे. त्यांतच तुझी देखील स्वतंत्रता आहे. दुसऱ्यांची जितकी सेवा तूं करशील तेवढेंच तुझें भलें व्हावयाचें आहे. सत्कर्मानें तुझी आंतरिक शुद्धि व्हावयाची आहे. आणि नंतर आशियांतील जनतेची महत्ता तुझ्यांत अवतरेल आणि तुझ्या येथें सारा आनंदी आनंद होईल.

जपान ! तुझीं बाह्य कर्तव्यें तूं आपल्या धर्मबुद्धीनें पार पाड. त्यानेंच तुझ्यांतील आंतरिक तिमिराचा नाश होऊन तुझा उद्धार होईल !

(आज जपान चीनचा संहार करण्याची खटपट करीत आहे अशावेळीं हीं वचनें कशीं वाटतात ? जपानच्या हातून आशियाचा उद्धार ? १९३८)

# १ : आपला अमर वारसा.

साहित्य, संगीत आणि कला या तीन्हीमध्यें देशाची सुसंस्कृतता दिसून येत असते. निरनिराळया मानववंशाचे आदर्श आणि महत्त्वाकांक्षा काय आहेत याचें प्रतिबिंब आपण साहित्यांत जास्त स्पष्टपणें पाहूं शकतो. एकाद्या देशाचा इतिहास लुप्तप्राय होऊन गेला असेल आणि साहित्य, संगीत व कला हींच फक्त राहिलीं असतील व त्यांच्या विकासाचा स्थूल कालक्रम समजण्यासारखा असेल तर सांस्कृतिक दृष्ट्या त्या देशाचा इतिहास आपल्याला पुरेपूर मिळूं शकेल. साहित्यांत त्या त्या वंशांचे राष्ट्र आणि जीवनविषयक विचार व आकांक्षा या प्रगट व्हावयाच्याच. संगीतांत जनतेच्या हृदयाचें खोल, उदात्त आणि कोमल भावनांचें चित्र दिसावयाचेंच. त्याप्रमाणें स्थापत्य, शिल्प आदि कलामध्यें भौतिक ज्ञानाचा संबंध असल्यामुळें त्या कलांत अमूक एक जाति किती सुधारलेली होती, तिची योजनाशक्ति कुठवर पोहोंचूं शकत होती, सुख, सोय व उच्च अभिरुचि याविषयीं त्या जातीची कल्पना कोणत्या प्रकारची होती, हें सर्व कळून येतें. म्हणून कोणत्याहि जनतेच्या इतिहासांत साहित्य, संगीत व कला यांचें स्वरुप व स्थिति कशी होती या गोष्टी आल्या पाहिजेत. सुदैवानें हिंदुस्थाननें या तीन्ही दिशांनीं असाधारण प्रगति केलेली आहे. हिंदुस्थानचें स्थापत्य, शिल्प व साहित्य पाहून जुन्या काळचे व हल्लीचेहि परदेशांतील विद्वान पुरुष मुग्ध होऊन गेले आहेत. जी जाति हजारों वर्षें पारतंत्र्यांत राहिलेली आहे तिच्या डोक्यावर असंस्कृततेचें आणि नादानपणाचें खापर फुटावयाचेंच. अशा स्थितींत आपली परंपरागत संस्कारिता सिद्ध करण्याचा आणि महत्त्वाकांक्षा जागृत करण्याचा प्रेरक उपाय म्हणजे त्या जातीचें साहित्य, संगीत, कला आणि स्थापत्य यांचें ज्ञान सर्वत्र पसर-

विणें हा होय. म्हणून इतिहासांत या विषयाला जितकें महत्त्व द्यावें तितकें थोडेंच होय. आजपर्यंत या विषयाची आपण इतकी कांहीं उपेक्षा केली आहे कीं त्यांत एकाएकीं खोल उतरणें सोपें होणार नाहीं. तरीपण हर्षाच्या वेळेपर्यंत या सर्व दिशांनीं हिंदुस्थान किती पुढें गेलें होतें याचा आपण विचार करूं.

जगांतील सर्वांत प्राचीन साहित्य म्हणजे आपले वेद होत. वेदाबरोबर उच्चारशास्त्र, यज्ञविधिशास्त्र, शब्दसिद्धिशास्त्र, भाषाशास्त्र, कालगणना शास्त्र व छंदःशास्त्र अशीं सहा शास्त्रें* होतीं. यावरूनच त्यावेळच्या आर्यांचा सुसंस्कृतपणा लक्षांत येतो. कांटेकोरपणा आणि सूक्ष्मता हीं संस्कारितेचीं दोन मुख्य अंगें आहेत. वेदामध्यें ही दोन अंगें नेहमीं पाहण्यास मिळतात. वेदकाळची समाजरचना देखील सुधारलेली होती. यज्ञाच्या अनुषंगानें गणितज्ञान देखील सूक्ष्म झालें होतें. शत्रूंशी लढण्यांत आणि गहन अरण्यांत प्रवेश करण्यांत आर्यलोक जितके शूर होते तितकीच विचारक्षेत्रांत आणि कल्पनाक्षेत्रांत वाटेल तितक्या खोलपर्यंत प्रवेश करण्याची बहादुरी देखील त्यांच्यांत होती. विशेषतः मानसशास्त्र आणि धर्मशास्त्र हा त्यांचा अतिशय आवडता विषय होता. त्या दिशेनें त्यांनीं खूपच उन्नति केली होती. यज्ञाच्या वेळीं जी चर्चा चालत असे त्यांमधून ब्राह्मणग्रंथ रचले गेले. या ब्राह्मणांचें आणि उपनिषदांचें वर्णन एक वेळ येऊन गेलें आहे. त्यांतूनच तर्कबद्ध सूत्रें आणि दर्शनशास्त्रें उत्पन्न झालीं आहेत.

वेदांची भाषा तेजस्वी परंतु गूढ आहे. वेदांत ऋषि एकादा विचार विशेष स्पष्ट करण्यास उत्सुक आहे असें वाटत नाहीं. स्वाभाविकपणें जसें सुचलें तसें ठेवून दिलें गेलें आहे. आणि म्हणूनच त्यांत स्वाभाविक काव्य ओतप्रोत भरलें आहे. उपनिषदांची भाषा सोपी आणि स्पष्ट आहे. उपनिषदांतील विवेचन एकाद्या वर्गांत चाललेल्या विवेचनासारखें विशद आणि सुंदर आहे. सूत्रांत आणि दर्शनांत तर्काचा प्रभाव पडलेला पूर्णपणें दिसून येतो.

---

* शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, ज्योतिष आणि छन्द.

ग्रं. क्र. १९०७२



त्या नंतरचे साहित्य कोणतें हें सांगणें कठीण आहे. सूत्रामधूनच स्मृती तयार झाल्या आहेत. स्मृतींत समाजरचना व प्रत्येक वर्गाचें जीवन व कर्तव्यें यांची चर्चा खूपच विस्तारपूर्वक दिलेली आहे. समाजाला विचार करण्याची थोडी देखील तसदी पडूं नये आणि शक्य तोंवर समाजांत ऐक्य रहावें, यासाठीं माणसानें कसें वागलें पाहिजे याचें खुलसेवार वर्णन त्यांत आहे.

वर वर्णिलेलें साहित्य विशिष्ठ वर्गासाठींच होतें. आर्यसंस्कृति सामान्य वर्गांत इतिहास आणि पुराणें यांच्याद्वाराच पोहोंचविली गेली. जें काम स्मृतींना आणि मोठमोठ्या विद्वान् आचार्यांना करतां आलें नाहीं तें या इतिहास आणि पुराणांनीं फारच सोप्या रीतीनें केलें आहे. पुराणांची संस्कृत भाषा हीच राष्ट्रीय संस्कृत भाषा समजली पाहिजे. ती पुष्कळच साधी परंतु परिणामकारक आहे. कितीतरी सूक्ष्म आणि मिश्रभाव पुराणांच्या प्रासादिक भाषेंत प्रगट झालेले दिसून येतात. पुराणांत आर्यांच्या सर्व तऱ्हेच्या विचारांचा आणि कल्पनांचा संग्रह आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. हीं पुराणें महाभारतकार व्यास महर्षींनीं लिहिलीं आहेत असें समजलें जातें. आणि म्हणूनच पुढील लोकोक्ति प्रचारांत आली असावी. ' व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम् । '

संस्कृत गद्य साहित्यांत अत्यंत साधें, लोकप्रिय आणि व्यवहारपूर्ण साहित्य म्हणजे पंचतंत्र आणि हितोपदेश होय. या दोन्ही ग्रंथांत भारतवर्षांतील सामान्य लोकांचें शहाणपण, चातुर्य आणि दूरदर्शित्व हीं प्रतिबिंबित झालीं आहेत. पंचतंत्र हें विष्णुगुप्त नांवाच्या ब्राम्हणानें लिहिलें आहे. विष्णुगुप्त म्हणजेच चाणक्य असें समजले जातें. परंतु त्याची रचना व भूगोलविषयक उल्लेखावरून तो वेगळयाच काळचा असावा असें वाटतें. पंचतंत्राचा मुसलमानी आणि युरोपीयन भाषांत प्राचीन काळींच अनुवाद झालेला आहे. कांहीं विद्वानांचें असें मत आहे कीं पंचतंत्राचा कर्ता गुजराथेंतील कोणीतरी जैन लेखक असावा. हितोपदेशांत पंचतंत्राचीच छाया आहे.

गौतमबुद्ध आणि महावीर यांचा उपदेश सामान्य वर्गासाठींच होता. त्यानंतर लौकिक साहित्य वाढावें हें स्वाभाविक होतें. त्रिपीटकांतील बराच मोठा भाग, जातककथा वगैरे ग्रंथ हें अशाप्रकारचें लोकसाहित्यच समजलें

पाहिजे. बौद्ध आणि जैन साहित्यिकांनीं समाजांत प्रचारांत असलेली पाली आणि प्राकृत भाषाच पसंत केली. शास्त्राचीं बंधनें तोडून स्वाभाविक भावनांच्या चित्रणासाठीं प्राकृत भाषेचा उपयोग होऊं लागला आणि संस्कृतांत देखील न शोभणारा असा शृंगार प्राकृत भाषेंत दाखल झाला. धार्मिक साहित्यांत समाविष्ट न झालेल्या गोष्टी बृहत्कथेसारख्या ग्रंथांत एकत्रित झाल्या. पाणिनी आणि वररुचि यांच्यासारख्या अलौकिक प्रतिभाशाली विद्वानांच्या भोंवताली ज्या दंतकथा पसरल्या होत्या त्यांचा प्रवाह देखील ' बृहत्कथे 'मध्यें येऊन मिळाला.

पाणिनीचा काळ इ. स. पूर्वी चारशेंच्या आसपास समजला जातो' पाणिनी असाधारण बुद्धिशाली, वैय्याकरणी आणि भाषाशास्त्रज्ञ होता. हिंदुस्थानांतील संस्कृत भाषा भिन्नभिन्न प्रांतांत वेगवेगळ्या प्रकारें उपयोगांत आणिली जाते. त्या सर्वांचें अध्ययन करून आणि प्रत्येक भाषा कशाप्रकारें बनत असेल याचा विचार करून पाणिनीनें आपली जगत्प्रसिद्ध अष्टाध्यायी लिहिली. अष्टाध्यायीचें रचनाकौशल्य आणि तिचा शास्त्रीय कांटेकोरपणा पाहून आजचे मोठमोठे विद्वान्‌देखील आश्चर्यचकित होतात. ग्रीस देशांत कोणतेंहि शास्त्र शिकण्यापूर्वी युक्लीडची भूमिति शिकण्याची शिफारस करण्यांत येत असे. कारण भूमितीची विचारपद्धति बुद्धीची तीक्ष्णता वाढविते. आपल्या येथें हेंच काम पाणिनीच्या अष्टाध्यायीनें केलें आहे. पाणिनीच्या अष्टाध्यायींत ज्या कांहीं उणीवा राहून गेल्या होत्या त्या कात्यायनानें पुऱ्या केल्या. त्यानें पाणिनीच्या सूत्रांत जी भर घातली तिला वार्तिक असें म्हणतात. विक्रम राजाविषयींच्या दंतकथांत त्याच्या दरबारांतील नवरत्नांत जो वररुचि म्हणून समजला जातो तोच हा कात्यायन असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे.

परंतु व्याकरणशास्त्राला पूर्णत्व देऊन शिकण्याच्या दृष्टीनें विद्यार्थ्यांना अधिक उपयुक्त बनविणारा भाष्यकार म्हणजे पतंजलिच होय. पतंजलि सर्व शास्त्रांत प्रवीण होता. त्यानें योग्य शास्त्र रचिलें आहे. वैद्यकशास्त्रावर देखील त्यानें ग्रंथ लिहिला आहे.

वैद्यकशास्त्रांत कनिष्काच्या वेळचा चरक आणि इ. सनाच्या चवथ्या शतकांत प्रसिद्धीस आलेला सुश्रुत यांच्याशिवाय विक्रमाच्या दरबारांतील

धन्वंतरी देखील प्रसिद्ध आहे. चरक आणि सुश्रुत यांच्या ग्रंथांचा प्रभाव अरबी वैद्यकावर मोठ्या प्रमाणावर पडलेला आहे. युरोपांत देखील चरक आणि सुश्रुत यांच्याविषयीं मोठा आदर होता. वैद्यकांत प्रख्यात असे दुसरे ग्रंथकार म्हणजे माधव व वाग्भट हे होत.

चरकाच्या वेळच्या बौद्ध ग्रंथकारांत अश्वघोष आणि नागार्जुन हे पुष्कळच प्रसिद्ध आहेत. अश्वघोषाचें बुद्धचरित हें महाकाव्य विख्यात आहे. कालीदासाच्या प्रतिभेहून अश्वघोषाची प्रतिभा कोणत्याहि बाबतींत कमी दर्जाची नाहीं. तिबेटि भाषेंत अश्वघोषाचें चरित्र लिहिलें गेलें आहे. त्यांत असें लिहिलें आहे कीं, 'अश्वघोषाला' माहीत नाहीं अशी एकहि गोष्ट नव्हती. शंकानिवारणामध्यें तो अत्यंत कुशल होता. ग्रंथ लेखनाव्यतिरिक्त तो स्वतः सुंदर कविता रचून आणि गायकांचा वृंद बरोबर घेऊन तो सर्व देशांत हिंडत असे. तो स्वतः प्रख्यात गवई होता. त्याची ख्याति परदेशांत देखील पसरली होती. अश्वघोषानंतर नागार्जुन झाला. अश्वघोषाप्रमाणें तो देखील मूळचा ब्राह्मण होता. नागार्जुनानें महायान संप्रदायाच्या माध्यमिक शाखेची सूत्रें लिहिलेलीं आहेत. अश्वघोष आणि नागार्जुन या दोघांचीं चरित्रें कुमाराजीव यानें लिहिलेलीं आहेत.

अश्वघोषाइतकी प्रतिभा दाखविणारा आणि कालीदासाइतकें नाट्यकौशल्य अंगीं असणारा संस्कृत भाषेचा आद्य नाटककार भास हा पुष्यमित्राच्या काळीं होऊन गेला. भासाचा फार मोठा प्रभाव कालीदासावर पडलेला स्पष्ट दिसून येतो. भासाचीं नाटकें छोटीं, सुव्यवस्थित आणि लालित्यपूर्ण आहेत.

आपल्या वेळेची सारी प्रतिभा आणि कला जणूंकाय एकत्र करून कविसम्राट कालीदास अवतरला. कालीदासाचा काल अनेक लोकांनीं अनेक प्रकारें ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. या बाबतींत एवढेंच म्हणतां येईल कीं कालीदास हा गुप्त वंशाच्या दरम्यान अथवा त्यापूर्वीं झाला असला पाहिजे. कालीदासाचा रघुवंश हें एक अप्रतिम महाकाव्य आहे. यांत एका तपोनिष्ठ राजवंशाची उन्नति आणि अवनति यांचें चित्रण करून कवीनें सामाजिक उत्थान आणि पतन यांची काव्यमय मीमांसा केली आहे. कल्पनेची भरारी कोठपर्यंत पोहोंचूं शकते याची कल्पना कालीदासानें

आपल्या मेघदूतांत आणून दिली आहे. ऋतुसंहार हा कवीनें निसर्गदेवीला अर्पिलेला नजराणा आहे. त्यांत वर्षातील सहा ऋतु आणि त्यांचा रसिकांच्या हृदयावर झालेला परिणाम यांचें अत्यंत हृदयंगम वर्णन केलें आहे. कुमारसंभवांत राष्ट्रीय आपत्तीच्या प्रसंगीं एकाद्या उद्धारकर्त्याची सारा समाज कशी प्रतीक्षा करीत असतो याचें चित्रण केलें आहे. 'विक्रमोर्वशीय' मध्यें वैदिक काळांतील एका प्रेमकथेला कवीनें आपल्या कलेनें सुंदर नाट्याचें रूप दिलें आहे. 'विक्रमोर्वशीय' हें एक आध्यात्मिक रुपक देखील समजतां येईल. 'मालविकाग्निमित्रां' तील पात्रें ऐतिहासिक आहेत. पुष्यमित्राचा मुलगा अग्निमित्र हा आपल्या बापाच्या हयातींत विदिशा नगरींत राज्य करीत होता. त्यानें आपल्या राणीची परिचारिका मालविका हिच्याशीं केलेला प्रणय हा या नाटकाचा विषय आहे. या नाटकाचें संविधानक राजपरिवारांतील लोकांच्या चरित्रावरून तयार केलेलें असल्यामुळें त्या काळच्या समाजस्थितीचें एक सुंदर चित्र आपल्याला या नाटकांत पहावयास मिळतें. परंतु कालीदासाचें सर्वस्व मात्र त्याच्या 'अभिज्ञान शाकुंतल' नाटकांतच ओतलें गेलें आहे. हें नाटक आपल्या जन्मापासून तहत आजपर्यंत एकसारखें लोकप्रिय होऊन राहिलें आहे. वैषयिक प्रेमाची विरहाग्निमुळें झालेली विशुद्धि आणि परिणति हा या नाटकाचा मुख्य विषय आहे. नागरी जनांचें चातुर्य वनवासी निरागस बालिकेला जिंकते आणि फसवते. परंतु अखेर निरागसतेची शुद्धीच विजयी होते. हें सनातन सत्य या नाटकांत अद्वितीय रमणीयतेनें कवीनें वर्णिलेलें आहे. शाकुंतलाचे अनुवाद अनेक भाषांत झालेले आहेत. आणि आपल्या अद्वितीय सौंदर्यानें त्यानें साऱ्या जगाचें मन जिंकलें आहे.

साऱ्या भारतवर्षावर जर कोणाची सर्वांत जास्त छाया पडली असेल तर ती राजसंन्यासी कवी भर्तृहरीची. दंतकथेप्रमाणें तो विक्रम राजाचा मोठा भाऊ ठरतो. भर्तृहरीच्या शतकत्रयांत हिंदू समाजाचें संपूर्ण प्रतिबिंब पडलेलें दिसून येतें असें म्हणतां येईल. एकाद्या परदेशी मित्राला हिंदू जीवनाची तसबीर भेट म्हणून धाडावयाची असेल तर भर्तृहरीच्या शतकत्रयाचा सुंदर अनुवाद करून द्यावा. गुप्तकालाच्या साहित्यविषयक प्रवृत्तिविषयीं

एकदां लिहिलेलें आहेच. गुप्तकालांत इतिहास पुराणांची जी संस्करणें झालीं त्यामुळें साहित्याचें अध्ययन आणि प्रचार हीं वाढलीं. आणि त्यामुळें अनेक कवींना पुराणांतून वेगवेगळीं कथानकें निवडून त्यांच्यावर काव्य लिहिण्याची प्रेरणा झाली. हर्षाच्या वेळीं काव्यलतिकेला खूपच बहर आला होता. भारवीनें आपल्या ' किरातार्जुनीयांत ' अर्थगौरवाची पराकाष्टा करून दाखविली. दंडीनें निःसंकोचपणें लोकस्थितीचें काव्यमय वर्णन करून संस्कृत भाषेच्या पदलालित्याला पूर्णत्व दिलें. स्वतः हर्षवर्धनानें रत्नावलि, प्रियदर्शना आणि नागानंद अशासारखीं सुंदर नाटकें लिहून मोठमोठ्या कवींना आपल्याकडे आकर्षून घेतलें. आणि आपल्या ऐश्वर्याचा सदुपयोग करून त्यांना आश्रय दिला. नैषधचरित नांवाचें एक सुप्रसिद्ध महाकाव्य हर्षानें रचिलें आहे असें समजलें जातें. परंतु तें इतकें सुंदर आहे कीं एकादा राजा इतकें सुंदर काव्य लिहूं शकेल कीं नाहीं अशी शंका कित्येक लोकांना येते. राजावर सरस्वतीचा पूर्ण प्रसाद होऊं शकणार नाहीं असा कांहीं नियम नाहीं. तरीसुद्धां कांहीं विद्वान् अशी शंका घेतात हें खरें.

हर्षकाळचा सर्वोत्कृष्ट आणि सर्वश्रेष्ठ कवि निःसंशय बाणभट्टच होय. बाणभट्टानें आपला पुरस्कर्ता हर्षवर्धन याचें एक सुंदर चरित्र लिहिलें आहे त्याची सर्वोत्कृष्ट आणि हृदयंगम कलाकृति म्हणजे ' कादंबरी. ' कादंबरीची भाषा लांबचलांब समासांनीं कृत्रिम झाली असली तरी ओजस्विनी आणि प्रतिभापूर्ण आहे. बाणभट्टांचें कल्पनेचें आणि वर्णनांचें नाविन्य इतकें कांहीं आकर्षक आहे कीं बाराहि महिने जोरानें वाहणाऱ्या प्रवाहाचीच उपमा त्याच्या प्रतिभेला शोभेल. बाणाचीं शब्दचित्रें इतकीं कांहीं हुबेहूब असतात कीं, त्यानें अध्ययनांत जेवढा वेळ घालविला तेवढाच वेळ निसर्गाचें निरीक्षण करण्यांत घालविला असला पाहिजे याची खात्री पटते. बाणाची प्रतिभा जेवढी स्वतंत्र आहे तितकेंच त्याच्या विचारांतहि संपूर्ण स्वातंत्र्य आहे. पतीमागून सती जाण्याच्या चालीचा उल्लेख करतांना तो म्हणतो कीं हा शुद्ध मूर्खपणा आहे. बाण आपली कादंबरी पूर्ण करूं शकला नाहीं. परंतु आपल्या सुदैवानें बाणाचा मुलगा त्याच्या इतकाच प्रतिभाशाली निघाला. त्यानें कादंबरी पूर्ण करून आपलें पितृऋण फेडलें.

मृच्छकटिक हें विलासांत बुडालेल्या काळाचें नाट्यचित्र आहे. तरीहि त्यांत खरें प्रेम, कुलीनता आणि उदारता वगैरे आर्यांच्या गुणांचें यथायोग्य चित्रण केलेलें दिसून येतें. या गुणामुळेंच मृच्छकटिक हें हिंदुस्थानांत आणि हिंदुस्थानच्या बाहेर एक अत्यंत लोकप्रिय नाटक ठरलें आहे. मुद्राराक्षस हें याहून वेगळ्याप्रकारचें नाटक आहे. त्यांत अर्थशास्त्रीय सिद्धांत आणि राज्यव्यवहार या संबंधीं खूप चर्चा केली आहे. या नाटकांत देखील स्वामि-निष्ठा, मित्रप्रेम वगैरे अनेक गुणांचा उत्कर्ष दाखविलेला आहे.

हर्षकालीन परंतु वरील सर्व कवीहून वेगळा असा एक अपूर्व कवि म्हणजे शांतिदेवाचार्य होय. शांतिदेवाचार्य महायान पंथी बौद्ध साधू होता. त्याच्या ग्रंथांत बोधिचर्यावतार हा सर्वांत प्रसिद्ध आहे. हा तत्त्व-ज्ञानविषयक ग्रंथ असूनहि त्यांत शुष्क चर्चा नाहीं. भर्तृहरि, तुकाराम किंवा थॉमस एकेम्पीस या सारख्या महान भगवद्भक्तांच्या लिखाणांत जी उत्कटता आणि हार्दिक भाव आहेत, तसेच शांतिदेवाचार्यांमध्यें देखील दिसून येतात. प्राणिमात्रांच्या कल्याणाला तो मोक्षापेक्षां श्रेष्ठ मानतो. इत-केंच नव्हे तर भूतमात्रांचें कल्याण हाच मोक्ष अशी त्याची कल्पना आहे. पवित्र वृत्ति, नम्रता, वैराग्य आणि कारुण्य या रसांचा परिपोष करण्याच्या बाबतींत त्याच्यापेक्षां वरचढ असे ग्रंथकार क्वचितच असतील.

हर्षकालाच्या नंतरचा परंतु आतापर्यंत वर्णिलेल्या महाकवींच्या पंक्तीस सहज बसूं शकेल असा महाकवि जो भवभूति याचा उल्लेख येथेंच करणें योग्य होय. संस्कृत कवीमध्यें सर्वश्रेष्ठ कोण ? कालिदास कीं भवभूति ? याची चर्चा अजून चालते, यावरूनच भवभूतीच्या योग्यतेची कल्पना येऊं शकेल. समुद्रांत बुडी मारून अगदीं तळापासून अमूल्य मोतीं काढणाऱ्या माणसाप्रमाणें भवभूति मानससागरांत बुडी मारून अप्रतिम विचारमौक्तिकें बाहेर काढतो. आणि तीं त्याच्याजवळ इतकीं विपुल आहेत कीं तो स्वतः अप्रतिम रचनाकुशल असूनहि त्याला प्रत्येक तबक कांठोकांठ भरावें लागतें. उत्तर रामचरितांत श्रीरामाचें स्वरूप धीरोदात्त आणि अलौकिक असूनहि मानवी असणारें हृदय वाल्मिकीपेक्षांहि सुंदरप्रकारें आलेखिलेलें आहे. विवाहोत्तर प्रेमाचें इतके सुंदर चित्र रेखाटणारा हा एकच कवि असेल.

शृंगार रसाची अत्यंत उत्कटता दाखवून देखील त्यांत त्यानें संपूर्ण शुद्धता ठेविली आहे. भवभूतीची कुंचली अत्यंत नाजूक आहे. आपल्या चित्रणां तील अत्यंत लहानसहान खाणाखुणा पूर्ण करेतांना देखील तो कंटाळत नाहीं. त्याचें मालतीमाधव हें नाटक साहित्य–उद्यानांत मोठ्या गौरवाचें स्थान उपभोगीत आहे. दंतकथेंत भवभूतीला कालीदासाचा समकालीन म्हटलें आहे. ऐतिहासिक दृष्ट्या ती उघड उघड चूक ठरेल. परंतु भवभूतीचा प्रतिभाविलास पाहिल्यास तो कालिदासाचा समकालीन व्हावयास पूर्णपणें लायक आहे यांत शंका नाहीं.

आर्यांचें अत्यंत प्रिय भौतिक शास्त्र म्हणजे ज्योतिषशास्त्र होय. वेद-कालापासून आर्य लोक आकाशांतील तेजोगोलकांमागें लागले आहेत. वेदांतील उत्तमोत्तम वर्णनें ही नक्षत्र चित्रेंच आहेत. देव आणि तारका एकच आहेत. ज्योतिषशास्त्रावरील आपला पहिला ग्रंथ म्हणजे वेदांगज्योतिष. त्यांत तीसचाळीस श्लोकांत चंद्र आणि सूर्य यांच्या गतीचें गणित दिलें आहे. जुन्या काळचा विचार करतां तें सूक्ष्मच गणलें जाईल. परंतु त्यांत कांहीं चुका राहून गेल्या आहेत. वेदासारख्या अपौरुषेय ग्रंथाबरोबर वेदांग-ज्योतिषाचा उल्लेख होतो. तरी त्यांत चुका आहेत हें पाहून वेदकालीन ग्रंथकारांना ईश्वर प्रेरणेनें सर्व ज्ञान होत असे या समजुतीला धक्का बसतो. ज्योतिषांत आश्चर्यकारक प्रगती आर्यभट्टानें केलेली दिसून येते. आर्यभट्ट इ. स. ४७६ मध्यें जन्मला असें त्याच्या ज्योतिषावरील लिखाणावरून सिद्ध होतें. आर्यभट्टानें आर्यभट्टीय या नांवाचा ज्योतिषा-वरील ग्रंथ लिहिला आहे. पृथ्वी गोल आहे. ती अंतराळांत अधांतरी राहिलेली आहे, एका दिवसांत ती आपल्या आसाभोंवतीं एकदां फिरते, एका वर्षांत ती सूर्याभोंवतालची आपली प्रदक्षिणा पुरी करते, तिच्यांत आक-र्षण शक्ति आहे, पृथ्वीचा आणि इतर ग्रहांचा मार्ग पूर्ण वर्तुलाकार नाहीं, बुध आणि शुक्र पृथ्वीपेक्षां सूर्याच्याजवळ आहेत. त्यांतहि बुध हा अधिक जवळ आहे इत्यादि गोष्टी त्यानें लिहिलेल्या आहेत. पूर्वेस आणि पश्चिमेस वातावरणामुळें सूर्याची किरणें तिरपीं होतात. इतकेंच नव्हे तर हजारों वर्षांच्या अंतरानें अयनें देखील हळू हळू मागें सरत जातात हें सर्व आर्यभट्टाला

माहीत होतें. पृथ्वीच्या पृष्ठभागाचा विस्तार देखील आर्यभट्टानें जवळ जवळ बरोबर नक्की केला होता.

आर्यभट्ट हा बिहारमधील कुसूमपूर म्हणजे पाटणा शहाराचा नागरिक होता. त्याच्यानंतरचा प्रख्यात ज्योतिषी वराहमिहिर. इ. स. ५००च्या सुमारास हा उज्जयिनीच्या आसपास होऊन गेला. तो फलज्योतिष आणि गणितज्योतिष यांत प्रवीण होता. फलज्योतिषावर त्यानें ग्रंथ लिहिले आहेत. गणितज्योतिषावर पंचसिद्धांतिका हा त्याचा ग्रंथ प्रख्यात आहे. त्याच्या नंतर जवळ जवळ शंभर वर्षांनीं उत्तर गुजराथेंत ब्रह्मगुप्त हा असाधारण बुद्धिमंत ज्योतिषी होऊन गेला. हा भिन्नमाल ( श्रीमाल ) येथील राहणारा होता. याचे ग्रंथ सिंध प्रांतांत विशेष प्रचलित होते. तेथून मुसलमान लोकांनीं त्यांचे अनुवाद केले. वराहमिहिराच्या लेखनाचा अभ्यास देखील मुसलमान लोक मोठ्या आस्थेवाईकपणें करीत असत. ब्रह्मगुप्त ज्योतिषी असून देखील भौतिक शास्त्रज्ञहि होता. पदार्थांचा गुणधर्मविषयक अभ्यास करण्याचीहि त्यानें खटपट केली होती. जुन्या काळच्या ग्रंथकारांत ब्रह्मगुप्ताची प्रतिष्ठा खूपच होती.

वराहमिहिरानें एका यवनाचार्याचा उल्लेख केला आहे. स्फुजिध्वज या नांवाचा एक ज्योतिषी होऊन गेला. हाच तो यवनाचार्य असावा असें समजलें जातें. गणित आणि ज्योतिष हे दोन्ही विषय हिंदुस्थानांत बरोबरीनेंच विकास पावले आहेत. संख्यालेखनाची दशकपद्धति सुदैवानें वेदकालापासूनच प्रचलित असल्यामुळें गणिताचा विस्तार करणें सोपें गेलें.

गणितामधूनच बीजगणित निघालें. तें वराहमिहिरानें शोधून काढलें असें समजलें जातें. गणिताचा उपयोग ज्योतिषाबरोबर पहिल्यापासूनच केलेला असल्यामुळें क्षेत्रमापन आणि भूमिति हीं दोन्हीं शास्त्रें आपल्या येथें पहिल्यापासूनच होतीं. यज्ञयागासाठीं कालगणनेची जितकी आवश्यकता होती तितकी यज्ञभूमि प्रमाणशीर करण्यासाठीं भूमितीची आवश्यकता होती. ज्योतिषामुळें त्रिकोणमितिदेखील विकास पावली. हीं सर्व शास्त्रें हिंदुस्थानांतच पहिल्या प्रथम उत्कर्ष आणि विकास पावलीं आहेत.

वर वर्णिलेल्या गणिती आणि ज्योतिषांच्या रांकेंत प्रतिष्ठापूर्वक बसूं शकले असा भास्कराचार्य इ. स. अकराशेंच्या सुमारास महाराष्ट्रांत होऊन गेला.

जुन्या काळीं जे अनेक प्रकारचे ग्रंथ लिहिले गेले त्यापैकीं फारच थोडे आपल्या हातीं लागलेले आहेत. ग्रंथ हातानें लिहिण्याची प्रथा असल्यामुळें एकादा सर्वोत्कृष्ट ग्रंथ तयार झाला कीं त्याच्या पूर्वीच्या सगळ्या ग्रंथांची उपेक्षा होत असे. राजकारणावर–ज्याला संस्कृतमध्यें अर्थशास्त्र म्हणतात—अनेक ग्रंथ लिहिले गेले होते. परंतु चंद्रगुप्ताच्या वेळीं आर्य चाणक्यानें लिहिलेला कौटिलीय अर्थशास्त्र हा एकच ग्रंथ आज उपलब्ध आहे. तो देखील नामशेष झालेल्या स्थितींत थोड्या वर्षांपूर्वीं दक्षिणेंत सांपडला आहे. या अर्थशास्त्रांत राजानें राज्यकारभार कशाप्रकारें चालवावा, राज्यकारभाराचे भिन्न भिन्न विभाग कोणत्याप्रकारें चालवावेत, वगैरे विषयांची विस्तारपूर्वक आणि निश्चित अशी चर्चा केली आहे. कौटिलीय अर्थशास्त्र हा काटेकोर भाषेंत लिहिलेला शास्त्रीय ग्रंथ आहे. कामंदकीय नीतिसार आणि शुक्रनीति वगैरे त्यानंतर लिहिल्या गेलेल्या ग्रंथांत विस्तार खूप आहे, पण काटेकोरपणा नाहीं.

वर दिलेल्या वर्णनावरून आपल्या लोकांच्या उच्च संस्कारांची आणि अपूर्व विद्वत्तेची कल्पना येईल. याशिवाय त्यावेळीं देशांत सुख आणि शांति होतीं. लोक खाऊन पिऊन सुखी होते. आणि राजे प्रजापालनाच्या सर्व अंगांत दक्ष होते. आपल्या साहित्यांत वीररसाची उणीव नाहीं, परंतु परदेशावर चढाई करून लुटालूट करणें, केवळ परदेशी आहेत म्हणून त्यांचा नाश करणें अशा तऱ्हेची कल्पना भारतवर्षांतील आर्यलोकांत मुळींच नव्हती. उलट अशोकाप्रमाणें आपल्या उच्च धार्मिक कल्पना लोकांच्या दारापर्यंत घेऊन जाणें, त्यांना आपले आर्यसंस्कार देणें आणि सर्वत्र शांति आणि भ्रातृभाव यांचा प्रसार करणें हाच आपला राष्ट्रीय आदर्श होता. आपल्या प्रत्येक नाटकाच्या शेवटीं जे भरतवाक्य असतें त्यांत देखील हीच राष्ट्रीय आकांक्षा दिसून येते. ( १९२३ )

प्रवर्ततां प्रकृतिहिताय पार्थिवाः
सरस्वती श्रुतिमहतां महीयताम् ।

उच्चदर्जाच्या कुटुंबांत वीणावादन ही मुलींच्या शिक्षणांतील मुख्य गोष्ट समजली जाते.

सुरवातीस राग रागिणींची व्यवस्था नव्हती. गायनांच्या जाती समजल्या जात. जुन्या ग्रंथांत फक्त त्याचेंच वर्णन आहे.

संगीताचें जुन्यांत जुनें विवरण भारताचार्यांच्या नाट्यशास्त्रांत आहे. पाश्चात्य लेखक नाट्यशास्त्र सहाव्या शतकांतील समजतात. परंतु त्यांत रागरागिणींचा विस्तार नाहीं. एवढ्यावरूनच ते इ. स. पूर्वींचें असावें असें सिद्ध होतें. सहा राग आणि छत्तीस रागिणी यांची उत्पत्ति विक्रमादित्याच्या वेळीं झाली असावी. हनुमान नांवाचा एक संगीताचार्य त्या काळीं होऊन गेला. त्यानें या रागरागिणींचा विस्तार वर्णिलेला आहे.

संगीतसूत्र नांवाच्या एका ग्रंथाचा अवशेष थोड्याच दिवसापूर्वी सांपडलेला आहे. तो नाट्यशास्त्राच्या पूर्वींचा असावा असें समजलें जातें. नाट्यशास्त्रानंतरचा ग्रंथ म्हणजे नारदाची नारदीय शिक्षा. या तीन ग्रंथांच्या सूत्र, शास्त्र आणि शिक्षा या नांवावरून त्या त्या ग्रंथांच्या काळाविषयीं कांहींसें अनुमान निघण्याचा संभव आहे. ‘ नारदीय शिक्षे ’ नंतर मतंगाचा ‘ वृहद्देशी ’ हा ग्रंथ लिहिला गेल्याचा उल्लेख आहे. त्यानंतरचा ग्रंथ संगीत मेरू. यांत संगीताची चर्चा कोहल आणि दंतिल यांच्या संवादाच्या रूपानें दिलेली आहे. आपण ज्या काळचा इतिहास हातीं घेतला आहे त्या काळचा शेवटचा आणि लोकप्रिय ग्रंथ म्हणजे संगीत मकरंद हा होय. त्याचा लेखक देखील नारद नांवाचाच कोणी लेखक होता. नारद हे जुन्या काळीं टोपण नांव असण्याचा देखील संभव आहे. इ. स. ५५० च्या सुमारास मातृगुप्त नांवाच्या एका पंडितानें नाट्यशास्त्रावर एक टीका लिहिली आहे.

श्री हर्षाच्या वेळेपर्यंत आपलें संगीतशास्त्र संपूर्णावस्थेस पोहोंचलें होते यांत शंका नाहीं. संगीत हें स्वभावतःच लोकप्रिय असल्यामुळें त्याचा विस्तार आपल्या देशांत खूपच झाला होता. आपले साहित्याचार्य आणि नाटककार संगीताचे चांगले माहितगार होते. माघ कवीचें संगीतज्ञान असाधारण होतें असें त्याच्या ग्रंथावरून सिद्ध होतें. जातक कथांत वाद्यांचें

वर्णन आणि वर्गीकरण सांपडतें त्यावरून बौद्धकाळांपासून सर्व प्रकारचीं वाद्यें आपल्याकडे प्रचारांत होतीं असें दिसून येतें. तुंतुवाद्य, वेणुवाद्य, झांजेसारखी घर्षण वाद्यें, चर्मवाद्य आणि दिलरुब्यासारखी चर्मतंतुवाद्यें त्यांवेळेपासून प्रसिद्ध आहेत.

आर्य संगीतांत भिन्न भिन्न स्वरांचा संवाद आणि श्रवणमधुर स्वर-परंपरा याकडे जास्त लक्ष दिलें आहे. आणि म्हणूनच तें हृदयींच्या व्यक्तिगत गूढ भावांचें उद्दीपन आणि सांत्वन करण्यास समर्थ झालें आहे. लौकिक किंवा आध्यात्मिक असा एकहि भाव नाहीं कीं जो आर्यसंगीताद्वारें व्यक्त होऊं शकणार नाहीं. तरी पण आर्यसंगीत शेवटीं शांत रसच पसंत करतें, शांतीचीच उपासना करते असें स्पष्टपणें दिसून येतें. १९२३

# ११ : शिल्प आणि स्थापत्य.

जमीन खोदतां खोदतां दगडांच्या दोन थरांमध्यें प्राण्यांच्या हाडांचे आकार कित्येक वेळां आढळून येतात. त्यावरून हजारों वर्षांपूर्वी त्या प्रदेशांत कोणत्या जातीचे प्राणी असावेत याविषयीं कांहीं कल्पना करतां येते. अशाप्रकारच्या पदार्थांनां इंग्रजींत 'फॉसील' म्हणतात. आपल्या भाषेंत त्यांना अश्मिल म्हणतां येईल. अश्मिलावरून प्राचीन काळांतील एकच प्रकारच्या प्राण्यांचा इतिहास सांपडतो. ज्या प्राण्यांना हाडें होतीं त्यांचेच अवशेष राहिले आहेत. हाडें नसलेल्या प्राण्यांचें मृत शरीर लागलीच सडून जात असल्यामुळें त्यांचे अवशेष सांपडणें अशक्य असतें.

प्राचीन काळच्या स्थापत्याची देखील हीच दशा आहे. मनुष्य आपल्या सुंदर कल्पना दगडांत कोरतों किंवा मातीचे सुंदर पदार्थ बनवून ते भट्टींत भाजून ठेवतो. लाकडापेक्षां देखील कमी टिकाऊ पदार्थांच्याद्वारें आपण कलेचा विकास करूं शकतो. वनवेलींनीं आणि फुलापानानीं आपण आरास मांडतो परंतु ती एखादा दिवसच टिकूं शकते. हीच गोष्ट प्राचीन काळच्या स्थापत्याच्या बाबतींत झालेली आहे.

हिंदुस्थानांत प्राचीनकाळीं लोक एकाच ठिकाणीं फार वर्षें रहात नसत. श्रीकृष्णाच्या वेळीं गोप लोक जुनी वस्ती किंवा तळ सोडून देऊन नव्या ठिकाणीं रहावयास जात. राजाची राजधानी देखील अमुक वर्षांनंतर बदलली पाहिजे अशी जुनी कल्पना होती. अशा काळीं दगडावर कोरीव काम करून सौंदर्याच्या आपल्या कल्पनेला चिरस्थायी करण्याचा मोह लोकांना होण्याची शक्यता फार थोडी होती. लाकडाच्या वस्तू असतील तर त्या एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेणें फार सोपें असतें. शिवाय हिंदुस्थानांत जंगलांची विपुलता असल्यामुळें कोरीव काम करण्यासाठीं हर-

तऱ्हेचीं लांकडें सहज मिळूं शकत. यामुळें प्रथम प्रथम स्थापत्यकला ही लाकडाच्या द्वारेंच अवतीर्ण झाली. वेदकाळांतील सामानसुमान, यज्ञाची भांडींकुंडीं वगैरे लांकडाचीच असत; आणि याच वस्तूंचे आकार वेगवेगळे च सुंदर बनविण्याकडे त्या काळच्या शिल्पकारांची कला खर्ची पडे. सामान्य जनतेला आपली कला समई, पणती किंवा रोजच्या उपयोगांतील वस्तूंतच व्यक्त करण्याचें सुचावयाचें. अशा वस्तू पुष्कळ खोलपर्यंत खण-ल्यास आढळून येतात.

नदीचे पूर, पावसाची धुलाई, आणि कधींकधीं भूकंप यामुळें कित्येक जुने अवशेष जमिनींत गाडले गेले आहेत. जर ते सर्व खोदण्यांत आले तरच अतिप्राचीन कालाच्या कलेची आणि स्थापत्याची कल्पना येऊं शकेल. काश्मीरांत अनंतपूर नांवाची गाडली गेलेली राजधानी सध्यां खोद-ण्यांत येत आहे. आणि बिहारमध्यें पाटण्याजवळ चंद्रगुप्ताच्या अप्रतिम सुगांग महालाचे अवशेष देखील खोदून काढण्यांत येत आहेत. अनंत-पुरांत दगडी घराबरोबर मातीचे नळसुद्धां आढळले आहेत आणि पाट-ण्यामध्यें दगडी खांबाबरोबर लाकडी तुळयासुद्धां सांपडल्या आहेत.

रामायण व महाभारतांत नगरें, आणि सुंदर रस्ते यांची वर्णनें येतात. त्यावरून लोकांच्या सुखसोयी व आरोग्य यांकडे त्याकाळीं भरपूर लक्ष दिलें जात असे असें दिसून येतें. हिंदुस्थानचें हवामान आणि लोकांची राहणीच अशी आहे कीं जेथें वस्ती असेल तेथें जवळच एकादी नदी किंवा जलाशय हे असावयाचेच. यामुळें नदीचे घाट व तलाव वगैरेंचें बांधकाम थेट प्राचीन काळापासूनच चालत आले असलें पाहिजे असें दिसून येतें.

शिल्पाचे आणि स्थापत्याचे लक्षांत ठेवण्यासारखे नमुने मौर्य काळा-पासून सांपडतात. अशोकाच्या वेळचें बांधकाम आणि कोरीव काम दग-डाचें होतें, तरीपण त्याची रचना लाकूड कामासारखीच आहे. त्यावरून असें अनुमान निघतें कीं दगडावर लाकडाच्या जुन्या बांधकामाचें अनुकरण करण्यांत त्यावेळच्या कारागिरांना मजा वाटत असावी. अशोकाच्या वेळे-पासून शिलास्तंभ, स्तूप आणि कमानी आढळून येतात. त्याचबरोबर दगडांत खोदलेल्या गुहासुद्धां आहेत. अशा कमानी, स्तूप आणि लेण्यांत

बुद्धचरित व जातककथा यांतील प्रसंग कोरलेले आहेत. अशा तऱ्हेचें कोरीव काम हें लोकशिक्षणांतील मोठ्यांतले मोठें साधन आहे. साहित्य, संगीत अथवा चित्रकला यांच्यापेक्षां शिल्पकलेच्या मार्फत कोणत्याहि माणसाला सगळे भाव समजावून देणें शक्य असल्यामुळें लोकशिक्षणांत त्याचाच उपयोग फार आहे. तलाव, मंदिरें, किल्ल्याचे तट वगैरे सार्वजनिक ठिकाणीं उपयोगांत आणलेली कला साऱ्या राष्ट्राच्या हृदयांत खोलपर्यंत जाऊन पोहोंचते.

मौर्य काळांत कारागीर लोकांची प्रतिष्ठा ब्राह्मणांच्या इतकीच होती, आणि वैयक्तिक लाभासाठीं काम करावयाचें नाहीं असा त्यांच्यासाठीं दंडक होता. आवरून असें दिसून येतें कीं त्याकाळीं कलेचें महत्त्व लोक बरोबर ओळखीत असत. कलावंत हा ब्राह्मणाइतकाच लोकशिक्षक आहे असें समजलें जात असे.

मौर्य काळापूर्वींचें स्थापत्याचे नमुने मिळत नाहींत, आणि शिकंदर हिंदुस्थानांत येऊन गेल्यानंतर मौर्य काळ सुरू झाला आहे, या दोन गोष्टीवरून युरोपीयन लोक असें अनुमान काढतात कीं आर्य लोकांना स्थापत्याची किंवा कलेची कल्पना मुळींच नव्हती. ती शिकंदराबरोबर हिंदुस्थानांत आली. हिंदुस्थानांतील लोकांत कल्पकता नाहीं, त्यांच्याजवळ स्वतःचे असें कांही नाहीं, असें मानणाऱ्या अभिमानी युरोपीयनांना वरील समजूत विशेष प्रिय होती. आणि पुष्कळ दिवसपर्यंत ते त्या समजुतीला चिकटून राहिले होते. आतां त्यांचेच ग्रंथकार म्हणूं लागले आहेत कीं, फक्त एकोणीस महिने हिंदुस्थानांत राहिलेला शिकंदर, आणि तो देखील लढाईच्या धामधुमींत राहिलेला शिकंदर हिंदुस्थानांत ग्रीक कलेचा प्रसार करूं शकेल हें अशक्य आहे. म्हणून जी कांहीं परकीय कला हिंदुस्थानांत आली असावी ती बॅक्ट्रियामधून आली असावी. आणि बॅक्ट्रियावर तर ग्रीक, रोम आणि दुसऱ्या अनेक देशांची छाया पडलेली ! परंतु आतां तर याहून पुढें जाऊन त्यांचेच कलाकोविद म्हणतात कीं बॅक्ट्रियाची कला इतकी कांहीं सडलेली आणि टाकाऊ होती कीं तिच्या प्रभावावरून हिंदुस्थानच्या कलेसारखी दैवी कला उत्पन्न होऊंच शकणार नाहीं. हिंदुस्थानची कला शुद्ध आर्य कलाच

आहे आणि जगांतील कोणत्याहि देशाची कला भारतीय कलेची बरोबरी करूं शकणार नाहीं. आर्य कलेची विशालता, कल्पकता आणि विविधता यांच्याशीं तुलना करतां ग्रीक कला अगदीं भिकार वाटते. भारतीय कलेमधून चिनी आणि जपानी कला उद्भवली आणि तिचीच छाया ब्रह्मदेश आणि पूर्व द्वीपकल्प यावर पडलेली आहे. कांहीं युरोपीयन कलावंतांना असें वाटतें कीं शिल्प, स्थापत्य आणि दुसऱ्या कला यांच्या अध्ययनानें युरोपीयन कलांत खूप क्रांति व्हावयाची आहे आणि एक नवीन युग सुरू व्हावयाचें आहे.

हिंदुस्थानच्या पश्चिम सरहद्दीवर तक्षशिला येथें एक विशिष्ट प्रकारची शिल्पकला परिणत झालेली होती. तिला युरोपीयन विद्वान् गांधारपद्धति म्हणतात. तिच्यांत त्यांना युरोपीयन संस्कार स्पष्ट दिसतात. गांधारपद्धति विशिष्ठ आहे यांत शंका नाहीं. तेथें आर्य अथवा हिंदूराजानीं परदेशी कारागीरांना आश्रय दिला असेल हें संभवनीय आहे. परंतु तेथील मूर्तींचे अवयव आणि मुद्रा यांत परदेशीपणा असेल असें वाटत नाहीं. हिंदुस्थानसारख्या विशाल देशाच्या कलेंत विविधता आणि स्थानिक विशिष्ठता कां असणार नाहीं?

अशोकाच्या शिलास्तंभाशिवाय भिलसा येथें असलेला सांचीचा स्तूप अत्यंत महत्त्वाचा आहे. अशोकानें धर्मप्रचारासाठीं जे उपदेशक हिमालयाकडे पाठविले होते त्यांच्या स्मरणार्थ हा स्तूप बांधण्यांत आला आहे. या महान् स्तूपाच्या सभोंवार दगडी कठडा आहे आणि चार दिशांना चार असाधारण सुंदर कमानी आहेत. या कमानी पाहून आजच लोक आश्चर्यानें स्तंभित होऊन जातात.

अशोकाच्या वेळीं कोरीव कामासाठीं जो दगड पसंत करण्यांत आला होता तो देखील त्या वेळच्या कारागिरीइतकाच सुंदर आहे. सारनाथासमोर अशोकाच्या एका शिलास्तंभाचे तुकडे सांपडले आहेत त्याच्यावर चार सिंह कोरलेले आहेत. दगडामध्यें इतके सुंदर कोरीव काम क्वचितच पहाण्यांत येते. या सिंहांची मुद्रा एकाद्या धीरोदात्त राजाच्या किंवा सम्राटाच्या मुद्रेसारखी आहे. अशोकाच्या वेळेपासून कमल, कलश, रथ, नौका वगैरे

सामान्य वस्तूंच्या आकाराचा उपयोग करून सुंदर कोरीव काम करण्यास सुरवात झाली. लढाईंत चार चार पांच पांच मजल्यांचे रथ वापरले जात. त्याच घाटाचीं गोपुरें आणि मंदिरांचीं शिखरें बांधण्यांत येत. मंदिरा-समोरील मंडपावर स्तूपावर घुमट बांधण्यांत येत. एक दोन मंदिरांत मंदिर ही रथाची प्रतिकृति आहे हें दाखविण्यासाठीं मंदिराच्या दोन्ही बाजूच्या भिंतींत चक्रें कोरलेलीं आढळून आलेलीं आहेत. त्याचप्रमाणें मंदिराच्या महाद्वाराजवळ रथ ओढणाऱ्या पशूंच्या मूर्ती ओळीनें कोरलेल्या आहेत. हल्लींच्या लहान लहान शिवालयांचें रथाच्या आकाराशीं किती साम्य आहे हें थोडें लक्ष्यपूर्वक पाहिल्यास समजून येईल.

नगर रचनेंत दक्षिणोत्तर राजमार्ग ठेवण्यांत येई. त्याला छेदून जाणारा दुसरा पूर्व पश्चिम असे. यावरूनच आपली स्वस्तिकाची कल्पना उद्भवली आहे असें समजण्यांत येतें. स्वस्तिकाची दिशा ही शहराला उजव्या बाजूस ठेवून घातलेल्या प्रदक्षिणेची दिशा आहे.

बुद्ध काळचें दुसरें धार्मिक चिन्ह म्हणजे चक्र होय. बोधि प्राप्त झाल्यानंतर कर्मांच्या सिद्धांतरूपी अटल धर्मचक्राचें बुद्ध भगवानांनी प्रवर्तन केलें. हें दाखविण्यासाठीं बौद्ध शिल्पांत मध्यभागीं एक चक्र आणि त्याच्या आसपास त्याचें रक्षण करणाऱ्या यक्ष किन्नरांच्या मूर्ती कोरलेल्या असतात.

गुहांमध्यें साधारणपणें अंधारच असतो. तो दूर करण्यासाठीं मुख्य दरवाजावर एक मोठ्या पिंपळाच्या पानाच्या आकाराचें छिद्र पाड-ण्यांत येई. त्यामुळें आंतील मूर्तींपर्यंत प्रकाश जाऊं शकत असे. पुष्कळ वेळां गुहेच्या मधला दिवाणखाना आणि बाजूचे खांब यांचें अनुकरण मंदि-रांच्या सभामंडपांत करण्यांत येते मंदिरांच्या शिखरावर सुपारी, आंबा किंवा पालथ्या ठेवलेल्या कमळाचा आकार बनविण्यांत येई. मौर्य काळीं किंवा सबंध हिंदूकाळींच म्हणावयास हरकत नाहीं, गोल कमानी आढळून येत नाहींत, आणि सामान्यरीत्या खांबसुद्धां उंच असत नाहींत.

हल्लींचे कांहीं विद्वान असें दाखवून देण्याचा प्रयत्न करीत आहेत कीं, मौर्यकाळची आणि विशेषत: चंद्रगुप्ताच्या वेळची कला इराणामधून

येथें आलेली आहे. पण या म्हणण्यांत कांहींच अर्थ नाहीं. फार तर एवढें म्हणतां येईल कीं, इराणी आणि हिंदी कला यांच्यांत पुष्कळ साम्य आहे व म्हणून अति प्राचीन अशा कोणत्या तरी एकाच कला पद्धतीच्या या दोन शाखा असाव्यात.

आपल्या येथें शिल्प स्थापत्याचे नमुने अनेक आहेत. पण त्या प्रमाणांत त्या विषयावर ग्रंथ नाहींतच असें म्हणण्यास हरकत नाहीं. कांहीं थोडे असले तरी अजून सांपडलेले नाहींत. कित्येक दुर्मीळ ग्रंथ सध्यां उपलब्ध झालेले आहेत. त्यांत नगररचना, मंदिरांचें बांधकाम व मूर्तींच्या अवयवांचें प्रमाण, वगैरे विषयांचे सूक्ष्म नियम आणि महत्त्वाच्या सूचना आढळतात. रामराज नांवाच्या एका ग्रंथकारानें अशी माहिती गोळा करून इंग्रजींत एक मोठें पुस्तक लिहिलें आहे. त्यावरून आपल्याला खूप माहिती मिळते, आणि आपल्या स्थापत्यकलेच्या मागें कोणत्या भावना आहेत याविषयीं आपण अनुमान काढूं शकतो. परंतु आपलें जीवन, त्यावर पडलेली प्राकृतिक परिस्थितीची छाप, आपला सामाजिक आणि वैयक्तिक आदर्श, आपल्या धार्मिक आकांक्षा वगैरे गोष्टींचा आपल्या स्थापत्यावर काय परिणाम झाला आहे किंवा त्यांच्याकडून स्थापत्याला कोणती प्रेरणा मिळाली आहे याचें विवेचन करणारे ग्रंथ अजून लिहिले गेले नाहींत. श्री. आनंदकुमार स्वामी यांच्या सारख्या कलाकोविदानीं या कार्यास नुकतीच सुरवात केलेली आहे. परंतु जुन्या जीवनाशीं पूर्ण परिचित आणि त्याविषयीं समभाव असणाऱ्या एकाद्या समर्थ पुरुषानें तें काम हातीं घेतलें पाहिजे. मि. हॅवेल नांवाच्या एका विद्वानानें हिंदुस्थानची कला आणि धार्मिक विचार यांच्यामधील संबंध दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. ज्ञानमार्ग, कर्ममार्ग आणि भक्तिमार्ग यांचा कलेवर कोणत्या प्रकारें वेगवेगळा प्रभाव पडला आहे हें त्यानें दाखवून दिलें आहे.

जुन्या नगररचनेंत वर्णाश्रम-व्यवस्था आणि प्रत्येक वर्णाचें महत्त्व यांचें तारतम्य आपण पाहूं शकतो. उलट मंदिरांत आपल्या धार्मिक भावना मूर्त स्वरूप धारण करून उभ्या राहतात. उदाहरणार्थः—प्रत्येक मंदिरांत आंतील गाभारा, बाहेरचा रंगमंडप आणि मधले छोटेसें अंतराळ यावरून

आपल्या उपासनेचे तीन प्रकार दिसून येतात. गाभाऱ्यांत नेहमीं संकुचितता असते. प्रकाश पण थोडाच असतो. कांहीं विशिष्ठ लोकांनाच आंत जाण्याचा अधिकार असतो. तेथें कर्मकांडाचें राज्य असतें. धार्मिक विधींच्या विस्तारांना तर अंतच नाहीं. अंतराळामध्यें कित्येक नैष्ठिक उपासक, ध्यानी, वृद्ध पुरुष आणि नित्यपाठ करणारे कर्मकांडी बसलेले असतात. त्यांचें चित्त आंत चालू असलेल्या विधीकडे असतें. तरी पण ते त्यांत भाग घेत नाहींत. रंगमंडपांत सामाजिक हिंदूधर्म असतो. तेथें पुराण चालतें, कथा कीर्तनें सुरू असतात, संगीताचा प्रवाह सुरू असतो, लोक दर्शन घेतात, फुलें वाहतात, प्रसाद घेतात आणि घरीं निघून जातात. मंदिरांच्या आसपास खोल्यांची रांग असते. त्यांत धर्मावर उपजीविका चालविणारे आचार्य, भिक्षुक, साधुसंन्यासी वगैरे लोक राहतात. प्रवासी व यात्रेकरूंना तेथें आश्रय मिळतो. मंदिरासमोरील विस्तीर्ण पटांगणांत हिंदूधर्माचें विशाल हृदय रासक्रीडा करीत असतें. तेथें रामलीला चालतात, ज्ञातिभोजनें होतात, सार्वजनिक उत्सव साजरे केले जातात आणि ग्रामपंचायतीसुद्धां तेथेंच भरतात. जवळच एखादा मोठा तलाव असतो. त्यांत पुष्कळ लोक वेगवेगळ्या ठिकाणीं परंतु एकाच पाण्यांत स्नानसंध्या करतात. मंदिर हें हिंदूधर्माचें–व्यापक हिंदूधर्माचें–शरीर आहे. त्यांत हिंदू लोकांचें साहित्य, संगीत, शिल्प, स्थापत्य वगैरे सर्व प्रकारचें रचनाकौशल्य एकत्रित होत असतें. सगळा समाज या ठिकाणीं एकत्र येऊन तें कौशल्य आपल्या जीवनांत उतरवीत असतो.

हिंदुस्थानच्या स्थापत्याचा इतिहास लिहिण्यास नुकतीच सुरवात झाली आहे. आणि थोडक्याच वेळांत त्यांत प्रगतिहि पण चांगली झाली आहे. उत्तर हिंदुस्थानचें स्थापत्य कोणत्याहि देशाला अभिमान वाटण्यासारखें आहे. परंतु स्थापत्याचा उत्कर्ष दक्षिणेंत जास्त दिसून येतो. वेरूळ, अजिंठा, कार्ला आणि घारापुरीचीं लेणीं, मदुरा, त्रिचनापल्ली आणि तंजावर येथील मोठालीं, गावांसारखीं मंदिरें आणि मोठमोठे तलाव सर्व दक्षिणेंतच आहेत. सांचीचा स्तूप देखील दक्षिणी कौशल्याचा नमुना आहे, असा कित्येक दक्षिणेचे अभिमानी दावा करतात. अमरावती ( आंध्रदेश ) चें स्थापत्य देखील

दक्षिणेचेंच म्हणतां येईल. दक्षिणचा इतिहास जेव्हां देऊं तेव्हां त्याबरोबर उत्तर व दक्षिण या दोहोंच्या स्थापत्याची सविस्तर चर्चा करणें सोईचें होईल. येथें फक्त मौर्य आणि गुप्तकाळच्या स्थापत्याचा उल्लेख केला आहे. उत्तरेंत आज जे नमुने सांपडतात त्याच्या कित्येकपट नमुने राज्यक्रांत्या आणि धार्मिक झगडे यामुळें नष्ट होऊन गेले असतील. सध्यांच्या नमुन्यावरूनच अभिप्राय बनविणें हें उत्तरेवर दुप्पट अन्याय करण्यासारखें होईल. तरीपण जेवढे नमुने आहेत तेवढ्यावरून देखील भारताच्या अलौकिक कारागिरीची पूर्ण कल्पना येऊं शकेल. १९२३

# १२ : सहा चाकांचें जग

जीं जीं यंत्रें आपण पाहतों त्यांत या ना त्या प्रकारें चक्राचा उपयोग मुख्य आहे. या चक्राची कल्पना माणसाला कोठून सुचली असेल? आकाशांतील तारे रहाटगाडग्याप्रमाणें अनंत काळापासून डोकीवर फिरत आहेत. त्यावरून चक्राची कल्पना माणसाला सुचली असेल काय? कीं पारिजातक आणि चमेलीसारखी फुलें जमिनीवरून पळत असलेली पाहून माणसाला चक्राची कल्पना सुचली असेल? किंवा आकाशांतील चक्राकार वादळें आणि पाण्यांतील प्रचंड भोवरे पाहून माणसाला चक्राकार गतीची कल्पना आली असेल? दोन्ही हात पसरून गाऱ्या गाऱ्या भिंगाऱ्या करणाऱ्या मुलीनें चक्रगति शोधून काढली असेल काय? कीं वडिलांचें बोट धरून त्यांच्या सभोंवतीं गोल फिरणाऱ्या मुलाला त्याचीं कल्पना प्रथम आली असेल?

निसर्गांत सर्वच वस्तू चक्राकार फिरत असतात. उन्हाळा, पावसाळा, आणि हिंवाळा पुन: पुन्हा येतात आणि ऋतुचक्र पुरें करतात. जन्म, बाल्यकाळ, युवावस्था आणि मृत्यु हें एक चक्र पुरें करतात आणि पुनर्जन्माच्या द्वारें नव्या चक्राची सुरवात करतात. हीच गोष्ट सकाळ, दुपार, संध्याकाळ आणि रात्र यांच्या रूपानें सृष्टिनियम व्यक्त करते. आवाजाच्या लहरी आणि प्रकाश किरणें देखील शेवटीं गोल गोलच फिरतात. हें पाहून आपली खात्री होते कीं या मायेच्या चक्रांत सरळ कांहींच नाहीं. सर्वच गोल गोल फिरत असतें.

मानव संस्कृतीच्या मुळांत हें चक्र आहे. हें सुदर्शन मनुष्याच्या हातांत आल्यापासून सर्व प्रकारची प्रगति सुरु झाली. ज्याला या चक्राची कल्पना प्रथम सुचली तो एक महान् ऋषि असला पाहिजे.

जेथें तेथें चक्राचा उपयोग असलेला आपण पाहतों. त्यावरून

त्याचा मोठेपणा आणि त्याची सुंदरता आजकाल आपलें लक्ष वेधून घेत नाहीं. वैदिक काळच्या लोकांना या चक्रांत अनुपम काव्य दिसलें. श्रीकृष्णांनीं हातांत सुदर्शनचक्र धारण केलें. त्या पुरुषोत्तमाला चक्रांत आपल्या शक्तीचें प्रतीक आढळलें. बुद्ध भगवानांनीं धर्मचक्र सुरू केलें. त्या महाभागाला त्यांत विश्वशांतीचा साक्षात्कार झाला. अशा प्रकारें ज्या चक्रांत काव्य, सामर्थ्य आणि सामंजस्य हीं सामावलेलीं आहेत तें चक्र आज मानवी व्यवहाराच्या अंग प्रत्यंगांत प्रचलित झालें असल्यास नवल काय ? आज या चक्राचा विस्तार कितीहि झाला असला तरी मुख्य सहा ठिकाणीं त्यानें आपल्या संस्कृतीला चालना दिली आहे.

**दळण्याचें जातें :**—धान्य भिजवून दगडावर वाटण्याचा माणसाला कंटाळा आला आणि त्याला जात्याचा शोध लागला तेव्हां त्याला किती आनंद झाला असेल ! चक्राची गति सतत चालते, न थांबवितां त्याच्याकडून काम घेतां येतें. जात्याचा शोध लागला आणि भौतिक संस्कृतीची सुरवात झाली. दळून गव्हाचें पीठ तयार होऊं लागल्यामुळें गहूं शिजविणें आणि पचविणें सोपें झालें. एकदां जातें हातीं आल्यानंतर मग काय ? त्यांत हळद देखील दळली जाऊं लागली आणि दगड देखील पिसले जाऊं लागले.

**कुंभाराचें चाक :**—चक्राचा दुसरा उपयोग कुंभाराला सुचला. पाण्यांत विरघळणाऱ्या आणि वाळल्यानंतर मजबूत बनणाऱ्या मातीमधून अन्न शिजविण्याचीं भांडीं तयार होणें ही काय सामान्य प्रगति झाली ? भट्टींत ओली माती भाजून दगडापेक्षां देखील जास्त उपयोगी अशा विटा मनुष्य तयार करूं शकला ही त्याच्या नशीबाची किंवा शोधक शक्तीची खुबी आहे. भांड्याला सुंदर आकार किंवा घाट देण्याचें काम कुंभाराचें चक्र करतें. या चक्राची शक्ति पाहून कवींनी विधात्याला देखील कुंभाराची उपमा दिली आणि या चक्रावरील गोळ्याला ब्रह्मांडाच्या जागीं कल्पिलें. आज देखील घागर, खुजे, नळ, दिवे, प्याले वगैरे अनेक चीजा या चक्रावर तयार होतात.

**प्रवासाचीं साधनें :**—धान्य दळण्याची आणि शिजविण्याची सोय

-तर झाली. परंतु शेतांत धान्य मळून घरीं आणावें तेव्हांच ते वापरलें जाणार ना ? कुंभाराच्या चाकासारखीं दोन चाकें आसाच्या दोन टोकाला बसवून लोकांनीं गाडे तयार केले आणि त्यामुळेंच स्थलांतर किंवा यात्रा वगैरे करण्याची सोय झाली. स्वत:च पळावयाचें व स्वत:च लढावयाचें या अडचणींतून सुटण्यासाठीं लढणाऱ्या वीरानीं रथांत बसून लढण्याची योजना केली. रथ म्हणजे फिरता किल्ला. रथ जेवढा उंच तेवढा त्याच्यावरून दूर-वर दृष्टिक्षेप करतां येऊन अचूक शरसंधान करतां येणार. गाई बांधण्याच्या गोठ्याचे दरवाजावर गोपुरें बांधून त्यावर बसून दूर दृष्टिक्षेप करण्याची पाहारेकऱ्यांची सोय केली, त्याप्रमाणें तीन तीन चार चार मजल्यांचे रथ करून लढवय्यांची खूपच सोय केली गेली. चक्रांचा शोध लागला नसता तर हा फिरता किल्ला कोठून आला असता ? लांकडाचे मोटमोठे ओंडके आणि दगडाच्या प्रचंड शिळा देखील एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं घेऊन जाणें चाकामुळें शक्य झालें.

चक्र आलें आणि पुष्कळसें घर्षण कमी झालें. चाक नसतें तर बैलांनीं गाडी कशी ओढली असती या गोष्टीचा विचार केला असतां चाकाचें महत्त्व आपणांस बरोबर पटूं शकेल.

**पाण्याचा रहाट:**—यानंतर पाळी येते रहाटाची आणि त्यावरील घटमाळेची. विहिरींतून पाणी काढण्याचे अनेक प्रकार आहेत. विहिरीस एका बाजूनें पायऱ्या बनवून आंत उतरण्याची सोय करणें हा एक प्रकार झाला. विहिरीच्या कांठावर उभे राहून घड्याला दोरी बांधून सरळ आंत सोडणें व आंत पडण्याची जोखीम घेऊन सुद्धां त्याला वर खेचणें हा दुसरा प्रकार. विहिरींत उतरण्यानें पाणी बिघडण्याची व नारु वगैरेसारखे रोग होण्याची भीति असते. वांकून पाणी काढण्यांत जीवास धोका असतो. विहिरीवर एकादें चाक उभें करून घागरीनें किंवा मोटेनें पाणी काढल्यास वरील दोन्ही संकटें टाळतां येतात. यांत सोय असतें. परंतु सतत गति मात्र नसते. आणि सतत गतीशिवाय आपल्याला हवा तसा फायदा मिळत नाहीं. म्हणून शेवटीं माणसाला घटमाळेचा शोध लागला. एका मोठ्या चाकाच्या परिघावर त्यानें लहान लहान घटांची माळ लटकत ठेवली. उंचावर बसून

मनुष्य हें चाक हातापायाच्या मदतीनें फिरवूं लागला आणि त्यांतून सतत पाण्याची धार पडूं लागली. रहाटाचें हें मूळ स्वरूप होय. जमिनीवर बैलानें वाटोळें फिरावयाचें आणि त्याच्या काटकोनांत रहाट फिरावयाचा, ही चुन्याची धाणी वगैरे गोष्टींचा शोध लागल्यानंतरची रहाटाची उत्क्रांति आहे.

येथपर्यंत चाकांचा सरळ उपयोग आपण पाहिला. जात्यांत चक्राच्या बाजूचा उपयोग करतात. कुंभाराच्या चाकांत चक्राच्या नाभीचा विशेष उपयोग केला आहे. गाड्यामध्यें चक्राच्या परीघाचा उपयोग केला गेला आहे. आणि रहाटामध्यें चक्राची कड घटमाळेला आपली गति अर्पण करते. परंतु चक्रापासून जी गति उत्पन्न होते तिचा उपयोग दुसऱ्या ठिकाणीं करणें हें काम चरक आणि आपला चरखा यांत साधलें आहे.

**चरक:**—पाण्याच्या रहाटाच्या घटमाळेवरूनच माळेच्या द्वारें चक्राची गति एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेतां येईल ही कल्पना माणसाला सुचली असेल. जसजसें चक्र फिरतें तसतशी त्याच्या गतींत वाढ होत जाते. या गतीला इंग्रजींत ( Momentum ) म्हणतात. याचा फायदा घेऊन एक मोठें गतिचक्र ( फ्लायव्हील ) वाटेल त्या यंत्राबरोबर जोडून दिलें कीं निश्चित गति अविरतपणें प्राप्त होते. या चक्रामुळें कित्येक कामें सोपीं झालीं. चाकू, सुरी, वगैरे हत्यारांना धार लावणें, लांकडाचे लहान मोठे खांब किंवा अशाच इतर वस्तू तयार करणें वगैरे कामें आतां पुष्कळच सोपी झालीं आहेत. तांब्या पितळेची भांडीं सुद्धां याच पद्धतीनें तयार होऊं लागलीं आहेत.

**आपला चरखा:**—आणि यांतूनच चरख्याचा जन्म झाला असला पाहिजे. अथवा चरख्यानें चरकाला जन्म दिला असल्यास त्यांतहि आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. इतक्या दीर्घ काळानंतर याचा निर्णय कोण करूं शकणार ? परंतु चरख्यानें माणसाचें सर्वांत मोठें काम केलें. त्यानें तकलीपासून कातण्याची कला मागून घेऊन त्यांत आपला वेग मिळविला आणि सगळ्या जगाची लाज राखली. तकली हवेंत लटकत फिरत होती ती चरख्याच्या बंधनांत पडली. बोटांनीं तिला गति मिळत होती त्या ऐवजीं चाकानें तिच्यावर आपला पाश टाकला. तकलीनें आपलें नाक

गमावलें आणि ती त्राक बनली. तकलीच्या मदतीनें मनुष्य सूत थोडें कांती आणि नंतर तें गुंडाळून ठेवी, पुनः कांती आणि पुनः गुंडाळी. येथें देखील माणसाला असें करण्याचें सुचलें आणि चरखा चालूं लागला. आज जगांतील मोठमोठ्या गिरण्या, आगगाड्या, जहाजें, विमानें वगैरेमध्यें चक्रांचे कित्येक उपयोग आपण पहातों. ते इतके कीं माणसाचें डोकें चक्रासारखें फिरूं लागतें. मनगटावरील एका छोट्याशा घड्याळांत देखील कित्येक चक्रें फिरत असतात. पण हा फक्त चक्रांचा विस्तार म्हणतां येईल. जीवनाच्या प्राथमिक सहा अवस्था पूर्ण करण्यांत चक्राचा ज्यानें वरीलप्रमाणें उपयोग केला त्याची बुद्धि धन्य होय. त्या अज्ञांत चक्रऋषीला नमस्कार असो.

२०।१०।२९.

## १३ : सुताराचीं अवजारें.

क्रमविकासाचें तत्त्व आतां सगळेजण स्वीकारतात. त्यांत ऐतिहासिक किंवा वास्तविक दृष्टी देखील ठेवतां येईल किंवा तात्त्विक अथवा काल्पनिक दृष्टीनेंहि त्याकडे पाहतां येईल. दुसऱ्या दृष्टीनें आपलीं सुतारीचीं सामान्य अवजारें तपासण्यासारखीं आहेत.

जुन्या रिवाजांना चिकटून राहणाऱ्या लोकांत सुतार जेव्हां वावरतो तेव्हां तो आपल्या हातांत नेहमीं पटाशी घेऊनच फिरत असतो. ज्याकाळीं प्रत्येक माणसाची धार्मिक कल्पना आणि उपासना पद्धति, त्याच्याजवळ नेहमीं असणाऱ्या वस्तूच्या खुणेवरून ठरविली जाई, त्याकाळीं ब्राह्मण लोक हातांत पोथी किंवा पळीपंचपात्रें ठेवीत, न्हावी आपली धोकटी काखेस अडकवून फिरत, क्षत्रीय वीर कमरेस समशेर लटकवीत आणि जोशी पत्रिकांच्या पताका फडकवीत. त्याकाळीं हें आवश्यकहि होतें. सुतार लोकांनीं आपली जातिविशिष्ठ खूण म्हणून पटाशी किंवा वाकस पसंत केला होता. सुताराचीं हत्यारें सध्यां खूप वाढलेलीं आहेत. आणि प्रत्येक नवीन येणारें हत्यार सुताराचें कांहीं ना कांहीं हस्तकौशल्य कमी करीत आलें आहे. यामुळें अशी भीति वाटते कीं ज्याप्रमाणें छापखाने आणि टाईपरायटर यांनीं लिहिण्याची कला जुनी पुराणी करून सोडली त्याप्रमाणें सुताराची कला देखील निकामी होऊन जाते कीं काय ! परंतु हिंदुस्थानच्या खेडेगांवांतून अद्याप जुनी संस्कृतिच चालू आहे. खेड्यांची गरिबी आणि दुर्गमता यामुळें तेथील जुनें-पण अजून कांहींसें टिकून राहिलें आहे. हल्लीं सर्वच हत्यारें परदेशाहून येऊं लागलीं आहेत.

वाकस, हातोडा, पटाशी, रंधा, करवत, सामता आणि कानस हीं सुताराचीं मुख्य हत्यारें म्हणतां येतील. या सर्वांचा कुऱ्हाडी मधूनच विकास

झाला आहे असें जर कोणीं सांगितलें तर आपल्याला आश्चर्य वाटेल. कुठें कानस आणि कुठें कुऱ्हाड ! आतां या दोहोंमधील नातें आपण तपासून पाहूं या.

अणीदार दगड किंवा चकमक यांचें अनुकरण करून लोखंडाच्या पात्याला माणसानें दांडा बसविला, आणि कुऱ्हाड तयार केली. त्यादिवसापासून संस्कृतीस प्रारंभ झाला. कुऱ्हाडीचा उद्देश लाकडावर घाव घालून एकाचे दोन तुकडे करणें हा आहे. अशा प्रकारचें लाकडाचे दोन तुकडे होतात खरें, परंतु दोहोंपैकीं एकालाहि विशिष्ट आकार कांहीं मिळत नाहीं ! आणि दुसरी गोष्ट म्हणजे लाकडावर कुऱ्हाडीचा घाव घालतांना नजर बरोबर पोहोंचत नाहीं. ही अडचण टाळण्यासाठीं माणसानें कुऱ्हाडीचें पातें उभें होते ते आडवे बसवून त्यामधून वाकस तयार केला. वाकसाची धार एक पृष्ठभाग सरळ व दुसरा तिरकस बनवून तयार होते. हा वाकस वापरल्यानें लाकडामधून तुकडे किंवा ढलपे निघतात पण ते अशा रीतीनें निघतात कीं लाकडाच्या एक पृष्ठभाग गुळगुळीत होत जातो आणि बाकीचे ढलपे तुटून खालीं पडतात.

आतां या वाकसांत एक अडचण अशी आहे कीं, दर वेळीं सबंध वाकस उचलून त्याच त्याच ठिकाणीं पुनःपुन्हा मारावा लागतो. ही कला ध्यान आणि संवय याच्या योगेंच प्राप्त होते. नाहीं तर पहिल्या पेक्षां दुसरा घाव जरा वरच पडतो आणि लाकडाचा पृष्ठभाग गुळगूळीत होण्याऐवजीं जास्तच बिघडतो. अशा प्रकारें प्रत्येक वेळीं वाकस उचलावा लागूं नये एवढ्यासाठीं माणसानें वाकसाचे दोन भाग केले. धार असणाऱ्या भागाचें पातें बनविलें व दांड्याचें त्यावर मारण्याकरितां वजन तयार केलें. पात्यानें पटाशीचें रूप धारण केलें आणि दांड्याचें वजन ही हातोडी झाली. वाकसाचें काम आतां पटाशी व हातोडी यांच्या योगें चालूं लागलें. पटाशी उचलल्याशिवाय वाटेल तितक्या वेळां हातोडीनें तिच्यावर प्रहार करतां येतात. माणसानें नंतर पाहिलें कीं ही पटाशी दोन प्रकारें वापरतां येते. सरळ बाजू तिरकी बाजू उजवीकडे किंवा डावीकडे कुठेंहि ती वळवितां येते. हा फायदा पाहिल्यानंतर माणसाला असें वाटलें कीं लाकडाचा पृष्ठभाग जर पटाशीच्या द्वारें हळूंच काढतां आला तर लाकूड आपल्याला हवें तितकें

जाड किंवा पातळ बनवितां येईल. परंतु त्यांत हाताचें कौशल्य खूप लागतें. सगळया बाजूंनीं सारखें तासलें गेलें नाहीं तर पृष्ठभागावर सपाटी यायचीच नाहीं. यासाठीं माणसानें दुसरी एक युक्ति योजिली. लाकडाच्या एका तुकड्यांत एक तिरपें भोंक पाडून त्यांत पटाशी अशा प्रकारें बसवून दिली कीं त्याचाच रंधा झाला. ज्यानें या रंध्याचा शोध लावला त्याच्याच आधुनिक अवतारानें 'सेफ्टी रेझर'चा शोध लावला असला पाहिजे. रंधा येतांच सुतारीच्या कलेंत खूप प्रगति झाली. आतां वाटेल तसलें लाकूड असलें तरी त्याचा पृष्ठभाग पाण्याप्रमाणें एका सपाटींत आणतां येतो.

यानंतर चौरस आणि घन तयार करण्यास कितीसा वेळ लागणार? जरा गुण्या वापरला कीं पुरें! (गुण्या हें अवजार नाहीं ती एक कसोटी आहे.) कुऱ्हाड वापरली असतां जे दोन तुकडे पडत असत तें दोन्ही आकार रहित असत. वाकसापासून रंध्यापर्यंतच्या अवजारांनीं आपण जेव्हां लाकडाचे तुकडे करतो तेव्हां एक तुकडा सुंदर, गुळगुळीत आणि आकारयुक्त असतो. दुसरे तुकडे ढलप्याच्या रुपानें निघतात. आणि ते फेंकून द्यावे लागतात. अशा प्रकारें पुष्कळसें लाकूड विनाकारण निरुपयोगी होतें. जर अशी कांहीं युक्ति शोधून काढतां आली कीं जिच्यामुळें हत्यार वापरल्यानंतर दोन्ही बाजूचे तुकडे उपयोगी येतील तर खूप बचत होईल. हें कसें होणार? माणसाला युक्ति सुचली. जर पटाशी खूपच लहान—अत्यंत लहान—करण्यांत आली आणि अशा अनेक पटाशा एकमेकीला जोडून टाकण्यांत आल्या तर करवत तयार होईल. या पटाशींच्या धारेवर अथवा करवतीवर वरून ठोकण्याऐवजीं रंध्याप्रमाणें तिला बाजूनें ओढलें पाहिजे. म्हणजे लाकडाचा एका छोट्याशा भेगे एवढा भुस्सा करून लाकडाच्या दोन्ही बाजूच्या पृष्ठभागांना ती सुंदर, सरळ गुळगुळीत आणि उपयोगी बनविते. अशा प्रकारें लाकूड कापण्याची कला विकसित झाली; आणि आज तर करवत ही दगड कापण्यास आणि डॉक्टरांना हाडें कापण्यास सुद्धां उपयोगी पडते.

बारीक पटाशींची रांग पाहून ज्याप्रमाणें माणसाला करवतीची कल्पना सुचली त्याप्रमाणें लहानशा दोन पटाशा एकत्र करून रंध्याप्रमाणें त्याला सरळ गति देण्याऐवजीं वाटोळी गति देऊन माणसानें सामता तयार केला.

करवत जशी सरळ कापत जाते आणि खालीं उतरत जाते. त्याप्रमाणें सामता देखील लाकडाला कोरत आणि आंत उतरत जातो. करवत आणि सामता या दोहोंचे गुणधर्म एकच. फक्त कार्याच्या दिशेंत फरक आहे. दोघांचाहि दाब वरून आणि ओढ बाजूनें असते.

आतां आपण करवतीचाच पुनः विचार करूं. करवत जितकी पातळ असेल तितकी चांगली परंतु जर आपल्याला वरून दाब द्यावयाचा नसेल आणि करवत लाकडांत उतरवावयाची असेल तर तिची धार वाटेल तितकी रुंद करतां येईल आणि तिचे दाते हवे तितके बारीक करतां येतील. या कल्पनेंतूनच कानस उत्पन्न झाली. करवतीची वीस पंचवीस पातीं एकत्र पकडून धरल्यास त्यांचा पात्याकडील पृष्ठभाग कानशीसारखा दिसेल. आणि कानशीप्रमाणें वापरतां देखील येईल. यावरून करवत आणि कानस यामधील साम्य सहज ध्यानांत आलें पाहिजे.

कानशीनें आपण जो पृष्ठभाग घासतो तो हवा असलेला आकार धारण करतो आणि ढलप्या ऐवजीं बारीक भुकटी पडते. रंध्याचें पातें कोणत्याहि आकाराचें असलें तरी एकच सरळ गति देणें शक्य असतें. करवतीचें देखील असेंच आहे. पण कानस मात्र वाटेल तशी वापरतां येते. ती सरळहि जाते आणि अडवीहि जाते. शिवाय ती वाटोळी देखील फिरवितां येते हा तिचा विशेष फायदा आहे.

वर वर्णिलेलीं सहा अवजारें हें सुतारकामाचें सर्वस्व आहे. या अवजारांचा जसजसा विकास होत गेला तसतशी हाताची विशिष्ठ कारागिरी कमी झाली आहे. आणि अवजारांची सोय वाढली तरी देखील ही सहा अवजारें अत्यंत आवश्यक आहेत हें कबूल केलेंच पाहिजे. या नंतरची जितकी अवजारें आहेत ती सर्व वरील सहापेक्षां कांहीं वेगळी क्रिया करीत नाहींत. म्हणजे त्यांत कोणत्याहि प्रकारचा विकास आपणास दिसत नाहीं. वेळ वाचविण्यासाठीं किंवा गफलत पचविण्यासाठीं त्यांचा उपयोग होतो. आणि याहूनहि वाईट गोष्ट म्हणजे कारागिरांना धंद्यांतून हांकून लावून वाटेल त्या ओबड धोबड माणसाकडून, किंवा त्याला देखील रजा देऊन फक्त यंत्राकडून काम करवून घेण्याची दानत ( इच्छा ) या मागें आहे.

## १४ : नवें युग.

युरोपांतील राष्ट्रें जेव्हां गेल्या महायुद्धांत उतरलीं तेव्हां, युद्धानंतर युरोपच्या सामाजिक जीवनांत मोठ्या क्रांतीस सुरवात होणार आहे याची त्यांना कुठें कल्पना होती ? परंतु अशी क्रांति होऊन गेली आणि आज युरोपचें तोंड सर्वस्वी बदलून गेलें आहे. आपला लढा तर आपण एक वर्षच लढलों. अजून तो पुरा देखील झाला नाहीं. तरी पण त्याच्यामुळें देशांत प्रत्येक दिशेनें एका महान क्रांतीची सुरवात होऊन चुकली आहे. आत्मविश्वास गमावून बसलेल्या निराश राष्ट्रांची मनोदशा एकसारखी असते. त्याच राष्ट्राला जेव्हां आपल्या शक्तीची जाणीव होते आणि त्या शक्तीचा अनुभव येतो तेव्हां सगळी मनोभूमिका बदलून जाते. एक वर्षा-पूर्वींचे आपण आज वेगळ्याच प्रकारें विचार करीत आहोंत, वेगळी भाषा बोलत आहोंत. इतकेंच काय पण आपले जुने दोष देखील आतां जुनें रूप सोडून नवीन स्वरूपांत प्रगट होत आहेत.

सत्याग्रह हें लोकशिक्षणाचें एक उग्र रूप आहे. मुलें आणि म्हातारे, स्त्रिया आणि पुरुष सर्वांनींच एक वर्षाचें हें शिक्षण घेतलें. सर्वांतच परिवर्तन झालें आहे. आपण किती प्रगति केली आहे याची कल्पना यावरून आपल्यास येत नाहीं. जे आपल्याला विरोध करतात त्यांची दृष्टी देखील बदलली आहे. ते पण आतां नव्या पद्धतीनें बोलत आहेत. नव्या पद्धतीनें आपल्यावर मात करण्यासाठीं झटत आहेत.

या जीवनक्रांतीची एक स्पष्ट छाप ही आहे कीं ज्या गोष्टी पूर्वी जनतेला समजविण्यास अडचण पडत असे त्या आतां जनतेला सहज कळू लागल्या आहेत. जनतेचें शिक्षण शाळा, पुस्तकें किंवा व्याख्यानें यांच्या द्वारें जितकें होत नाहीं, त्यापेक्षां अधिक प्रजेच्या पुरुषार्थावर रचलेल्या जीवनव्यापी चळवळीनें होतें.

गेलीं शेंपन्नास वर्षें आपण फक्त योगक्षेमाच्याच काळजींत पडलों होतों. आज कुठें आपण मानव समाजाच्या सेवेच्या आदर्शांना आपल्यापुढें

ठेवण्याचा प्रयत्न करीत आहोंत. जातीपातीची संकुचितता नाहींशी करणें आपल्याला अशक्यप्राय वाटत होतें. आज ही गोष्ट प्रचारांत येऊं लागली आहे. आपण नव्या युगाची सुरूवात केली आहे याविषयीं आतां मुळींच शंका राहिलेली नाहीं.

आतां नव्या युगाच्या नवीन गोष्टींचा विचार करूं. या गोष्टी अगदीं नवीन आहेत असें म्हणतां येणार नाहीं. गांधीजीसारख्यानीं पंधरावीस वर्षांपासून या गोष्टींचें सूचन करून ठेवलें आहे. परंतु जनतेनें तर नुकताच कांहीं अंशीं स्वेच्छेनें या गोष्टींचा हार्दिक स्वीकार केला आहे. लोकशिक्षणाचें रहस्य आतां आपल्याला समजूं लागलें आहे. सेवामय जीवन स्वाभाविक होऊं लागलें आहे यामुळें दृढतापूर्वक पुढें पाऊल टाकतांना आपल्याला कांहीं अडचण येणार नाहीं.

आज युद्ध नाहीं; परंतु कायमची शांति सुद्धां अजून प्रस्थापित झालेली नाहीं. शिक्षण आणि साहित्य हा जर सामाजिक जीवनाचा केवळ विलासच असेल तर संधिकाळीं त्यांना जनमानसापासून जितकें दूर ठेवतयेईल तेवढें ठेवलें पाहिजे. परंतु आपण साहित्याला व शिक्षणाला जिवंत वस्तू मानतो, जिवंत करूं इच्छितो. लोकजीवन तेजस्वी घडविण्यांत दोहोंची अत्यंत आवश्यकता आहे, म्हणून युद्ध आणि शांति या दोन्हींसाठीं या दोहोंचा उपयोग आहे.

शस्त्रयुद्धावर विश्वास ठेवणारे आणि त्यांत निमग्न असणारे लोक नेहमीं एक सूत्र पुढें करीत असतात. युद्धाची तयारी नेहमीं जय्यत ठेवणें हाच युद्ध टाळण्याचा एकमेव उपाय आहे असें त्यांचें म्हणणें असतें. शस्त्रयुद्धामुळें संस्कृतीचा नेहमीं नाश होत असतो. जनतेला नेहमी सन्निपाताच्या अवस्थेंत रहावें लागतें. यामुळें मानवजातीचे हितचिंतक या सूत्राला नेहमींच विरोध करीत आले आहेत. परंतु सत्याग्रह ही वेगळीच गोष्ट आहे. या युद्धाचा हेतू आणि साधन हीं दोन्हीं धर्म्य असतात. यामुळें या युद्धाची तयारी ही रामराज्याचीच तयारी असते. ही तयारी दोन्ही पक्षांचें उत्थान करणारी असते. यामुळें या तयारीचें वातावरण लोकजीवनाला आणि मानवहिताला पोषक असतें.

# १५ : जगद्व्यापी परिवर्तन

आज जगांत जें एक महान् जगद्व्यापी परिवर्तन होऊं पहात आहे. त्याचें कांहींसें अस्पष्ट दर्शन कांहीं कांहीं लोकांना होऊं लागलें आहे. परंतु कांहीं लोक इतके कांहीं जड आहेत कीं जें परिवर्तन होऊन चुकलें आहे त्याची त्यांना गंधवार्ता देखील नाहीं. ते अद्याप निघून गेलेल्या दुनियेंतच रहात आहेत. जगाची रचनाच अशी आहे कीं जेव्हां त्याच्या व्यवस्थेंत घाण निर्माण होते तेव्हां ती दूर करण्याच्या इलाजाचें बीज देखील त्याबरोबरच पेरलें जातें. आणि हें बीं अशा ठिकाणीं पेरलें जातें कीं जेथें विशेष योग्यतेची देखील अपेक्षा नसते. जुन्यामधलें जें कांहीं पूर्णत्वाला पोहोंचलें असेल तें तसेंच टिकून राहतें आणि जें कच्चें राहिलें असेल आणि ज्यांत दोषांना अवकाश राहिला असेल अशांतच प्रगतीचें आणि परिवर्तनाचें बीज फोफावूं शकतें.

सामान्य नारळाच्या करवंटींत दोन भागांपैकीं एक भाग कच्चा भोंक असलेला असा असतो. झाडामधून निघणारा अंकूर पूर्णत्व पावलेल्या करवंटीमध्यें नसतो. तर दुबळ्या, नरम, छिद्रें असलेल्या भागांत असतो. आज जे मागासलेले समजले जातात, त्यांच्या हातूनच नवयुगाची प्रेरणा विकसित व्हावयाची आहे. कच्चे राहण्यांत किंवा मागासलेले असण्यांत जर अशा प्रकारचा कसलाच फायदा नसता तर ‘ जगांत न्याय आहे ’ असें म्हणता आलें असतें का ?

महाभारतकाळीं आर्यसंस्कृतींत कुसंस्काराचा प्रवेश झाला आणि परस्पर संहार सुरूं झाला. मद्यपान, जुगार, परस्वापहरण आणि भावाभावांतील वैर याचें नांव महाभारत काल ! चार वर्णांच्या रक्षणाची दीक्षा घेतलेले क्षत्रिय आपलेंच रक्षण करतां करतां लढून मेले आणि रणनदींतून वाह-

णाऱ्या शिरकमळांचें वर्णन करण्याचें काम कवीच्या नशिबीं आलें. रंतिदेवासारखे लोकप्रिय राजे हजारों गाई मारून ब्राह्मणांना जेवणें घालीत. पांडव-कौरव आणि यादव मद्यपान करून आपसांत शिवीगाळी करीत आणि सांबासारखे राजपुत्र स्त्रीवेष घेऊन ऋषींची थट्टामस्करी करीत. भारत-काळच्या या कृत्यामुळें सर्व नाश झाला आणि त्यामधून कालांतरानें जग-द्व्यापी परिवर्तन होऊन बौद्ध आणि जैन धर्मांचा उदय झाला. याचा परिणाम असा झाला कीं हिंदु धर्मानें नवें रूप धारण केलें.

युरोपांतील महायुद्धाबरोबर आतां जगांत मोठें परिवर्तन सुरूं झालें आहे. महायुद्धानंतर एक दुसरें अतियुद्ध करूनच मनुष्यजात शहाणी होण्याचा संभव आहे. आणि आज जें परिवर्तन सुरूं झालें आहे त्याचा प्रभाव त्या नंतरच दिसणार आहे.

मला असें वाटतें कीं, आजच्या या जगद्व्यापी परिवर्तनांत मोठ्यांतला मोठा फेरफार धर्माच्या बाबतींत व्हावयाचा आहे. लोकांचें धारण व्हावें म्हणून धर्माची स्थापना झाली परंतु या धर्माच्या नांवावरच लोक आपापसांत लढूं लागले आहेत. हे सगळे धर्म आतां क्रांतीच्या भट्टींतून तावून सुलाखून बाहेर पडणार आहेत. जें सोनें असेल तें टिकेल आणि उजळ होऊन बाहेर पडेल. परंतु जुना आकार नष्ट व्हावयाचाच! आजचे सर्व धर्म आपलें नांव आणि रूप बदलून नव्या आकारांत जगापुढें यायचे आहेत. आजचे धर्म नाहींसे होतील, परंतु खरी धार्मिकता कांहीं नष्ट व्हावयाची नाहीं. इतकेंच नव्हे तर ती जास्त जिवंत आणि जागृत होईल. धर्माचें पुनरुज्जीवन होईल आणि त्याबरोबर जगाचें राजकीय जीवन नवें रूप धारण करील. आज मानव जातीचा सारा जंगलीपणा त्याच्या राजकीय जीवनांत प्रगट होत असतो.

जवळ जवळ इतकीच सडलेली आणि टाकाऊ बनलेली दुसरी गोष्ट म्हणजे आपलें आर्थिक जीवन होय. यांत देखील खूप परिवर्तन व्हावयाचें आहे. संपत्तीच्या विभागणीसाठीं आज लोक लढतात; तें नव्या युगाचें प्रतीक नसून जुन्या जंगली प्रथेचें अवशेष म्हणूनच. संपत्तीसंबंधीची दृष्टीच जेव्हां बदलेल तेव्हां समाजव्यवस्था आणि राज्यव्यवस्था माणसाला शोभेल अशी होईल.

स्त्रीपुरुषामधील लैंगिक आकर्षणाला सुद्धां नवी रचना हवी आहे. लग्नसंस्था, स्त्रीपुरुषसंबंधामधील विवेक वगैरे संबंधीचे नियम आपण वाटेल तितके बदलले तरी पण आपण होतों तेथेंच येऊन उभे रहावयाचे. स्त्री-पुरुषामधील आकर्षणाचें स्वरूप काय असावें, तें कोणत्या प्रकारें अंगीं बाणवावें व शेवटीं त्याला काय स्वरूप द्यावयाचें, हें जेव्हां नक्की होईल तेव्हांच मानवी जीवनांत स्वास्थ्य यावयाचें आहे.

आत्मरक्षणाच्या प्रश्नाला देखील असेंच आमूलाग्र परिवर्तन हवें आहे. क्षत्रियासारखा वर्ण, रजपुतासारखी जात किंवा खड्या फौजेच्या टोळ्या-कडून रक्षण मिळविण्याची प्रथा शेवटपर्यंत मुळींच टिकूं शकणार नाहीं. बहुजनसमाजाच्या रक्षणाचें काम थोड्या लोकांच्या हातीं मुळींच असतां कामा नये. कारण ते थोडे लोक आपला धर्म सोडतील, त्यांची दानत बिघडेल अथवा ते गफलतींत रहातील तर समाजव्यवस्थेचें दिवाळें निघेल आणि सर्व नाश ओढवून घ्यावा लागेल.

आतांपर्यंतच्या इतिहासावरून असें ध्यानांत येतें कीं मनुष्य-जातीला मानवलेली अशी एकच सनातन संस्था आहे आणि ती म्हणजे कुटुंबसंस्था होय. जशी अर्थपद्धति तशी समाजरचना हा नियम खरा आहे. धनप्राप्तीचीं जीं साधनें आपण वापरूं, जी पद्धति अमलांत आणूं त्याच प्रकारची जीवनव्यवस्था व्हावयाची! हा सिद्धांत समजल्यानंतर अर्थोत्पादनाप्रमाणें जीवनतंत्र बदलण्याऐवजीं जसें जीवनतंत्र आम्हाला इष्ट असेल तशीच अर्थरचना आपण केली तर आपला उद्धार होईल. आज आपण जीवनशास्त्राचा स्वस्थपणें विचारच करूं शकत नाहीं. त्यामुळें समा-जांत जें कांहीं परिवर्तन होतें तें आंधळ्याप्रमाणें किंवा आमोआप होत जातें. योपुढील परिवर्तन आपोआप होऊं देण्यापेक्षां नक्की आराखडा तयार करू-नच त्या दिशेनें आपण आगेकूच केलें पाहिजे. व्यक्तीचें जीवन अशा-प्रकारें इरादापूर्वक बनविणें हें कांहीं अंशीं सोपें असतें. परंतु साऱ्या समा-जाला विशिष्ट दिशेनें घेऊन जाण्यासाठीं लोकांची मनोभूमिका तयार केली पाहिजे. आणि लोकशिक्षणाच्या बाबतींत तर आज इतकी अनवस्था आहे कीं तितकी पूर्वीं कधींच नसेल.

## जीवन संस्कृति

आपण जर अहिंसा, स्वाश्रय, क्षमा, निखालसपणा आणि परस्पर विश्वास अशासारखे सनातन गुण अंगीं बाणवूं तर समाज आपल्यासाठीं हवी असलेली रचना स्वतःच शोधून घेईल.

REFBK-0001902

समाप्त

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 9002

# राष्ट्रधर्म-पुस्तक मालेचीं

## उत्कृष्ट प्रकाशनें

★★
★

| | | | रु. |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्रधर्म | साने गुरुजी | २ |
| २ | संसारांत पडण्यापूर्वी | ना. ह. आपटे | १॥ |
| ३ | आव्हान | जवाहरलाल नेहरू | १। |
| ४ | विद्यार्थ्यांशीं हितगूज | महात्मा गांधी | २ |
| ५ | समाजधर्म | साने गुरुजी | १॥ |